१९९८

# मंथन





**मंथन** सन्मानचिन्ह / शांताराम पवार

संकल्पना / अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र, करुणाकर

मुखपृष्ठ/मांडणी / शांताराम पवार

मुखपृष्ठ संकल्पना / कुणा अनामिक करुणाकराच्या वंदनीय पादुका

छायाचित्रे / विठोबा पांचाळ

मुद्रक / प्रकाश विश्वासराव, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

प्रकाशक / चंद्रकांत केळकर

निमंत्रक / महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार समिती

केशव गोरे स्मारक ट्रस्ट; स्मृति, आरे रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० ०६२

# लेखानुक्रम


- अंतिम निवड समितीचे मनोगत पृ.६
१. महाराष्ट्र अं. नि. समिती / ले. राजीव देशपांडे पृ.१०
२. विलास वाघ / ले. रावसाहेब कसबे पृ.१६
३. विजया चौक / ले. शुभांगी जोशी पृ.३२
४. वासुदेवराव चित्रे / ले. मधु पाटील, उमाकांत कामत; पृ.४४
५. रा. वि. भुस्कुटे / ले. दयानंद प्रभु पृ.५०
६. धर्म आणि विज्ञान / ले. अल्बर्ट आइनस्टाइन पृ.५३

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार योजना

## संस्थेसाठी

१९९६ या वर्षाचा 'समाजकार्य गौरव पुरस्कार' समाज प्रबोधन या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेला दिला जाईल. हा पुरस्कार तीन लक्ष रुपये व मानचिन्ह असा असेल.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही आपल्या समाजात रूढी, अंधश्रद्धा, धार्मिक समजुती, यांचे स्थान प्रबळ आहे. म्हणूनच समाजमनात विज्ञाननिष्ठा व विवेकवाद रुजविण्यासाठी व्यापक सामाजिक प्रबोधनाची निकड आहे. परंतु अशा स्वरूपाचे कार्य लोकप्रिय होण्यापेक्षा लोकक्षोभाला निमंत्रण देणारे असू शकते. मनोधैर्य व अंगीकृत कार्याविषयीची निष्ठा याशिवाय हे कार्य करणे शक्य होणारे नाही.

वर्तमान काळातील या कार्याची निकड व व्याप्ती लक्षात घेऊन या वर्षी या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेला हा प्रमुख पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले आहे.

## व्यक्तींसाठी

ज्या व्यक्ती, समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन / संरक्षण या क्षेत्रात ध्येयवादी दृष्टीने कार्य करून, पारंपरिक समाजरचनेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतील, अशा व्यक्तींच्या कार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेण्यासाठी चार 'समाजकार्य गौरव पुरस्कार' या वर्षी दिले जातील. हे पुरस्कार प्रत्येकी रु. ५०,०००/- व मानचिन्ह असे असतील.

या गौरव पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

१. ज्या सामाजिक संस्था वा व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा व वैज्ञानिक दृष्टी यांचा प्रचार करून समाजातील अंधश्रद्धेचे निर्मूलन व्हावे म्हणून सतत प्रयत्नशील आहेत. तसेच, धर्मातीतता व मानवतावादी दृष्टिकोन यांच्या आधारे विविध जाती-धर्मीयातील सौहार्द वाढविण्यासाठी सातत्याने कार्य करीत आहेत.

२. पर्यावरण-संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन, यासारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत.

३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य याविषयीच्या जाणीवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होंत आहे.

अशा ध्येयवादी व प्रगतीशील विचारांचे अधिष्ठान असणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचे कार्य या समाजकार्य गौरव पुरस्कारांसाठी विचारात घेतले जाईल.

केशव गोरे स्मारक ट्रस्ट गोरेगाव
पुस्तक क्रमांक ........
दिनांक

## महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार योजना

पुरस्कार प्रदान समारंभ

अध्यक्ष / प्रा. ग. प्र. प्रधान

प्रमुख अतिथी / निखिल चक्रवर्ती

सन्माननीय अतिथी / निळू फुले

सूत्र संचालन / दिनकर गांगल

## १९९६चे मानकरी

**संस्था**

समाज प्रबोधन / 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'

**व्यक्ती**

समाज प्रबोधन / विलास वाघ

पर्यावरण संवर्धन / वासुदेवराव चित्रे

स्त्रियांचे प्रश्न / विजया चौक

वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक कार्य / रा. वि. भुस्कुटे

# अंतिम निवड समितीचे मनोगत

महाराष्ट्र फाउण्डेशन १८ वर्षांपूर्वी अमेरिकेत स्थापन झाली, तेव्हापासून आमची भूमिका समाजसेवेची होती. आमचे ब्रीदवाक्य आहे :

Invest in the Future of Those
who have no Future,
so, they can Reinvest

म्हणजे, समाजातल्या दुर्बल घटकांना स्वत:च्या पायावर उभे राहाण्यासाठी मदत करणे हे आमचे ध्येय आहे. त्यानुसार, आतापर्यंत गरिबांना अन्न, निवारा, आणि वैद्यकीय मदत या स्वरूपाची आमची मदत होती. आम्ही खेडी दत्तक घेतली, भूकंपग्रस्तांना पुनर्वसनासाठी मदत केली आणि मेडिकल सेंटर्स चालवली. हे सर्व करताना विधायक कार्य करण्याचे समाधान जरूर मिळाले. पण, इथे वारंवार येऊन वस्तुस्थिती जवळून बघणाऱ्यांना – खेड्यापाड्यात जाऊन ground level reality म्हणतात ती बघणाऱ्यांना – एक प्रकारची चुटपुट लागून राहिली होती. काहीतरी उणीव भासत होती. एका बाजूने भौतिक मदत केल्याचे समाधान, तर दुसऱ्या बाजूने सध्या समाजात दिसणारा जातीय विसंवाद, धर्मांध मूलतत्ववादाचा विषारी प्रसार आणि अंधश्रद्धा बघून मन खिन्न झाले. महाराष्ट्राचे एक पाऊल एकविसाव्या शतकाकडे जाताना दुसरे पाऊल पंधराव्या शतकात अडकून पडण्याची भीती वाटली.

तसेच स्त्रियांच्या प्रश्नाबाबतही जाणवले. एका बाजूने जग अलोट भौतिक प्रगती करीत आहे; तर त्याच वेळी अमानुष सामाजिक रूढी, आणि धर्मांधता यांचा बळी मुख्यत: जगभरच्या स्त्रिया होत आहेत. केवळ पोट भरले म्हणून हे अत्याचार थांबले नाहीत.

तीच गोष्ट प्रदूषणाची. अन्न, निवारा मिळाला म्हणून प्रदूषण थांबले नाही, उलट भयानक रीतीने वाढतच गेले. त्यामुळे आज आपल्याच मुलांचे म्हणजे देशाच्या संपूर्ण भावी पिढीचे आरोग्य धोक्यात आहे.

हे सर्व भेसूर प्रश्न बघून असे वाटले की समाजाला जशा शारीरिक गरजा असतात, तशाच किंवा त्यापेक्षाही अधिक बौद्धिक, नैतिक आणि वैचारिक गरजाही असतात आणि आजच्या घटकेला, साऱ्या समाजाचा सुसंस्कृतपणाच धोक्यात असताना समाजप्रबोधनाची गरज निकडीची वाटते. त्यामुळेच समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन आणि मदत देणे अत्यावश्यक आणि समयोचित आहे, असे वाटले.

अन्न, निवारा देणाऱ्याचे स्वागत तरी होते. समाज प्रबोधन म्हणजे तत्कालीन सत्ताधारी, सामाजिक आणि राजकीय प्रवाहाविरुद्ध पोहणे. ते सोपे नसते, हे संत ज्ञानेश्वरांपासून ते टिळक, आगरकर, महात्मा फुले आणि महर्षी कर्वे यांनी अनुभवलेले आहे. त्यामुळेच अशा धीट आणि ध्येयवादी कार्यकर्त्यांना अमेरिकेतल्या मराठी बांधवांचा सक्रिय पाठिंबा देण्यासाठी आम्ही ही योजना तयार केली.

आम्ही देहाने जरी दूर असलो, तरी मनाने इथलेच आहोत. आम्ही अमेरिकेत भौतिक सुखं उपभोगत असलो तरी आमचे बांधव जर इथे सामाजिक अन्याय, अंधश्रद्धा, जातीयता यात अडकून पडले असतील तर ती सुखे अंगी लागत नाहीत.

मराठी मुली जगभर डॉक्टर, इंजिनिअर झाल्या आहेत. एक तर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची प्रमुख सल्लागार आहे. यामुळे अभिमान वाटतो पण त्याच वेळी दुष्ट सामाजिक रूढी, धर्मांधता यात आमच्या भगिनी भरडल्या जात असतील तर त्या दु:खाला पारावार नाही.

एका बाजूला आमच्या मुलांना हजारो एकरांचे नॅशनल पार्क दाखवताना आनंद होतो तर आमचेच भारतातील भाचे-पुतणे, ही लहान मुले, या भयंकर प्रदूषणाने त्यांचे आरोग्य कायमचेच हरवून बसतील की काय अशी भीती वाटते.

या सर्व गोष्टींवर विचार करून आम्ही ठरवले की अन्न, निवारा यांच्यापेक्षाही आज, समाज प्रबोधनाची जास्त गरज आहे. आणि या घटकेला ती अगदी निकडीची आहे. तेव्हा, अशा संस्थांचे, स्त्रियांचे प्रश्न सोडवणाऱ्या धैर्यवान कार्यकर्त्यांचे, आणि प्रदूषणविरुद्ध झगडणाऱ्या निष्ठावंतांचे हात बळकट करणे हीच खरी समाजसेवा आहे. हा मार्ग दाखवणारे द्रष्टे या मराठी मातीतूनच निर्माण झाले होते. संत ज्ञानेश्वरांपासून ते आगरकर, महात्मा फुले, लोकहितवादी, महर्षी कर्वे, आणि

डॉक्टर आंबेडकर यांनी असेच समाजप्रबोधनाचे काम केले.

विनोबा भावे आणि साने गुरुजी यांनी सहिष्णुता शिकवली आणि माणुसकीच्या मार्गाने नीतिमंत समाज निर्माण करण्याची प्रेरणा दिली. आज समाजाला विज्ञाननिष्ठ विवेकवादाची गरज आहे. त्याला नीतिमत्तेचा पाया पाहिजे आणि माणुसकीचे आचरण पाहिजे. अशा मानवी मूल्यांचा प्रसार करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करणे आणि ओघानेच तरुण पिढीला तो आदर्श दाखवणे हेच आमच्या समाजसेवा पारितोषिक योजनेचे ध्येय आहे.

यंदाच्या वर्षी आम्ही अंधश्रद्धा निर्मूलन समितीची सहर्ष निवड करीत आहोत. या क्षेत्रात समाजप्रबोधनाचे कार्य करणारी ही महाराष्ट्रातच नव्हे, तर साऱ्या भारतात एकमेव संस्था आहे. त्यांची कार्यक्षमता ध्येयाइतकीच प्रभावी आहे. समाजात विज्ञाननिष्ठ विवेकवादाच्या प्रसारासाठी 'अंनिस'चा Action oriented मार्ग समयोचित वाटतो. आधुनिक जीवनाच्या धकाधकीतून वैफल्य येऊन शिकलेसवरलेले लोकही अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन बुवाबाजी आणि "चमत्काराचे" बळी होऊ शकतात. खेड्यापाड्यात तर एरवी सहज बऱ्या करता येतील अशा मानसिक रोगांना भानामती, भुताटकी समजून त्या रुग्णांचा शारीरिक छळही केला जातो. अशा मध्ययुगीन मानसिकतेतून समाजाची सुटका करून त्याच्यामध्ये तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ विचार रुजवणे सोपे नाही. प्रतिकूल परिस्थितीला आणि तत्कालीन सत्तारूढ सामाजिक व राजकीय हितसंबंधांना तोंड देऊन हे समाजप्रबोधनाचे काम करणे हीच खरी समाजसेवा आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे शिक्षणाचे वर्ग चालवण्याची अंनिसची कार्यपद्धती आम्हाला आवडली व बुवाबाजीचे रहस्य खेड्यापर्यंत जाऊन समजावून सांगण्याची व योग्य वेळी कायद्याचा विधायकरित्या उपयोग करण्याची त्यांची कार्यपद्धती प्रशंसनीय वाटली. अलिकडेच 'गणपती दूध पितो' या चमत्काराच्या वेळी अंनिसच्या कार्यकर्त्यांनी तत्परतेने दाखवलेली विवेकवादी व बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकाही आम्हाला या पारितोषिकाला साजेशी वाटली. श्री. दाभोळकर, श्री. लागू व इतर सर्व कार्यकर्ते यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

समाजप्रबोधनाचे जिकिरीचे काम ध्येयनिष्ठेने, प्रसिद्धीविन्मुखतेने करणारे श्री. विलास वाघ आम्हाला पुरोगामी वाङ्मयाचे प्रकाशकच म्हणून नव्हे तर एक संवेदनशील सामाजिक कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. त्यांनी भटक्या व विमुक्त जातीच्या मुलींसाठी शाळा चालवल्या ही बाबही प्रशंसनीय वाटली. वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांचे त्यांनी जे संगोपन केले त्यातूनच "जे का रंजले गांजले"मधील मतितार्थ दिसून येतो. दलित साहित्य व दलित चळवळीतल्या कार्यकर्त्यांचे वैचारिक नेतृत्व करण्यामधील श्री. वाघ यांचे कर्तृत्व या पारितोषिकांच्या निकषांना अनुरूप आहे.

श्रीमती विजया चौक यांची समाजसेवा १९६० सालापासून सेवादल, महिला समिती इ. मार्गांनी चालू आहे. स्त्रियांचे प्रश्न हे त्यांनी आपल्या कामाचे केंद्र ठेवले आहे. त्यांच्या कार्यात जनसंघटना, जाणीव-जागृती, संघर्ष, तसेच रचनात्मक कार्य असे वेगवेगळे पैलू दिसले. लेवा-पाटील समाजात त्यांनी केलेले हुंडाबंदी व परित्यक्तांचे प्रश्न यावरील कार्य वाखाणण्यासारखे आहे. खेड्यापाड्याच्या पातळीवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ध्येयनिष्ठेने केलेले स्त्रियांच्या प्रश्नांवरील कार्य पाहून श्रीमती चौक यांना समाजसेवा पुरस्कार देताना या पुरस्कार योजनेचाच गौरव होत आहे, असे वाटले.

श्री. भुस्कुटे यांनी महसूल खात्यात तहसीलदार म्हणून अनेक वर्षे काम केले होते. त्यातील अनुभवाचा फायदा त्यांनी दलित, आदिवासी भटक्या-विमुक्त आणि ग्रामीण गरिबांना त्यांच्या जमीन-समस्या सोडवण्यासाठी दिला. "शोषित जनआंदोलन" या जनसंघटनांच्या आघाडीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांनी लिखाण व प्रबोधन तर केलेच पण केवळ कायद्याच्या बाबतीत कार्य मर्यादित न ठेवता जनआंदोलनातही ते अग्रभागी राहिले. (नोकरशाहीतील बहुसंख्य लोक प्रस्थापितांच्या बाजूने पक्षपाती वर्तन करीत असताना एक अनुभवी शासकीय अधिकारी निवृत्तीनंतर सुस्थित जीवन नाकारून सातत्याने जमीन सुधारणा प्रक्रियांना गती देण्यासाठी धडपडतो ही श्री. भुस्कुटे यांची सार्वजनिक क्षेत्रातील कामगिरी अभिमानास्पद आहे.)

श्री. चित्रे यांनी १९८२ साली आदिवासींच्या विकासासाठी 'निरिड' या संस्थेची स्थापना केली. सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमात ते दरवर्षी ३ लाख नवीन झाडे लावतात. त्यामुळे निसर्ग संतुलन तर साधतेच पण आदिवासींना उत्पन्नाचे साधन मिळते व प्रोत्साहनही लाभते. यात त्यांनी स्त्रियांनाही मोठ्या प्रमाणात सामील करून घेतले आहे. झोपडीजवळ परसबाग फुलवणे, नर्सरीचे शिक्षण देणे यातून त्यांनी कुपोषणाचा प्रश्न तर सोडवलाच पण त्यामुळे मुलांची शाळांतून हजेरीही वाढली. तसेच चित्रे यांनी "पाणलोट" योजना आदिवासी भागात पोचवून सर्वांगीण विकासाचा पायाच घातला. प्रदूषणविरोध व आदिवासींचा विकास याचा सुयोग्य संगम करणारे श्री. चित्रे समाजसेवा पारितोषिकांचा निकष कार्यान्वित करीत आहेत. त्यामुळे या पुरस्काराद्वारे त्यांचा गौरव करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.



# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती / राजीव देशपांडे

१९८९च्या जानेवारी महिन्यात पुण्यात महाराष्ट्रातील ज्येष्ठ शिक्षणतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कार्यकर्ते, कायदेपंडित, शास्त्रज्ञ, न्यायमूर्ती, कलाकार, साहित्यिक अशा क्षेत्रातील मान्यवर मंडळींना एकत्र करून अंधश्रद्धा निर्मूलन जाहीरनामा परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत येणाऱ्या काही वर्षांत अंधश्रद्धा निर्मूलनाचे कृती कार्यक्रम कोणते असावेत व दिशा कोणती असावी यावर सखोल चर्चा करण्यात आली व अंधश्रद्धा निर्मूलनाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. हा जाहीरनामा कोणालाही सादर करण्यात आला नाही. हा जाहीरनामा म्हणजे महाराष्ट्राच्या विवेकशील मनाला घालण्यात आलेली साद होती. पुढील चळवळीच्या वाटचालीत हा जाहीरनामा मार्गदर्शक ठरला. या परिषदेनंतर आज ज्या स्वरूपात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य व संघटन दिसत आहे त्याची सुरुवात झाली.

**वैचारिक भूमिका :** गेल्या आठ वर्षातील बदलत्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीतून चळवळीसमोर उभी राहिलेली आव्हाने, त्या आव्हानांना तात्त्विक पातळीवर व संघर्षाच्या पातळीवर उत्तरे देताना संघटनातंर्गत झालेल्या विचारमंथनातून संघटनेची वैशिष्ट्यपूर्ण वैचारिक भूमिका तयार झाली, जी चळवळीच्या कसावर आज तरी अर्थपूर्ण व परिवर्तनाला उपकारक सिद्ध झाली आहे.

१) देव व धर्म याबाबत अंधश्रद्धा निर्मूलन समिती "तटस्थ" आहे. ही तटस्थता म्हणजे केवळ "सोय" किंवा "तात्पुरता बचाव" नाही. देवाच्या आणि धर्माच्या बाबतीतील आपली कल्पना सोडूनच प्रत्येकाने चळवळीत दाखल व्हावे असा आग्रह समितीने कधीच धरलेला नाही. मात्र चळवळीत सामील होणाऱ्याने या संकल्पनांची चिकित्सा करण्याचे अन्य जणांचे स्वातंत्र्य मात्र मान्य करायला हवे आणि स्वत:ही चिकित्सेला तयार राहवयास हवे. ही चिकित्सा करण्याची पद्धत व्यक्तीला शिकवणे आणि त्या आधारे त्याने आपले विचार दुरुस्त करणे हे समितीला अधिक श्रेयस्कर आणि योग्यही वाटते.



भारतीय घटनेतील धर्मस्वातंत्र्यही निरपवाद नाही. कायदा, सुव्यवस्था, सार्वजनिक नीतिमत्ता, सार्वजनिक आरोग्य, राष्ट्रीय एकात्मता याबाबत ज्या वेळी प्रश्न निर्माण होईल तेव्हा 'धर्म' मर्यादित केला जाईल अशी भारतीय घटनेची भूमिका आहे अन् ही भूमिका समितीला रास्त व उपयुक्त वाटते.

२) श्रद्धा-अंधश्रद्धा या संदर्भात खूप मतमतांतरे मांडली जातात. खूप शब्दच्छल केला जातो. परंतु या मतभिन्नतेचे मूळ आपल्या सोयीप्रमाणे "श्रद्धा" या शब्दाची व्याख्या करण्यात असल्याचे दिसून येत असल्यामुळे या "शब्दच्छलात" समितीला अजिबात रस नाही. जी सत्याच्या निकषावर स्वत:ला तपासू देते, जी व्यक्ती, राष्ट्र व समाज यांच्या प्रगतीशी अहिंसेने निगडित आहे, जी समाजाला कृतिशील बनविते, जी माणसाचा मूल्यविवेक उन्नत बनविते ती "श्रद्धा" होय.

**समितीच्या कार्याची पंचसूत्री :** अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे व्यापक परिवर्तनाच्या चळवळीचा एक भाग आहे असेच समिती मानते. भारतीय घटनेतील लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, राष्ट्रवाद या मूल्यांवर समितीचा दृढ विश्वास आहे. ही मूल्ये मानणारा समाज निर्माण व्हावा हेच समितीचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी समिती ज्या पंचसूत्रांच्या आधारे आपले कार्य करते त्यातील पहिले सूत्र आहे शोषण, फसवणूक, दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांशी संघर्ष. हे संघर्ष समितीच्या खेड्यापाड्यातून पसरलेल्या शाखा अतिशय प्रतिकूल परिस्थितीत करीत आहेत. पण तरीही हे संघर्ष अपुरे आहेत. त्यासाठी "प्रबोधनाची" अतिशय आवश्यकता आहे. हे प्रबोधन सतत करीत राहणे हे समितीच्या कार्याचे दुसरे सूत्र. सत्यशोध प्रज्ञा प्रकल्प व त्याद्वारे होणारी विज्ञान जाणीव प्रशिक्षण शिबिरे, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे, चमत्काराच्या प्रात्यक्षिकांसहित होणारी व्याख्याने याद्वारे लोकांत, तरुणांत, विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन पसरविण्याचे कार्य समिती करीत असते. परंतु कार्यकर्ता नुसता प्रशिक्षित होऊन भागत नाही. त्याचा उत्साह कायम टिकवून ठेवावा लागतो. त्यासाठी नवनवीन उपक्रम कल्पकतेने अखंडपणे राबविणे हे समितीच्या कार्याचे तिसरे सूत्र. चौथा महत्त्वाचा भाग

म्हणजे धार्मिक रूढी, परंपरा, प्रथा यांची कठोर चिकित्सा विधायक वृत्तीने करणे आणि कार्यकर्त्यांमध्ये नीतीचा विचार विवेकवादाच्या आधारे निर्माण करणे हे समितीच्या कार्याचे पाचवे सूत्र होय.

**बुवाबाजीविरोधी संघर्ष :** गेल्या काही वर्षात समितीच्या विविध शाखांनी मिळून लहानमोठे अनेक बाबा, बुवा, भगत, मांत्रिक, देवऋषी यांना त्यांची जागा दाखवून दिली. यासाठी सुरुवातीच्या काळात समितीने 'बुवाबाजीवर हल्ला बोल' नावाचे महाराष्ट्रव्यापी अभियान राबविले. सुमारे दीडशे कार्यकर्त्यांना बुवाबाजीविरोधी वैचारिक भूमिका, चमत्कार कसा करावा, बुवा कसा पकडावा याचे प्रशिक्षण दिले गेले. या अभियानात महाराष्ट्रभर सुमारे दोन हजार व्याख्याने दिली गेली. प्रसिद्ध कलाकार निळू फुले आणि दिवंगत राम नगरकर यांनी या अभियानात जिल्हानिहाय मेळाव्यासाठी खूप वेळ दिला. सत्यसाईबाबांच्या हातचलाखीचे चित्रण असणारी चित्रफीत मिळवून ती महाराष्ट्रात सर्वत्र वितरित केली. निर्मलामातेच्या कुंडलिनी जागृतीला खुले आव्हान देऊन कुंडलिनी जागृती म्हणजे परसंमोहनाचा व काही वेळेस स्वसंमोहनाचा प्रकार असल्याचे समितीने सिद्ध केले.

## चमत्कारांना आव्हान

तथाकथित चमत्कारांना समितीने नेहमीच आव्हान दिले आहे. विज्ञानाचा नियम ओलांडणारा कोणताही चमत्कार तज्ज्ञांच्यासमोर नियंत्रित परिस्थितीत सादर करणाऱ्या व्यक्तीस समितीचे पाच लाख रुपयांचे आव्हान आहे. ही आव्हान



प्रक्रिया पार पाडण्यासाठी पंतप्रधानांचे माजी ज्येष्ठ वैज्ञानिक सल्लागार डॉ. वसंतराव गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण करण्यात आली आहे. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम ताकवले, सकाळ पेपर्सचे संचालक प्रताप पवार, प्रसिद्ध अभिनेते डॉ. श्रीराम लागू, निळू फुले आणि रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व सत्यशोधकी विचाराचे झुंझार कार्यकर्ते प्रा. एन्. डी. पाटील यांचा समावेश आहे.

"चमत्कार घडवा. . . यात्रा अडवा – पाच लाख रुपये मिळवा" असे आव्हान देत समितीने एक सत्यशोध यात्रा राज्यातील १५ जिल्ह्यातून काढली.

**अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा** : अशा प्रकारचा कायदा व्हावा म्हणून समिती नेटाने प्रयत्न करीत आहे. अनेक परिषदा, चर्चासत्रे कायद्यासंदर्भात घेण्यात आली आहेत. विधानपरिषदेत आमदार दस्तुरकर यांचे खाजगी विधेयकही मंजूर झाले आहे. यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने स्वतःहून न्यायमूर्ती धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. नुकतेच विधानपरिषदेत अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या संघटनांशी चर्चा करून कायदा करण्याचा विचार करू असे सरकारने घोषित केले आहे.

**भूत, भानामती मनाचे आजार :** याबाबत समिती सातत्याने प्रबोधन करीत आहे. कोकणात 'भूत' संकल्पनेचा पगडा बराच आहे. त्यामुळे समितीने 'शोध भूताचा बोध मनाचा' अशी मोठी मोहीम कोकणात हाती घेतली. पथनाट्ये, पोस्टर्स, व्याख्याने, चर्चा, प्रत्यक्ष भूताच्या ठिकाणी राहणे, मानसोपचार तज्ज्ञांच्या मुलाखती वगैरेच्या सहायाने प्रबोधनाची मोठी मोहीम पार पाडण्यात आली. जवळ जवळ १७६ कार्यक्रम मोहीमेत पार पाडले. देवी अंगात येण्याच्या बाबतीत जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्रभर "देवीचा संचार – संमोहनाचा प्रकार वा मनाचा आजार" ही मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेमुळे "मानसिक आरोग्य केंद्रां"ची गरज गावोगाव असल्याचे जाणवले.

जगात आपोआप काहीच घडत नाही त्यापाठी कार्यकारणभाव असतो. त्यामुळे समिती ठामपणे असे मानते की भानामती देखील घडविली जाते वा त्यामागे मानवी हातच असतो. अशी अनेक भानामतीची प्रकरणे समितीने हाताळून यशस्वी केली व भानामती शोधण्याचे एक तंत्रच विकसित केले आहे.

**फलज्योतिषाला आव्हान :** शास्त्र म्हणजे काय? याची पुरेशी स्पष्टता आजच्या विज्ञानाला आहे आणि त्या निकषावर फलज्योतिष टिकू शकत नाही. फलज्योतिष शास्त्र कां नाही याविषयी कोणत्याही ज्योतिषाशी व्यासपीठावर वादविवाद करण्यास समिती सदैव तयार आहे. समितीने ज्योतिष महामंडळाला सातत्याने असे आव्हान दिले आहे की आम्ही सेकंदापर्यंत अचूक अशा २० कुंडल्या देतो किंवा हाताचे ठसे देतो त्या आधारे त्या व्यक्तीचे शिक्षण, विवाह, अर्थार्जन, संतती, अपघात या बाबतीत ८०% अचूक ठरणारी उत्तरे द्यावीत. परंतु अजून कोणीही हे आव्हान स्वीकारलेले नाही. "दैववादाची होळी" हा एक विशेष कार्यक्रम समितीने फलज्योतिषाच्या विरोधात राबविला. जन्मवेळेच्या ग्रहस्थितीच्याप्रमाणे बनविलेली कुंडली म्हणजे नियतीने व्यक्तीच्याबाबत योजलेल्या प्रारब्धाचा जणू नकाशाच. समितीला साफ नामंजूर असलेल्या दैव, प्रारब्ध, संचित वगैरे संकल्पनांना कुंडलीमुळे मान्यता मिळते. त्यामुळे कुंडलीला दैववादाचे प्रतीक मानून तिची होळी ज्योतिष महामंडळाच्या अधिवेशन प्रसंगी केली गेली.

**यात्रेतील पशुहत्या विरोध :** महाराष्ट्रात सार्वजनिक ठिकाणी देवाच्या नावाने नवस फेडण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर पशुहत्या होते. ७५/१०० कोटी रुपये खर्ची पडतात, कमालीची अस्वच्छता व रोगराई पसरते, गरीब जनता या पायी सावकारी पाशात अडकते. यामुळे गेल्या चार वर्षापासून समितीने सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत प्रसंगी मार खाऊनही सुमारे २० ठिकाणी पशुहत्या थांबविण्यात यश मिळविले आहे. यात ६ मुस्लिम स्थळांचा समावेश आहे, हे विशेष.

**जटा निर्मूलन :** जटा म्हणजे बाईच्या अस्वच्छ केसांचा झालेला गुंता असतो. पण तो सोडविल्यास यल्लम्मा देवीचा कोप होईल या भीतीने तो न सोडविला जाता त्यावर हळद, कुंकू, वडाचा चीक वाहणे चालू होते, नंतर अंगात येऊ लागते व मग देवाबरोबर लग्न लागून ती 'देवदासी' बनते. यात 'जट येणे' हा भाग फार महत्त्वाचा असतो. कार्यकर्त्यांनी अनेक ठिकाणी या जटा सोडवून देवदासी मुक्त केल्या आहेत व त्या बाईला तिचे नैसर्गिक जीवन जगायला मिळावे याचा प्रयत्न केला आहे. पोतराज प्रथेत लहानपणीच देवाला सोडले जाते मग तो अंगावर आसूड ओढीत फिरतो. हाही प्रश्न समितीने हाती घेतला. लातूर येथे "पोतराज प्रथा निर्मूलन परिषद" प्रसिद्ध अभिनेते निळूभाऊ फुले व प्रा. एन्. डी. पाटील यांच्या उपस्थितीत भरविली व जाहीरपणे पोतराजांच्या जटा निर्मूलनाचा कार्यक्रम करून पोतराज प्रथेला छेद दिला.

**विवेक जागराचा संवाद :** परमेश्वराला रिटायर करा असे म्हणणारे चळवळीचे ज्येष्ठ मित्र डॉ. श्रीराम लागू व देव आणि धर्म विषयक आमची भूमिका तटस्थ आहे असे प्रतिपादन करणाऱ्या समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या जाहीर वाद संवादाचे कार्यक्रम अनेक जिल्ह्यातून झाले.

**संमोहन :** संमोहनाबाबत बहुतेकांच्या मनात गूढ कुतूहल असते. या कुतुहलाचा फायदा घेऊन सध्या त्यासंबंधी भरमसाट दावे करणाऱ्यांचे व संमोहनाद्वारे व्यक्तिमत्व विकास करणाऱ्यांचे पेवच फुटले आहे. याबाबत समिती जिज्ञासूंना पुस्तिका व प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देऊन "भरमसाट दाव्यातील" फोलपणा दाखवून देते.

विविध उपक्रम :

१) अंधश्रद्धा निर्मूलनासाठी युवा एल्गार : विद्यार्थी वर्गाचा सहभाग मिळविण्यासाठी समितीने कॉलेज विद्यार्थ्यांत ही मोहीम राबविली.

२) सर्प आणि अंधश्रद्धा : सापाबाबतच्या अंधश्रद्धा जगभरच्याच समुहात आढळतात. सापाबद्दलचे गैरसमज दूर करून त्याची उपयुक्तता सिद्ध करणारा असा प्रबोधनाचा कार्यक्रम कार्यकर्ते विषारी व बिनविषारी सापांसहित दाखवितात.

३) चर्चासत्रे : शिक्षण व अंधश्रद्धा व स्त्रिया आणि अंधश्रद्धा ही दोन महाराष्ट्रव्यापी चर्चासत्रे सातारा व मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.

४) व्यसनविरोध : अंधश्रद्धेप्रमाणेच व्यसनेही माणसाचा विवेक नाहीसा करतात त्यामुळेच समिती हे व्यसनविरोधाचे कार्यही आनुषंगिक म्हणून करते.

५) २१ सप्टेंबर १९९५ हा गणपती दुग्धप्राशनाच्या चमत्काराचा दिवस. या दिवशी समितीच्या खेड्यापाड्याच्या शाखांनी या अफवेचा प्रतिकार करून जनतेला सत्य सांगण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यावरून चमत्काराबरोबर सहज वाहून जाणारी मानसिकता लख्खपणे पुढे आली. त्यामुळे समितीने २१ सप्टेंबर हा "चमत्कारविरोधी दिन" पाळण्याचे ठरविले व या वर्षी 'दुग्धप्राशन करणाऱ्या गणरायास विद्यार्थ्यांचे पत्र' अशी महाराष्ट्रव्यापी पत्रलेखन स्पर्धा आयोजित केली. तीन हजार विद्यार्थी त्यात सहभागी झाले. १ जानेवारी हा प्रतिवर्षी आंतरजातीय विवाह दिन साजरा करण्याचे ठरविले आहे.

६) दैवी वास्तुशास्त्राचा विरोध : "लाभणारे" घर कसे बांधावे अथवा असलेल्या घराची मोडतोड करून घर कसे "लाभदायक" होईल ह्याचे विज्ञान (?) म्हणजे "दैवी वास्तुशास्त्र". याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. फक्त प्राचीन वाङ्मयाच्या आधारावर हे सांगितले जाते. या विरुद्ध समितीने प्रबोधनाची मोहीम प्रभावीपणे राबविली आहे.

७) सत्यशोध प्रज्ञा प्रकल्प : विद्यार्थीदशेत अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार रुजावा, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व सत्यशोधकी जाणिवांचा संस्कार व्हावा यासाठी हा उपक्रम समिती राबविते. शिक्षकांसाठी एक अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून तो शिक्षकांना २ वा ३ वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण शिबिरात शिकविला जातो. त्यानंतर शिक्षकांनी २५ दिवसांच्या शालेय तासांचा हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना स्वयंसेवी पद्धतीने शिकवावा अशी कल्पना असते. जवळपास ८० हजार विद्यार्थी या परीक्षांना बसले आहेत. भारतातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर याचे अध्यक्ष आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने प्रशिक्षण शिबिरासाठी अर्थसाहाय्य दिले आहे. या परीक्षांबरोबरच आता एकेका विषयाच्या उदा. बुवाबाजी, चमत्कार, सर्पविज्ञान, खगोलविज्ञान, व्यसनमुक्ती परीक्षाही सुरू केल्या जात आहेत. या सर्वांमधून "सत्यशोधक विद्यापीठ" उभे राहावे असा प्रयत्न आहे.

**वार्तापत्र :** गेली ५ वर्षे समितीचे "अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र" नियमितपणे प्रसिद्ध होते. या वर्षी वार्तापत्राचा दिवाळी अंकही प्रकाशित करण्यात आला.

**प्रकाशन :** अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विविध विषयांवरील समितीच्या पुस्तिका अत्यंत रास्त दरात विकल्या जातात. विचार सर्वदूर पसरावा हाच उद्देश ठेवून पुस्तके प्रकाशित केली जातात.

**नीतिविषयक भूमिका :** अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामुळे समाज नीतिभ्रष्ट होईल अशी शंका अनेकजण व्यक्त करतात. परंतु 'अंनिस'च्या कार्याच्या गाभ्याचा आशय नीतिमान समाजाची निर्मिती हाच आहे. पण नीतिमूल्ये म्हणजे तरी काय? समाजधारणा ज्यामुळे होते व ज्यांच्या आचरणाबद्दल व्यापक मान्यता असते असे सामान्य नियम. उदा. खरे बोलावे वगैरे पण केवळ समाजधारणेसाठी आवश्यक असलेल्या विचारांचीच नीतिमूल्ये बनलेली आहेत असे नाही. याबरोबरच समाजातील हितसंबंधी वर्गांनी स्वत:चे हितसंबंध कायम राहवेत यासाठी मतलबीपणे काही विचारांना नीतिमूल्याचे स्वरूप दिले तर अज्ञानापायी काही विचारांना न तपासताच नीतिमूल्यांचा दर्जा देण्यात आला, नीतिमूल्यांची सांगड देव आणि धर्म यांच्याशी घालण्यात आली. त्यामुळे 'चिकित्सा' अवघड होऊन बसली. परंतु ही चिकित्सा जी मूल्ये समाज व व्यक्तीहिताची ठरतात त्यांचा आदर करीत समितीला करावीच लागेल अन् त्या चिकित्सेचा आधार अपरिहार्यपणे बुद्धीप्रमाणेच प्रामाण्यवाद व विवेकनिष्ठा हाच असेल.



# विलास वाघ / रावसाहेब कसबे

महाराष्ट्राला समाज प्रबोधनाच्या चळवळींचा एक दैदीप्यमान असा वारसा लाभलेला आहे. या चळवळीतूनच समाज परिवर्तनासाठी वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांचा एक जथा महाराष्ट्रात निर्माण झाला. समाज परिवर्तनासाठी आवश्यक असलेले समाज प्रबोधन ही केवळ वाचाळांची बडबड नव्हे किंवा फॅशनेबल क्रांतिकारकांनी व्यवस्थेविरोधी नोंदविलेला वांझोटा विद्रोहही नव्हे, तर ती स्वत:च पत्करलेली एक गंभीर स्वरूपाची जोखीम आहे, याचे भान फार थोड्या कार्यकर्त्यांना असते. ज्यांना हे भान असते, त्यांचे कार्य अविरत चालू असते. परंतु ते प्रसिद्धी माध्यमापासून दूर असते. त्यामुळे, त्याचा गवगवा होत नसतो आणि त्यावर प्रसिद्धीचा झोतही पडत नसतो. आजच्या महाराष्ट्रातील समाज प्रबोधनाच्या चळवळीचा विचार केला तर असे दिसते की, ही चळवळ विविध कारणांनी विस्कळीत झालेली असली आणि तिचा प्रभाव काहीसा कमकुवत बनलेला असला तरी, तिला वाहून घेतलेल्या जीवनदानी कार्यकर्त्यांची संख्या अद्यापही लक्षणीय आहे. अशा कार्यकर्त्यांपैकी एक नाव विलास वाघ हे आहे.

धुळे शहराच्या पश्चिमेला पाच-सहा किलोमीटरवर असलेल्या मोराणे या गावी १ मार्च १९३९ रोजी विलास वाघ यांचा जन्म झाला. १९५८ साली धुळ्याच्या गरुड हायस्कूलमधून शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विलास वाघ पुढील शिक्षणासाठी पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयात दाखल झाले. १९६४ साली ते पदार्थविज्ञान हा विषय घेऊन



बी.एस्सी. उत्तीर्ण झाले. पुढे आवड म्हणून बी.ए., बी.एड. आणि समाजशास्त्र हा विषय घेऊन एम.ए.ही झाले. त्यांनी अशोक विद्यालय (पुणे), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन आणि पुणे विद्यापीठ इ. नामवंत संस्थात काम केले. परंतु, त्यांच्या व्यक्तिमत्वाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी पूर्णपणे भारून टाकलेले असल्याने आणि आंबेडकरी विचार हा समाज परिवर्तनाचे विज्ञान सांगणारी एक प्रणाली असल्याने विलास वाघ यांच्या व्यक्तिमत्वात विचार आणि कृती यांचा सम्यक मेळ निर्माण होणे साहजिक होते.

समाज परिवर्तनाची चळवळ गतिमान बनविण्यासाठी प्रबोधनाची गरज असते हे खरे, परंतु शिक्षण प्रसाराशिवाय असे प्रबोधन भारतीय समाजात अशक्य आहे याची जाणीव विलास वाघांना प्रत्यक्ष जीवनानुभवातूनच होत होती. म्हणून त्यांनी पुण्यात १९६६ साली 'समता शिक्षण संस्था' सुरू केली. या संस्थेच्या वतीने भटक्या आणि विमुक्त जातीतील मुलांसाठी बालवाडी आणि संस्कार केंद्रे सुरू करण्यात आली. आज या संस्थेचा विकास पाहिला तर एक ध्येयवेडा माणूस प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या ध्येयपूर्तीसाठी संस्थात्मक साधनांची उभारणी कशी करू शकतो याची प्रचिती येते. पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील महिलाश्रम, वडगाव, बुद्रुक येथे कस्तुरबा गांधी यांच्या नावाने चालत असलेले मुलींचे वसतिगृह, तळेगाव (ढमढेरे) येथील 'समता विद्यार्थी वसतिगृह', वडारवाडीतील 'महिला शिवणकला केंद्र', मोराणे येथील 'आश्रमशाळा' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय इ. विलास वाघ यांनी स्थापन केलेल्या संस्था म्हणजे त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनीच निर्माण केलेली साधने आहेत. या देशातील जातिसंस्था ही एक अतिशय जटील आणि चिवट अशी संस्था असल्याने सामाजिक, आर्थिक समतेच्या चळवळीच्या मार्गात ती एका अक्राळविक्राळ राक्षसाचे रूप धारण करून तो मार्ग बंद करण्याचा नेहमीच प्रयत्न करीत आलेली आहे. त्यामुळे समतेच्या लढ्यातील प्रत्येक सैनिकाला जातिसंस्थेच्या उच्छेदाचा विचार केल्याशिवाय पुढे जाणे अशक्य होते. भारतीय जातिसंस्थेचा प्रमुख आधार इथल्या अर्थव्यवस्थेत असला तरी धर्मशास्त्राच्या प्रभावामुळे तो आधार अधिक भक्कम झालेला आहे. त्यामुळे जातीसंस्थेचा उच्छेद करणे म्हणजे एकीकडून सामाजिक-आर्थिक व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन करणे जसे असते, तसेच धर्मशास्त्राच्या पावित्र्याखाली दडलेले कुटिल हितसंबंध उघडे करून दाखविणेही असते. जातिसंस्था ज्या विवाहसंस्थेच्या पायावर भक्कम झालेली होती, त्या विवाहसंस्थेला अधिक मानवी रूप दिल्याशिवाय जातीसंस्थेला धक्का लागणे शक्य नाही याची जाणीव झाल्यामुळेच १९५१ साली विलास वाघ यांनी सुरू केलेल्या 'सुगावा' मासिकाचा या कामासाठी उपयोग करण्याचे ठरविले. 'समाज परिवर्तनासाठी आंतरजातीय विवाह'

या नावाची एक पुस्तिका त्यांनी छापून घेतली आणि अनेक आंतरजातीय विवाहांना उत्तेजन दिले. त्यामुळे 'सुगावा' हे केवळ समाजप्रबोधनाचे साहित्य प्रसृत करणारे मासिक राहिले नाही, तर त्याचा संबंध थेट प्रत्यक्ष समाजपरिवर्तनाच्या कृतीशी जोडला गेला.

१९८०-८१ हे साल विलास वाघ यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे वर्ष ठरले कारण याच काळात त्यांचा अनेक मान्यवरांशी संबंध आला. महाराष्ट्राचे लाडके लेखक श्री. पु. ल. देशपांडे आणि सुनीताबाई यांच्याकडून त्यांना प्रोत्साहन मिळाले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या मान्यवर संस्थेच्या माध्यमातून प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ जे. पी. नाईक, चित्रा नाईक, ए. बी. शहा, मे. पु. रेगे, देवदत्त दाभोळकर इ. व्यक्तींशी आणि त्यांच्या कार्याशी प्रत्यक्ष संबंध आला. याच वर्षी 'वेश्यांच्या मुलांचे शैक्षणिक प्रश्न' या प्रा. ए. बी. शहा यांनी हाती घेतलेल्या संशोधन प्रकल्पाशी विलास वाघ यांचा प्रत्यक्ष संबंध आला. त्या निमित्ताने त्यांनी पाहिलेले वेश्यांचे जग त्यांच्या अंत:करणात अनेक प्रश्नांची निर्मिती करून गेले. पुढे तर ते जगच वास्तवाचे आणि माणसाचे खरे रूप जाणून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे विद्यापीठच बनले. तेथील सारे व्यवहार प्रत्यक्ष जसे दिसतात, ते तसे अजिबात नसतात. साऱ्या वेश्याव्यवसायाचा प्रमुख आधार पुरुषच असतो, परंतु वेश्यांच्या प्रश्नावरील सर्व चर्चा पुरुषांचे अस्तित्व सोडूनच होत असते. वेश्याव्यवसायातील सारी भांडवल गुंतवणूक समाजातील प्रतिष्ठित सधन पुरुषच करीत असतात आणि वेश्यांना खरा आधार पोलिसांचाच वाटत असतो. आपल्या मुलाबाळांच्या आणि कुटुंबाच्या पोषणासाठी बहीण किंवा मुलीला कुंटणखान्यात पाठविणारे भाऊ किंवा वडील पुरुषच असतात आणि त्यांची कमाई लुटून नेणारेही तेच असतात. वेश्यांना होणाऱ्या संततीचे प्रश्न किती भयंकर असतात याची जाणीव होताच विलास वाघ यांनी 'सर्वेशाम सेवा संघ' या संस्थेच्या मार्फत खास अशा मुलामुलीसाठी वडगाव बुद्रुक येथे एक बाल संगोपन केंद्र १९८४-८५ साली उभे केले. नूरी नावाची एक छोटीशी मुलगी तर त्यांनी एका वेश्येकडून दत्तकच घेतली होती. वेश्यांच्या मुलामुलींचे संगोपन करताना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत होते हे खरे, परंतु ही मुले-मुली मोठी झाल्यानंतर आईच्याच मार्गाने जाणारी निघाली तर फारच क्लेशदायक. एखाद्या वेश्येचा मुलगा एम.ए. बी.एड. झाला, शिक्षक झाला, आणि त्याच्या आईने धंदा सोडून दिला, असे आनंदाचे प्रसंगही वाट्याला आले. इ.स. १९८१-८२ साली विलास वाघ यांची पुणे विद्यापीठातील प्रौढ शिक्षण विभागात असिस्टंट डायरेक्टर म्हणून नियुक्ती झाली आणि १९८३ साली उषा कुलकर्णी नावाच्या गणिताच्या प्राध्यापिकेशी त्यांचा विवाह झाला. ते वर्ष आर्थिक सुबत्तेचे वर्ष मानायला हरकत नाही. कारण विलासरावांची जागा ही रीडरच्या समकक्ष होती आणि उषाताईंना व्याख्यातीचा पगार मिळत होता.



परंतु हे दांपत्य या प्रकारच्या सुबत्तेत रमणारे नव्हते. आपल्याला जे करावयाचे आहे ते करण्याची संधी प्राप्त होत नसेल तर नोकऱ्या सोडून द्याव्यात या विचारापर्यंत ते आले. त्यातूनच 'सुगावा प्रकाशना'ला चालना देण्याचा विचार सुरू झाला. या काळातील या दांपत्याची होत असलेली घालमेल ज्यांनी पाहिली असेल, त्यांना या दांपत्याच्या मनातील सुप्त संघर्षाची कल्पना आल्याशिवाय राहिली नसेल. 'सुगावा प्रकाशन' अधिक गतिमान करण्यासाठी नोकऱ्या सोडण्याची मुळीच गरज नाही असे समजावणारा वाघ दांपत्याचा एक मित्रवर्ग होता. त्यांनी त्या दिशेने प्रयत्नही केले होते.

'सुगावा प्रकाशन' फक्त वैचारिक पुस्तकेच छापणार, ते धंदेवाईक प्रकाशन असणार नाही आणि धंदा करून देणारी रंजक पुस्तके ते छापणार नाही, असे निश्चित झाल्यावर प्रश्न होता तो पोट भरण्याचा. १९८५ साली सुगावा प्रकाशनाने 'आंबेडकर आणि मार्क्स' हा ग्रंथ प्रकाशित करून आपले वेगळेपण सिद्ध केले हे खरे, परंतु त्या निमित्ताने अनेक शत्रूही निर्माण केले. वाघ दांपत्य कर्मठ मार्क्सवाद्यांच्या आणि पारंपरिक आंबेडकरवाद्यांच्या रोषाचे बळी ठरले. परंतु त्यांनी आपल्या विचारांशी प्रतारणा केली नाही. गं. बा. सरदार यांच्यापासून ते हरी नरके यांच्यापर्यंतच्या पुरोगामी लेखकांनी

सुगावा प्रकाशनाला प्रबोधनाच्या चळवळीचे एक साधन मानून लेखन केले आणि विलास वाघांनी दोनशेच्या आसपास नवनव्या विषयावरील ग्रंथ छापून मराठी साहित्याला समृद्ध केले.

शेवटी, विलास आणि उषा या दांपत्याने १९८६ साली नोकऱ्या सोडण्याचा निर्णय घेतला आणि त्यांचे बिऱ्हाड पुणे विद्यापीठातील शिक्षक वसाहतीतून फर्ग्युसन महाविद्यालयाच्या समोरील एका बोळातील झोपडपट्टीत आले. साधारणत: १२x१५च्या झोपडीत संसार थाटणे ही साधी गोष्ट नव्हती. परंतु या दांपत्यानी ती इतक्या सहजपणे स्वीकारली की त्यासंबंधी त्यांच्या मित्रांना नाराजी प्रकट करणेही अशक्य होऊन बसले. याच झोपडीत उणीपुरी दहा वर्षे घालवून विलास आणि उषा देशभर भटकली. आदिवासी आणि दलित स्त्रियांचे प्रश्न समजून घेऊन त्यांना चळवळीचे रूप कसे देता येईल याचा विचार करू लागली. गेल्या दहा वर्षातील 'सुगावा'चे दिवाळी अंक आणि 'सुगावा'ची प्रकाशने यांच्या विषयावरून नजर फिरविली तरी या दांपत्याच्या मनातील विचारांची कल्पना येते. समाजातील जे घटक उपेक्षित आहेत मग त्या स्त्रिया असोत की ख्रिश्चन दलित, मातंग समाज असो की वेश्या, ते सारे या दांपत्याने आपले मानले आणि त्यांच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी जे करणे शक्य होईल ते सारे सर्वशक्तीनिशी केले. आजही ते तेच करताना आढळतात.

साथी भाई वैद्य गेली पाच–सहा वर्षे समाजवादी जनपरिषद संघटित करीत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत ज्या समाजविभागांना आपले अस्तित्वही टिकविता येणार नाही अशा समाजविभागांना संघटित करून त्यांच्यात आत्मविश्वास कसा निर्माण करता येईल या दिशेने प्रयत्न होत आहेत. विलास वाघ समाजवादी जनपरिषदेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. अलीकडे दलित आणि मुस्लिमांच्या प्रश्नांवर बरेच बोलले, लिहिले गेले आहे. परंतु दलित स्त्रियांचे प्रश्न आणि मुस्लिम स्त्रियांचे सामाजिक प्रश्न यांची अद्याप पुरती उकल झालेली नाही. म्हणून विलास वाघ बिहारपासून ते नागपूरपर्यंत या समाजविभागातील स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात गढून गेले आहेत. त्यातून जे निष्कर्ष निघतील त्यांना घेऊन स्त्रियांची एक व्यापक चळवळ उभी राहावी अशी त्यांची इच्छा आहे. शरीराला जडलेले दुर्धर रोग, माफक आर्थिक प्राप्ती याची तमा न बाळगता विलास वाघ मोठ्या उत्साहाने संपूर्ण देशभर भ्रमंती करताना दिसतात. त्यांना त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी उत्तम आयुरारोग्य लाभावे हीच इच्छा.

इतिहास काही महापुरुष घडवित नसतात किंवा तो दैवी इच्छेनेही घडत नसतो. जिवंत माणसेच इतिहासाचे खरे शिल्पकार असतात. त्यांच्या निर्मितीपासून, वाणीतून आणि कर्तृत्वातून इतिहास आकार घेत असतो. माणूस हा इतिहासाचे अपत्य असला तरी तो इतिहासाचा निर्माताही असतो. त्यामुळेच त्याला त्याच्या मर्जीप्रमाणे इतिहास घडविण्यात अनंत अडचणी येतात. परंतु म्हणून काही माणसाने इतिहास निर्मिती थांबविलेली नाही. मानवी विकासक्रमातील प्रत्येक प्रगत अवस्थेत कर्तृत्ववान आणि जिवंत माणसांनी इतिहासावर आपल्या पाऊलखुणा उमटविलेल्या म्हणूनच आपण पाहत असतो. महाराष्ट्राच्या समाज प्रबोधनाच्या चळवळीचा जेव्हा कधी गंभीरपणे विचार सुरू होईल, तेव्हा या चळवळीच्या इतिहासावर गेल्या पाव शतकात या चळवळीसाठी ज्यांनी सर्वस्व पणाला लावले आणि आपल्या कुवतीप्रमाणे आपल्या पाऊलखुणा उमटविल्या त्या सर्व कार्यकर्त्यांच्या पाऊलखुणांची नीट ओळख करून घ्यावी लागेल. अशा कार्यकर्त्यांत विलास वाघ यांचे नाव अग्रभागी असेल, याबद्दल संदेह बाळगण्याचे कोणतेही कारण नाही.

# विवेकवादाची रूपे / प्रा. मे. पुं. रेगे

'विवेकवाद' हा शब्द `rationalism' ह्या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय म्हणून काही प्रमाणात रूढ झाला आहे. 'बुद्धिप्रामाण्यवाद' हा शब्दही ह्या अर्थाने अनेकदा वापरण्यात येतो. आता पाश्चात्त्य वैचारिक परंपरा घेतली तर तिच्यात 'रॅशनलिझम' हा शब्द निदान दोन भिन्न अर्थांनी वापरण्यात आला आहे. एक अर्थ पार्मिनायडीस-प्लेटोइतका प्राचीन आहे. दुसरा अर्थ १८व्या, १९व्या शतकात रूढ झाला. मराठीत 'विवेकवाद' हा शब्द सामान्यपणे दुसऱ्या अर्थाने, १९व्या शतकात रूढ झालेल्या अर्थाने वापरण्यात येतो. पहिल्या अर्थाने तो मराठीत क्वचितच वापरला जातो. फारतर पाश्चात्त्य तत्त्वज्ञानावरील मराठी पाठ्यपुस्तकात तो पहिल्या अर्थाने वापरण्यात आला असणार. पण अलिकडच्या पाश्चात्य तत्त्वज्ञानात ज्या विचारधारा आणि वाद विकसित झाले आहेत ते समजून घ्यायला विवेकवादाचे दोन्ही अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. प्राचीन ग्रीक विवेकवादाची विचारधारा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात अव्याहतपणे वाहत आली आहे. इमान्युएल कान्टने १८व्या शतकाच्या अखेरीस तिचा स्पष्टपणे पुनरुच्चार आणि पुनरुद्धार केला.

प्राचीन विवेकवादाचा पहिल्यांदा परिचय करून घेणे इष्ट ठरेल. विवेकवादाची ही संकल्पना प्लेटोने प्रथम सुस्पष्टपणे मांडली. माणसाला जे ज्ञान प्राप्त होते त्यात वेगवेगळे प्रकार असतात का? भिन्न प्रकारांची ही ज्ञाने माणसाला कशी, कोणत्या रीतीने प्राप्त होतात? विवेक (रीझन) ह्या ज्ञानशक्तीची संकल्पना ह्या प्रश्नांशी संबंधित आहे. हे प्रश्न वेगळ्या रीतीने असे मांडता येतील: ज्ञान प्राप्त करून घेण्याची शक्ती, ज्ञानशक्ती, माणसाच्या अंगी आहे. ह्या शक्तीचा वापर केल्याने माणसाला ज्ञान प्राप्त होते. आता अशी एकच, एकविध अशी ज्ञानशक्ती आहे आणि ती एकाच प्रकारचे ज्ञान प्राप्त करून देते असे आहे का? की ज्ञानाचे भिन्न प्रकार असतात आणि ही भिन्न प्रकारांची ज्ञाने प्राप्त करून देणाऱ्या भिन्न ज्ञानशक्ती असतात? प्लेटोचे उत्तर असे की ज्ञान दोन प्रकारचे असते आणि ही भिन्न प्रकारची ज्ञाने प्राप्त करून देणाऱ्या दोन भिन्न ज्ञानशक्ती असतात.

एका प्रकारचे ज्ञान म्हणजे आपल्या ज्ञानेंद्रियाद्वारा आपल्या सभोवतालच्या वस्तूंचा आणि त्यांच्या गुणधर्मांचा आपल्याला जो परिचय होत असतो ते ज्ञान. ह्या प्रकारच्या ज्ञानाला ऐन्द्रियज्ञान म्हणूया. आपल्या ज्ञानेन्द्रियांच्या ठिकाणी जी संवेदनशक्ती असते. तिच्यामुळे हे ज्ञान आपल्याला लाभते. आता प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे हे ज्ञान ज्या वस्तूंचे असते त्या विशिष्ट वस्तू असतात. आणि ह्या विशिष्ट वस्तू चंचल, स्थित्यंतर पावणाऱ्या असतात आणि अपूर्ण (imperfect) असतात. उदा. आपण एखादा घोडा पाहतो. हे इंद्रियगम्य ज्ञान आहे. आता हा घोडा एक विशिष्ट घोडा असतो. इतर घोड्यांहून (आणि अर्थात् इतर प्रकारच्या सर्व वस्तूंहून) तो भिन्न असतो. त्याचे स्वरूप स्थिर नसते. तो कधी ताजातवाना कधी थकलेला असेल. एकेकाळी तो तरुण असेल; काही वर्षांनी तो म्हातारा झालेला असेल. म्हणजे घोड्याचे स्वरूप चंचल असते. शिवाय कोणताही विशिष्ट घोडा घेतला तर तो परिपूर्ण घोडा असत नाही. घोडा म्हणून काही दोष, काही उणीवा त्याच्या ठिकाणी असतातच. ह्या अर्थाने तो घोडा असला तरी अपूर्ण घोडा असतो. आणि ज्या प्रमाणात तो अपूर्ण घोडा असतो त्या प्रमाणात तो घोडाच नसतो. तो काहीसा घोडा असतो. तो सर्वार्थाने घोडा नसतो. पण जो सर्वार्थाने घोडा आहे, परिपूर्ण आणि म्हणून खराखुरा घोडा आहे तो आपल्याला दिसत नाही; तो इंद्रियगम्य, इंद्रियगोचर नसतोच.

आता प्लेटोचे म्हणणे असे की 'हा एक घोडा आहे, हा दुसरा घोडा आहे, हा तिसरा . . .' असे जे आपण म्हणतो, असे जे निर्णय आपण घेतो त्यात घोडेपणा (किंवा प्रौढ भाषेत अश्वत्व) ही सामान्य संकल्पना अभिप्रेत असते आणि अर्थात् ह्या सामान्य संकल्पनेचे आपल्याला असलेले ज्ञान अभिप्रेत असते. घोडेपणा हे जे सामान्य आहे ते ज्या विशिष्ट वस्तूच्या ठिकाणी अवतरलेले असते किंवा मूर्त झालेले असते ती विशिष्ट वस्तू म्हणजे विशिष्ट घोडा होय. हे सामान्य अनेक विशिष्ट वस्तूंच्या ठिकाणी अवतरणे शक्य असल्यामुळे आणि प्रत्यक्षात अवतरत असल्यामुळे अनेक विशिष्ट घोडे असणे शक्य असते आणि प्रत्यक्षात अनेक घोडे असतात. आता प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे हे जे सामान्य घोडेपण असते ते इंद्रियगोचर नाही; ते दिसत नाही. दिसतात ते विशिष्ट घोडे. हे सामान्य घोडेपण ज्या ज्ञानशक्तीला अवगत होते, ज्या ज्ञानशक्तीद्वारा आपण तिचे ग्रहण करतो ती ज्ञानशक्ती म्हणजे विवेकशक्ती (रीझन) होय. इंद्रियसंवेदनाच्या शक्तीहून भिन्न असलेली ही दुसरी ज्ञानशक्ती माणसाच्या अंगी असते.

एका सामान्याचा 'घोडेपण' असा उल्लेख आपण केला. घोडेपण म्हणजे सर्व विशिष्ट घोडयांच्या ठिकाणी समान असलेला अमूर्त (ॲब्स्ट्रॅक्ट) धर्म होय, अनेक घोड्यांच्या स्वरूपांची तुलना करून त्यांच्यात जे समान धर्म आढळतात त्यांचे ग्रहण

करून (आणि भिन्न भिन्न असलेले गुण वर्ज्य करून) म्हणजे ह्या समान धर्मांचे अपकर्षण (ॲब्स्ट्रॅक्शन) करून - आपण 'घोडेपण' ही संकल्पना बनवितो असे सामान्यपणे म्हणण्यात येते. प्लेटोला अभिप्रेत असलेले घोडेपण म्हणजे अशी सामान्य संकल्पना किंवा तिचा आशय आहे आणि विवेकशक्ती म्हणजे अपकर्षणाने सामान्य धर्मांच्या संकल्पना बनविण्याची शक्ती असे आपल्याला वाटेल. पण असे नाही. प्लेटोला अभिप्रेत असलेले घोडेपण हे एक सामान्य आहे खरे; पण तो सामान्य धर्म नाही. ती सामान्य (आणि परिपूर्ण) असलेली वस्तू आहे; घोडेपण म्हणजे परिपूर्ण असा, इंद्रियातीत पण विवेकग्राह्य असा घोडा आहे.

प्लेटोला काय म्हणायचे आहे हे गणिताच्या संदर्भात स्पष्ट करता येईल. किंबहुना विवेकशक्तीला प्रतीत होणाऱ्या गोष्टी, त्यांच्याविषयी विवेक प्राप्त करून घेत असलेले ज्ञान ह्यांच्याविषयी जेव्हा प्लेटो विवेचन करतो तेव्हा गणिती ज्ञानाचे विशेषत: भूमितीचे 'मॉडेल' त्याच्यापुढे होते. विवेकाधिष्ठित ज्ञानाची (रॅशनल नॉलेज) त्याची संकल्पना ह्या मॉडेलचे सामान्यीकरण केल्याने प्राप्त होते.

भूमितीत आपण त्रिकोणाविषयीचे सिद्धान्त सिद्ध करतो. उदा. त्रिकोणाच्या सर्व कोनांची बेरीज दोन काटकोनांएवढी असते. हा सिद्धान्त सिद्ध करण्यासाठी आपण त्रिकोणाच्या काढलेल्या आकृतींचे साह्य घेतो; फळ्यावर किंवा कागदावर काढलेल्या आकृतींचे. ह्या आकृतीविषयी, त्यांचा निर्देश करीत केलेल्या युक्तिवादांनी आपला इष्ट सिद्धान्त आपण सिद्ध करतो. पण आपल्याला हे माहीत असते की ज्या विशिष्ट आकृतीविषयी आपण युक्तिवाद करीत असतो त्या आकृतीविषयी हा सिद्धान्त सिद्ध करण्यात आलेला नसतोच; एकतर ही आकृती म्हणजे पक्का त्रिकोण नसतोच; त्रिकोणाची आपण जी व्याख्या केलेली असते त्या बरहुकूम, तंतोतंत हा त्रिकोण नसतो. त्रिकोणाची व्याख्या अशी की तीन रेषांनी बंदिस्त असलेली आकृती म्हणजे त्रिकोण आणि रेषेची आकृती अशी की तिला लांबी असते पण रुंदी नसते. फळ्यावर किंवा कागदावर आपण जी रेषा काढतो तिला किंचित् तरी रुंदी असतेच, ती खरीखुरी रेषाच नसते आणि म्हणून आपल्यासमोर असलेला त्रिकोण, ज्याच्याविषयी आपण बोलत आहोत असे आपल्याला वाटत असते तो त्रिकोण हा त्रिकोणच नसतो.

मग काय घडत असते? आपल्यासमोर जो दृश्य त्रिकोण असतो त्याच्या माध्यमातून आपण जो परिपूर्ण त्रिकोण असतो- ज्याची व्याख्या भूमितीत केलेली असते - त्या त्रिकोणाविषयी युक्तिवाद करीत असतो, त्याच्याविषयी सिद्धान्त सिद्ध करीत असतो. हा त्रिकोण इंद्रियांना ज्ञात होत नसतो; तो विवेकाला प्रतीत होत असतो. तो (त्रिकोण म्हणून) परिपूर्ण असतो. तो शाश्वत, अपरिवर्तनीय असतो. फळ्यावरचा दृश्य त्रिकोण पुसून टाकता येतो किंवा त्याच्यात बदल करता येतो, त्याचा चौकोन करता येतो इ. पण जो परिपूर्ण, विवेकग्राह्य त्रिकोण आहे तो नित्य आणि अपरिवर्तनीय असतो. ह्या विवेकग्राह्य परिपूर्ण त्रिकोणाला प्लेटो त्रिकोणाचे रूप (Form of a Triangle किंवा Idea of a Triangle) असे म्हणतो. पण फॉर्म ऑफ ए ट्रँगल म्हणजे त्रिकोणाचा फॉर्म (आकार) नव्हे तर त्रिकोण हा जो फॉर्म आहे तो. फॉर्म (ह्या संदर्भात रूप) म्हणजे विवेकग्राह्य आणि नित्य व परिपूर्ण असलेली वस्तू. हे रूप ही एक सामान्यवस्तू असते. इंद्रियगोचर जगात तिची अनेक (अपरिपूर्ण अशी) उदाहरणे असतात. घोड्याच्या रूपाची (घोडा ह्या रूपाची) अशी इंद्रियगोचर, अपूर्ण उदाहरणे म्हणजे विशिष्ट, दृश्य घोडे होत. त्रिकोण—रूपाची इंद्रियगोचर उदाहरणे म्हणजे विशिष्ट त्रिकोण होत. इंद्रियगोचर विशिष्ट त्रिकोण हे त्रिकोण-रूपाचे स्मारक असतात; ते विवेकशक्तीला शुद्ध, परिपूर्ण अशा त्रिकोण-रूपाचे स्मरण करून देतात. म्हणजे अशा ऐंद्रिय ज्ञानाने विवेकशक्तीला चालना मिळते, ती प्रेरित होते आणि शुद्ध त्रिकोणरूपांचे ती ग्रहण करते; परिपूर्ण त्रिकोणरूप तिला अवगत होते.

विवेकशक्तीला ज्याप्रमाणे अशा परिपूर्ण रूपांचे (फॉर्म्स) साक्षात् बौद्धिक दर्शन होते, त्याचप्रमाणे अशा रूपांमधील संबंधांचेही तिला साक्षात् बौद्धिक दर्शन होते. [अशा साक्षात् बौद्धिक दर्शनाला प्रातिभज्ञान किंवा प्रतिभान (intuition) म्हणूया.] नित्य अशा रूपांमधील ह्या नित्य संबंधांवर नित्य आणि अनिवार्य (necessary) अशी सत्ये आधारलेली असतात. ह्या अनिवार्य सत्यांचे ग्रहण विवेकशक्ती करते. भूमितीत जी प्रमाणके (axioms) स्वीकारलेली असतात त्यांचा अशा अनिवार्य सत्यांची उदाहरणे म्हणून निर्देश करता येईल. उदा. एकाच वस्तूशी समान असलेल्या दोन वस्तू परस्परांशी समान असतात. ही सत्ये जशी अनिवार्य असतात, म्हणजे ती अवश्यमेव सत्य असतात, ती सत्य नसणे अशक्य असते त्याप्रमाणे ती सार्विक (universal) असतात; त्यांना अपवाद असणे अशक्य असते. उदा. एकाच वस्तूशी समान असलेल्या **कोणत्याही** दोन वस्तूंविषयी त्या परस्परांशी समान असल्याच पाहिजेत हे सत्य असते. विवेकशक्ती अशा अनिवार्य आणि सार्विक सत्यांचे ग्रहण करते आणि त्यांच्यापासून निगमनाने (deduction),

युक्तिवादाने, इतर सत्ये अवगत करून घेते. मूळच्या अनिवार्य सत्यांपासून इतर काही सत्ये अनिवार्यतेने निष्पन्न होतात ह्याचे साक्षात् बौद्धिक दर्शन — प्रातिभज्ञान — विवेकाला होते. ह्याच्या आधारावर मूळच्या सत्यांपासून अनिवार्यतेने निष्पन्न होणाऱ्या इतर सत्यांचे ज्ञान विवेकशक्ती प्राप्त करून घेते. विवेकाधिष्ठित ज्ञानात व्यवस्था असते. नित्य अशा रूपांचे प्रातिभज्ञान, त्यांच्या स्वरूपांविषयीची आणि परस्परसंबंधाविषयीची प्रतिभानाने ज्ञात होणारी अनिवार्य सत्ये (प्रमाणक), त्यांच्यापासून पायरी पायरीने अनिवार्यतेने निष्पन्न होणारी इतर अनिवार्य सत्ये अशा उतरंडीच्या स्वरूपाची ही व्यवस्था असते.

विवेकाधिष्ठित (रॅशनल) ज्ञानाचे हे 'मॉडेल' प्लेटोला निगामी भूमितीत मूर्त झालेले आढळले. इंद्रियगम्य वस्तूविषयीचे असे सुव्यवस्थित, सुप्रतिष्ठित ज्ञान तेव्हा अस्तित्वात नव्हतेच. (आज विज्ञानाच्या रूपाने ते अस्तित्वात आहे.) शिवाय असे ज्ञान कसे प्राप्त करून घ्यावे ह्याच्या पद्धतीची कल्पनाही कुणाला नव्हती. तेव्हा प्लेटोने असा निष्कर्ष काढला की खरेखुरे ज्ञान हे विवेकाला प्रतीत होणाऱ्या नित्य, अपरिवर्तनीय अशा रूपांविषयीच असते. इंद्रियगोचर वस्तू अस्थिर, चंचल अशा स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांचे ज्ञान असू शकत नाही. त्यांचे प्रत्यय आपल्याला येतात, त्यांच्यात कोणते बदल घडून येतील ह्याचे काही अंदाज आपण बांधू शकतो. पण ह्या प्रत्ययांना आणि अंदाजांना ज्ञानाचा दर्जा, ज्ञानाची प्रतिष्ठा असू शकत नाही. इंद्रियगोचर वस्तू ज्ञानाच्या पातळीखाली असतात. त्यांच्याविषयी येणाऱ्या अनुभवांच्या आधारे त्यांच्याविषयीच्या काही समजुती आपण बाळगतो. पण त्यांच्याविषयी खरेखुरे ज्ञान आपल्याला किंवा कुणाला असू शकत नाही. खरेखुरे ज्ञान अनिवार्यतेने सत्य असलेले ज्ञान विवेकाधिष्ठितच असते आणि ते विवेकाला प्रतीत होणाऱ्या नित्य, अपरिवर्तनीय अशा रूपांविषयी असते.

हे झाले ज्ञानाच्या संदर्भातील विवेकशक्तीचे स्वरूप आणि कार्य. पण प्लेटोप्रणीत विवेकशक्तीला अध्यात्मिक आणि नैतिक अंगेही आहेत. तिचे अध्यात्मिक अंग असे : इंद्रियगोचर, विशिष्ट अशा वस्तू, उदा. विशिष्ट त्रिकोण, परिपूर्ण (perfect) नसतात हे आपण पाहिलेच आहे. परिपूर्ण असे जे सामान्य त्रिकोण-रूप आहे ते अनेक विशिष्ट, इंद्रियगोचर त्रिकोणांत अवतरत असल्यामुळे, किंवा मूर्त होत असल्यामुळे ते त्रिकोण (बनलेले) असतात. आणि हे सामान्य त्रिकोण-रूप त्यांच्यात अपूर्णतेने अवतरत असल्यामुळे ते अपूर्ण त्रिकोण असतात. म्हणजे ते खरेखुरे त्रिकोण नसतात. त्रिकोण-रूप हा खराखुरा त्रिकोण होय, तो सत् (real) असा त्रिकोण असतो. त्रिकोण-रूप हे सत्‌रूप असते. दृश्य त्रिकोण (पूर्णपणे) सत् नसतात. ते नाहीत असे नाही म्हणून ते असत् नसतात. पण त्रिकोण-रूपाप्रमाणे ते सत्‌रूप ही नसतात. सत् आणि असत् ह्यांच्यामध्ये त्यांची स्थिती असते. पूर्णपणे सत् असलेल्या त्रिकोण-रूपाच्या अपूर्णतेने, अर्धवटपणे सत् असलेल्या अशा त्या प्रतिमा (copy) किंवा प्रतिबिंबे असतात.

सारांश विवेकाला प्रतीत होणारी वस्तुरूपे ही सत्‌रूपे असतात. ही सत्‌रूपे म्हणजे सत्तेचे (reality) क्षेत्र, खऱ्याखुऱ्या अस्तित्वाचे क्षेत्र व म्हणून खऱ्याखुऱ्या ज्ञानाचे क्षेत्र होय. सत्‌रूपाच्या अर्धवट सत् असलेल्या प्रतिमांचे, म्हणजे इंद्रियगोचर वस्तूंचे क्षेत्र हे सत्तेचे, खऱ्याखुऱ्या अस्तित्वाचे क्षेत्र नव्हे, ते भवनाचे (becoming) क्षेत्र असते. इंद्रियगोचर वस्तू खऱ्याखुऱ्या अर्थाने असत नाहीत, त्या घडत असतात, अस्थिर, सतत परिवर्तनशील अशा असतात. म्हणून त्या ज्ञानाचे विषय होऊ शकत नाहीत, त्या अस्थिर समजुतीचे विषय असतात.

आता सत्‌रूपांचे क्षेत्र घेतले तर त्याच्यात विवेकाधिष्ठित व्यवस्था असते. ज्याप्रमाणे सर्व इंद्रियगोचर त्रिकोणांत त्रिकोण हे सत्‌रूप मूर्त झालेले असते त्याप्रमाणे त्रिकोण, चौकोन, पंचकोन,... इ. विविध प्रकारच्या आकृतींत, आकृती हे अधिक सामान्य असे सत्‌रूप मूर्त झालेले असते. विशिष्ट (इंद्रियगोचर) त्रिकोण ही ज्याप्रमाणे त्रिकोण ह्या सामान्य सत्‌रूपाची भिन्न उदाहरणे असतात त्याप्रमाणे. त्रिकोण हे सत्‌रूप, चौकोन हे सत्‌रूप... ही सर्व सत्‌रूपे आकृती ह्या सामान्यतर सत्‌रूपाची भिन्न उदाहरणे आहेत. किंवा घोडेपण, हत्तीपण, माणूसपण इ. सत्‌रूपे ही प्राणीपण ह्या सामान्यतर सत्‌रूपाची भिन्न उदाहरणे आहेत. तेव्हा सत्‌रूपांच्या विश्वात (सामान्य) सत्‌रूपे, त्यांच्या वरच्या स्तरावर असलेली सामान्यतर सत्‌रूपे, त्यांच्या अपेक्षेने वरच्या स्तरावर असलेली अधिकच सामान्य सत्‌रूपे, अशी उतरंडीच्या स्वरूपाची व्यवस्था आहे. तत्त्ववेत्ता (जिज्ञासू) खालच्या स्तरावरील सत्‌रूपांचे आकलन करून मग त्याच्यावरच्या स्तरांवरील सत्‌रूपांचे आकलन करतो, मग त्यांच्यावरच्या स्तरांवरील सत्‌रूपांचे आकलन करतो, मग त्याच्यावरच्या (उदा. मनुष्यपणाचे यथार्थ आकलन करण्यासाठी प्राणीपणाचे आकलन करावे लागते आणि प्राणीपणात अंतर्भूत असलेली सामान्य तत्त्वे कोणत्या विशिष्ट स्वरूपात मनुष्यपणाचे स्वरूप निर्धारित करतात ह्याचे आकलन केले पाहिजे. थोडक्यात प्राणी म्हणजे काय हे नीट

समजल्याशिवाय मनुष्य म्हणजे काय हे नीट समजणार नाही.) ह्या उतरंडीत सर्वोच्च स्थानी जे सामान्यतम सत्‌रूप आहे त्याला प्लेटो शिवसत्‌रूप (Form of the Good) म्हणतो. खालच्या स्तरावरील सत्‌रूपांच्या ज्ञानापासून प्रारंभ करून वरच्या आणि त्याच्या वरच्या स्तरावरील सत्‌रूपांच्या ज्ञानापर्यंत आरोहण करीत करीत अखेरीस तत्त्ववेत्ता जेव्हा ह्या प्रवासाच्या अखेरच्या टप्प्यावर येऊन ठेपतो तेव्हा त्याला शिव-सत्‌रूपाचे साक्षात् बौद्धिक दर्शन—प्रातिभज्ञान—होते. हे शिवसत्‌रूप स्वयंभू आहे, म्हणजे स्वत: सिद्ध आहे, ते अनिवार्यतेने अस्तित्वात असते; आणि इतर सर्व सत्‌रूपे त्याच्यापासून अनिवार्यतेने निष्पन्न होतात. आपल्या दृश्य जगात सूर्याचे जे स्थान आहे त्याच्याशी सत्‌रूपांच्या विश्वात शिव-सत्‌रूपाच्या असलेल्या स्थानाची तुलना करतो. दृश्य जगात जे काही आहे त्याची धारणा करणारी ऊर्जा अखेरीस त्याला सूर्याकडून प्राप्त झालेली असते. म्हणजे दृश्य जगातील सर्व वस्तूंचे अस्तित्व अखेरीस सूर्यावर अवलंबून असते; सूर्यावर आधारलेले असते. आणि या जगातील वस्तू सूर्याकडून लाभणाऱ्या प्रकाशामुळे दृश्य होतात; सूर्य प्रकाशामुळे त्यांचे (समजुती ह्या स्वरूपातील) ज्ञान आपल्याला होते. ह्याचप्रकारे सत्‌रूपांच्या विश्वात सर्व सत्‌रूपांचे अस्तित्व शिव-सत्‌रूपावर आधारलेले असते, शिव-सत्‌रूपापासून इतर सर्व सत्‌रूपे निष्पन्न होत असतात आणि त्यांची ज्ञेयता, ज्ञानाचे विषय होण्याची त्यांची क्षमता, त्यांची विवेकानुसारिता (rationality) त्यांना शिव-सत्‌रूपापासून प्राप्त झालेली असते.

सर्व सत्‌रूपे शिव-सत्‌रूपापासून निष्पन्न होत असल्यामुळे, त्याच्यात सहभागी होत असल्यामुळे ती सर्व शिव असतात, चांगली असतात. सत्‌रूपांचे जग हे खरेखुरे जग आहे आणि हे खरेखुरे जग पूर्णपणे चांगले आहे. ते सत् आहे म्हणून शिव आहे. त्याचे अंतिम आधारतत्त्व असलेले जे शिव-सत्‌रूप आहे ते परिपूर्ण असे तत्त्व (अस्तित्व) आहे आणि त्याचे तत्त्ववेत्त्याला जे साक्षात् दर्शन होते ते म्हणजे मानवी जीवनाचे सर्वोच्च श्रेय आहे. इंद्रियगोचर जग हे सत्‌रूपांच्या जगाचे अपूर्ण प्रतिबिंब आहे. ज्या प्रमाणात हे इंद्रियगोचर जग सत्‌रूपांच्या जगाचे प्रामाणिक प्रतिबिंब असते त्या प्रमाणात ते चांगले असते. पण त्याच्यात अर्थात् चांगल्या - वाईटाची भेसळ असते. ह्या जगापासून आपली दृष्टी, ज्ञानशक्ती वळवून ती सत्‌रूपांच्या जगावर केंद्रित करणे, सत्‌रूपांच्या विवेकाधिष्ठित (rational) ज्ञान मिळविणे आणि अखेरीस अंतिम सत्तत्त्वाचे - शिव-सत्‌रूपाचे साक्षात् दर्शन प्राप्त करून घेणे ही साधना हे विवेकशील (rational) जीवनाचे सार आहे. मानवी जीवनाविषयीचा हा अध्यात्मिक दृष्टिकोन आहे हे उघड आहे. भारतीय परिभाषेत हा मोक्षाचा ज्ञानमार्ग आहे.

हे झाले विवेकशक्तीचे अध्यामिक अंग. तिचे नैतिक अंग असे : सत्‌रुपांचे ज्ञान प्राप्त करून देणारी विवेकशक्ती माणसाच्या ठिकाणी आहे हे उघड आहे. त्याचप्रमाणे इंद्रियगोचर वस्तूंचे अनुभव करून देणारी संवेदनशक्ती आणि ह्या अनुभवांशी निगडीत असलेल्या इच्छा-वासना हाही मानवी प्रकृतीचा, माणुसकीचा, माणूसपणाचा घटक आहे. (माणसाचे खरे स्वरूप काय आहे हे 'माणूसपण' ह्या सत्‌रूपांचे विवेकाधिष्ठित ज्ञान ज्याने प्राप्त करून घेतले आहे त्या तत्त्ववेत्त्यालाच समजते.) समग्र वस्तुजात घेतले तर विवेकाला प्रतीत होणाऱ्या सत्‌रूपांचे जग आणि इंद्रियगोचर वस्तूंचे जग असे त्याचे जे दोन भाग आहेत त्यांना अनुसरून माणसाच्या प्रकृतीचेही ह्या दोन घटकांत विभाजन झाले आहे. इंद्रियगोचर वस्तूंशी निगडित असलेल्या इच्छा-वासना ह्या विशिष्ट, आंधळ्या, आत्मकेंद्री असतात. प्रत्येक वासना स्वत:च्या समाधानासाठी धडपडत असते. ह्या वासना परस्परविरोधीही असतात. केवळ ह्या वासनांचे समाधान हे सबंध मानवी व्यवहाराचे उद्दिष्ट राहिले तर जीवन पूर्णपणे अव्यवस्थित, गोंधळलेले होईल. तेव्हा ह्या वासनांचे नियमन होणे आवश्यक असते. ही नियामकशक्ती म्हणजे विवेकशक्ती होय. माणसाला अखेरीस सुख पाहिजे असते; आपले भले व्हावे ही त्याची इच्छा असते. खऱ्या सुखाचे स्वरूप, आशय काय आहे, खरेखुरे श्रेय कशात असते, कोणत्या गोष्टी किती प्रमाणात खरोखर चांगल्या आहेत ह्याचे यथार्थ ज्ञान विवेकाला असते. ऐंद्रिय वासना विशिष्ट असतात. उलट विवेकशक्तीला सार्विक (universal) तत्त्वे प्रतीत होतात हे आपण पाहिले आहे. दुसऱ्याही अर्थाने विवेकाधिष्ठित (rational) ज्ञान सार्विक असते. इंद्रियगोचर वस्तूविषयीचे भिन्न व्यक्तींचे अनुभव भिन्न असतात. त्यांच्यात एकमत नसते. म्हणून सार्विक प्रामाण्य नसते. उलट विवेक सत्‌रूपांचे यथार्थ ग्रहण करतो. सत्‌रुप जसे असते तसे त्याचे ज्ञान विवेकाला होते. त्यामुळे कोणत्याही दोन व्यक्तींना झालेले विवेकाधिष्ठित ज्ञान समान एकसारखे असते. विवेकाधिष्ठित ज्ञानाच्या ठिकाणी सार्विक प्रामाण्य असते.

ह्यामुळे मानवी जीवनाचे, व्यवहाराचे दिग्दर्शन आणि नियमन करण्याचा विवेकशक्तीला अधिकार असतो. जीवनाचे खरे श्रेय, साफल्य कशात आहे हे विवेकशक्ती निश्चित करते आणि ते संपादन करायला व्यक्तीला उद्युक्त करते. ज्या प्रमाणात ऐंद्रिय वासनांचे समाधान ह्या श्रेयाशी सुसंगत असेल आणि ह्या श्रेयाचा घटक असेल त्या प्रमाणातच त्यांचे समाधान करण्याची अनुज्ञा विवेकशक्ती देते. सार्विक तत्त्वांच्या साह्याने विशिष्ट वासनांना ती मर्यादा घालते, आवर घालते. ह्या

स्वरूपाचे जीवन हे चांगले, श्रेयस्कर जीवन किंवा नैतिक जीवन होय. सारांश प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे खरेखुरे नैतिक जीवन हे विवेकाधिष्ठित जीवन असते. हे विवेकशक्तीचे नैतिक अंग होय.

विवेकशक्तीची ही प्लेटोप्रणीत संकल्पना ॲरिस्टॉटलने बऱ्याच अंशी स्वीकारली आणि काही अंशी तिला मुरड घातली. एकंदरीत नंतरच्या ग्रीक तत्त्वज्ञानात ती स्थिरावली. आधुनिक काळात विवेक, विवेकशीलता (rationality) ह्याविषयी जो विचार झाला आहे त्याची ही संकल्पना म्हणजे पार्श्वभूमी आहे. ह्या संकल्पनेचे सार थोडक्यात असे मांडता येईल : १. विवेकशक्ती ही इंद्रियसंवेदनशक्तीहून भिन्न अशी ज्ञानशक्ती आहे. २. इंद्रियगोचर वस्तूंच्या पलिकडे असलेल्या वास्तवतेचे, सत्तेचे (reality) ज्ञान ही शक्ती प्राप्त करून देते. ३. हे ज्ञान सार्विक आणि अनिवार्य अशा सत्यांचे असते. इंद्रियानुभवाने सार्विक आणि अनिवार्य सत्ये सिद्ध करता येत नाहीत. ज्या वस्तूंचा अनुभव आपल्याला आला आहे, (ज्या वस्तूंचे निरीक्षण करण्यात आले आहे) त्या आणि तेवढ्या वस्तूंविषयीचे ज्ञान इंद्रियानुभवापासून मिळते. सार्विक सत्ये अशा मर्यादित सत्यांपलीकडे जातात हे उघड आहे. वस्तूंचा जो अनुभव येतो त्यावरून त्या प्रत्यक्षात कशा आहेत एवढेच ज्ञान होते. त्या जशा आहेत तशा त्या असल्याच पाहिजेत, तशा त्या असणे अनिवार्य आहे हे ज्ञान अनुभव देऊ शकत नाही. सार्वत्रिक आणि अनिवार्य अशा सत्यांचे ज्ञान फक्त विवेकशक्ती देऊ शकते. तेव्हा विवेकाधिष्ठित ज्ञान हे खरेखुरे ज्ञान आहे. इंद्रियानुभवावर आधारलेले ज्ञान कनिष्ठ दर्जाचे असते, ते 'ज्ञान' ह्या संज्ञेला पात्र नसते. ४. विवेकशक्ती ज्याप्रमाणे खरेखुरे ज्ञान प्राप्त करून देते त्याप्रमाणे जीवनाचे नियमन करण्याचा अधिकारही तिला आहे. मानवी जीवनाचे अंतिम व संपूर्ण श्रेय ती निश्चित करते आणि अनिवार्यतेने प्रमाण असे सार्विक (नैतिक) नियम ती घालून देते. असे श्रेय संपादन करण्यासाठी ह्या नियमांना अनुसरून जगण्यात येणारे जीवन हे नैतिक, चांगले जीवन असते. विवेकशक्ती ही ज्ञानशक्ती आहे. त्याप्रमाणे ती नैतिक नियमनाचीही शक्ती आहे. नैतिक दिग्दर्शनाचा आणि नियंत्रणाचा अधिकार तिला आहे.

तपशीलवार, सुव्यवस्थित अशा विवेकाधिष्ठित ज्ञानाचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून प्लेटोच्या काळात फारतर भूमितीकडे बोट दाखविता आले असते. पण निम्न स्तरावरील सत्रूपापासून उच्चतर स्तरावरील सत्रूपाकडे आरोहण करणे आणि मग त्याच्याहून उच्च स्तरावर जाणे आणि असे करीत शिव-सत्रूपाचे प्रातिभज्ञान मिळविणे, नंतर ह्या सत्रूपांपासून इतर सर्व सत्रूपे क्रमाक्रमाने निगमनाने प्राप्त करून घेणे हा प्लेटोचा कार्यक्रम केवळ एक कार्यक्रम राहिला. तो पार पाडता आला नाही आणि पार पाडता येणे शक्यही नव्हते. ॲरिस्टॉटलने ज्याला प्लेटोवादी म्हणता येईल असा दृष्टिकोन स्वीकारून पण प्लेटोच्या सिद्धान्तांना महत्त्वाची मुरड घालून भौतिकी, गतिशास्त्र, जीवशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र आणि अतिभौतिकी (metaphysics) इ. शास्त्रांची रचना केली. विश्वाचा एक नकाशा आणि विश्वाच्या विविध प्रांताचे ज्ञान करून देणाऱ्या शास्त्रांचा एक व्यूह त्याने प्रस्थापित केला. एका सुव्यवस्थित, अर्थपूर्ण विश्वात आपण जगतो आणि स्वत:च्या प्रकृतीला अनुसरून अर्थपूर्ण, सफल ठरेल असे जीवन माणसाला जगता येते ह्या स्वरूपाचा विश्वास त्याने माणसांना दिला. (पण भौतिक किंवा निसर्गविषयक शास्त्रापुरते पाहिले तर ॲरिस्टॉटलची शास्त्रे आता केवळ इतिहासात जमा झाली आहेत. त्यांच्यात आणि आधुनिक विज्ञानात सातत्याचा धागा नाही. पण ॲरिस्टॉटलमुळे विश्वाचे सम्यक् ज्ञान प्राप्त करून देणारी आणि व्यावहारिक जीवनाची नियामक असणारी अशी विवेकशक्ती आहे ही संकल्पना रुढ झाली.)

ग्रीक बौद्धिक संस्कृतीने प्रभावित झालेल्या क्षेत्रात जेव्हा ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला तेव्हा विवेकशक्ती ही जीवनाची श्रेष्ठ नियामक शक्ती आहे ह्या संकल्पनेला विरोध करणारा एक वेगळा दृष्टिकोन प्रस्थापित होऊ लागला. हा दृष्टिकोन असा की विश्वाविषयीची आणि मानवी जीवनाविषयीची अंतिम सत्ये श्रद्धेला प्रतीत होतात आणि श्रद्धेने स्वीकारावी लागतात. मानवी विवेकशक्तीपलिकडे जाणारी ही सत्ये मानवाच्या कल्याणासाठी ईश्वर प्रकट करतो. ह्या ईश्वरी प्रकटनावर (revealation) श्रद्धा ठेवून ही सत्ये स्वीकारायची असतात आणि त्यांना अनुसरून जगायचे असते. उदा. ईश्वराने ही सृष्टी शून्यातून निर्माण केली, माणसाला (मानवी आत्म्याला) स्वत:ची प्रतिमा म्हणून निर्माण केले, त्याची नंदनवनात स्थापना केली, ईश्वराने घालून दिलेल्या मर्यादेचे आदिमानवाने उल्लंघन केले, हे पाप होय, ह्याची शिक्षा म्हणून जगात मृत्यू आणि कष्ट आले, हे आदिम पाप परंपरेने सर्व माणसांच्या आत्म्यांत भिनलेले असते आणि योग्य शिक्षा म्हणून माणसाला मृत्यूनंतर अनंत कालपर्यंत नरकयातना भोगाव्या लागतात, पण माणसाच्या पापाचे क्षालन करण्यासाठी ईशपुत्र (आणि ईश्वर) असलेल्या येशू ख्रिस्ताने आत्मबलिदान केले, आदिम पापाने भ्रष्ट, कलुषित झालेली मानवी प्रकृती निरामय केली, जो येशू ख्रिस्तावर माणसाचा तारणकर्ता म्हणून श्रद्धा ठेवतो, त्याची आणि त्याच्यामार्फत ईश्वराची उपासना करतो, हातून झालेल्या

पापांविषयी खराखुरा पश्चात्ताप करतो आणि ईश्वराची क्षमायाचना करतो तो पापापासून मुक्त होतो आणि ईश्वराच्या प्रसादाचा धनी होतो, इत्यादी. ही सत्ये ईश्वराने प्रकट केल्यामुळेच माणसाला कळतात, विवेकशक्तीचा उपयोग करून ती सिद्ध करता येत नाहीत, ती श्रद्धेने स्वीकारावी लागतात, किंबहुना आपण ती श्रद्धेने स्वीकारतो ह्यातून ईश्वरी प्रसाद आपल्याला लाभला आहे ह्याची खूण आपल्याला मिळते. कारण आदिम पापामुळे मानवी प्रकृती इतकी भ्रष्ट झाली आहे की तिला फिरून निरामय बनविणारी ही सत्ये स्वीकारण्याची प्रवृत्ती आपल्यात ईश्वराच्या प्रसादाशिवाय निर्माणच झाली नसती. ह्या सत्यांच्या प्रकाशात ख्रिस्ताचे अनुकरण करीत जगणे म्हणजे चांगल्या प्रकारे जगणे होय. चांगल्या मानवी जीवनाचे स्वरूप आणि आशय काय आहे ह्याचे दिग्दर्शन करणे हे विवेकशक्तीचे कार्यक्षेत्र नव्हे. ते श्रद्धेचे कार्यक्षेत्र आहे.

सारांश, विश्वाच्या आणि मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी एक गूढ आहे, ह्या गूढाचा भेद मानवी ज्ञानशक्तीला किंवा विवेकशक्तीला करता येत नाही, माणसावरील कृपेमुळे ईश्वर हे गूढ प्रकट करतो आणि हे ईश्वरी प्रकटन श्रद्धेने स्वीकारायचे असते. उलट विवेकवादाची भूमिका अशी की हे वस्तुजात विवेकानुसारी (rational) आहे, ते विवेकशक्तीला केवळ पारदर्शक आहे, त्यात अनाकलनीय गूढ असे काही नाही. ग्रीक सांस्कृतिक परिसरात ख्रिस्ती धर्म स्थिर झाल्यानंतर विवेकशक्ती विरुद्ध श्रद्धा हे नवीन द्वंद्व निर्माण झाले. (ग्रीक बौद्धिक परंपरेत जे द्वंद्व होते ते विवेकाधिष्ठित (rational) ज्ञान विरुद्ध इंद्रियसंवेदनांपासून लाभलेले आनुभविक (empirical) ज्ञान ह्या स्वरूपाचे होते हे आपण पाहिले आहे.) ह्या नवीन द्वंद्वाच्या संदर्भात टोकाची श्रद्धावादी भूमिका अशी की विवेकशक्तीच्या दृष्टीने जे विपरीत (ॲब्सर्ड) आहे ते श्रद्धेने स्वीकारण्यात श्रद्धेच्या सत्त्वाची कसोटी लागते. पण मध्ययुगीन स्कोलॅस्टिक तत्त्वज्ञानात विवेकशक्ती आणि श्रद्धा ह्यांत एक प्रकारचा समन्वय सेन्ट टॉमस ॲक्वायनस ह्यांनी घडवून आणला.

हा समन्वय असा की विवेकशक्ती आणि श्रद्धा ह्यांत विरोध नसतो. श्रद्धा विवेकशक्तींशी सुसंगत असते आणि तिला पूरक असते. ह्यामुळे ती विवेकशक्तीहून श्रेष्ठ आहे. सृष्टीविषयीचे आणि तिच्या पलिकडे असलेल्या ईश्वराविषयीचेही ज्ञान विवेकशक्ती माणसाला प्राप्त करून देते. हे सम्यक्, प्रमाण ज्ञान असते. पण ह्याच्यापलीकडे असलेले ज्ञान श्रध्देपासून प्राप्त होते. उदा. ईश्वर सृष्टीचा निर्माता आणि नियामक आहे. हे ज्ञान विवेकशक्ती आपल्याला करून देते. पण वर उल्लेखिलेली जी अध्यात्मिक सत्ये आहेत — ख्रिस्त ईशपुत्र आहे. तो आत्मबलिदानाने माणसाची पापापासून निष्कृती करतो, इत्यादी — ही सत्ये विवेकशक्तीला गवसणारी सत्ये नव्हत. ती प्रकटनापासूनच प्राप्त होतात पण विवेकशक्तीला प्राप्त झालेल्या सत्यांशी ती विसंगत नसतात. तसेच चांगले मानवी जीवन कसे असते ह्याची रूपरेखा विवेकशक्ती सादर करते. उदा. मानवी प्रकृतीचे जे सार (essence) आहे—काही मनःशक्ती, प्रेरणा आणि वासना ह्यांचे मिळून बनलेले, ज्याच्यात माणसाचे माणूसपण सामावलेले असते—त्या साराचा यथायोग्य विकास करून, ह्या विकसित मनःशक्ती इत्यादींचा सुसंवादीपणे आनंदमय आविष्कार करीत जगणे म्हणजे चांगल्या रीतीने जगणे अशी काहीशी चांगल्या जीवनाची व्याख्या ॲरिस्टॉटलने दिली आहे. अशा जीवनात धैर्य, संयम, औदार्य, न्यायीपणा इ. सद्गुणांना, तसेच ज्ञानाची साधना, कलाकृतींची निर्मिती आणि आस्वाद, मैत्रीचा आनंद यांना स्थान असते. पण ख्रिस्ताचे अनुकरण करीत जगणे हे ह्या लौकिक दृष्टीने समाधानी, सफल अशा जीवनापलिकडचे जगणे असते. मनुष्यमात्रावर प्रेम करणे, इतरांच्या कल्याणासाठी स्वतः दुःख भोगणे (vicarious suffering) ह्या वृत्ती अशा जीवनात केंद्रस्थानी असतात. ह्या वृत्तीने जगण्यात माणसाचे सर्वोच्च श्रेय, तारण आहे हे ज्ञान, अशा रीतीने जगण्याची प्रेरणा श्रद्धेपासून लाभते.

सारांश मध्ययुगात विवेकशक्ती आणि श्रद्धा, मूर्त शब्दात ॲरिस्टॉटल आणि बायबल ह्यांचा समन्वय साधण्यात आला. हा समन्वय मूलतःच अस्थिर होता. लौकिक परिपूर्तीचे जीवन जगणे आणि ख्रिस्ताचे अनुकरण करीत जगणे ह्यात नेहमीच सुसंगती असेल असे नाही. (भारतीय परिभाषेत धर्मार्थकामाची साधना आणि मोक्षाची साधना ह्यात पहिले स्थान कोणत्या साधनेला द्यायचे ह्याची निवड करावी लागते.) हा समन्वय आधुनिक काळात ढासळला. विवेकशक्ती आणि श्रद्धा यांमधील द्वंद्व स्पष्ट झाले. पण शिवाय 'विवेकशक्ती' ह्या संकल्पनेत अंतर्भूत असलेल्या भिन्न आणि काहीशा परस्परविसंगत असलेल्या संकल्पनाही उघड झाल्या.

हे का घडले ह्याच्या कारणांविषयी तर्कवितर्क करता येतील. पण ते तर्कवितर्कच राहतील. काय घडले हे बऱ्याच निश्चितपणे सांगता येईल. इंद्रियगोचर वस्तू अव्यवस्थित असतात आणि म्हणून प्रमाण ज्ञानाचे विषय व्हायला त्या पात्र नसतात हे प्लेटोचे मत आपण पाहिले. पण प्लेटोमध्ये दुसरीही एक विचारधारा होती. ती अशी की इंद्रियगोचर वस्तूंचे गुणधर्म, त्यांनी घडणाऱ्या घटना, त्यांचे परस्परसंबंध ह्यांचा आकार (form) गणिती असतो. म्हणजे त्यांचे गणिताच्या

परिभाषेत यथार्थ वर्णन करता येते आणि असे त्यांचे केलेले वर्णन हे सम्यक् वर्णन असते. उदा. ग्रहगोलांची वेळोवेळी निरीक्षणाला आढळलेली जी स्थाने असतील त्या सर्वांना 'वाचविणारा' (save) असा भौमितिक वक्र (geometrical curve), म्हणजे त्या सर्वांना गुंफणारा असा वक्र खगोलशास्त्रज्ञाने शोधून काढला पाहिजे असे प्लेटोने म्हटले आहे. आधुनिक वैज्ञानिक रीतीचे सार ह्या सूत्रात आहे. टोलेमी, कोपर्निकस, गॅलिलिओ, केप्लर इ. खगोलशास्त्रज्ञांनी ह्या सूत्राला अनुसरून आपले ग्रह, पृथ्वी आणि सूर्य ह्यांच्या गतीच्या संबंधांतील संशोधन केले. ग्रहांच्या सूर्याभोवतीच्या गतीचे नियम, पृथ्वीवर वरून खाली पडणाऱ्या वस्तूंच्या गतीचे नियम इ. त्यांनी गणिती सूत्रांच्या स्वरूपात सिद्ध केले. ह्या कामगिरीवर न्यूटनने कळस चढविला. ह्या संशोधकांनी जे गणिती नियम शोधून काढले होते ते सर्व त्याने, काही गणिती गृहीतके (hypothesis) स्वीकारून, त्यांच्यापासून गणिताच्या निगामी (deductive) पद्धतीने निष्पन्न करून दाखविले. आधुनिक गणिती भौतिकीचा आणि अधिक सामान्यपणे गणिती विज्ञानाचा पाया रचला गेला. ह्या सर्व प्रयत्नांतून विज्ञानाची सम्यक् विचारपद्धतीही स्पष्ट झाली. मानवी ज्ञानाच्या इतिहासाच्या क्षेत्रात ही क्रांतिकारक कामगिरी होती. ह्या स्वरूपाचे नेमके, अनुभवाच्या कसोटीवर टिकणारे, आणि ते असे टिकते म्हणूनच स्वीकारार्ह ठरविण्यात आलेले, सुव्यवस्थित आणि विकसनशील ज्ञान पूर्वी कधी कुठे नव्हते.

हे ज्ञान आकाराने (form) गणिती होते आणि म्हणून प्लेटोच्या अर्थाने विवेकाधिष्ठित (rational) होते. पण त्याबरोबरच ह्या ज्ञानाच्या प्रामाण्याचा निकष केवळ आंतरिक नव्हता. त्याचे जे प्रमाणक (axioms) म्हणून स्वीकारण्यात आले होते. त्यांच्यापासून त्याचे सिद्धान्त सुसंगत आणि अनिवार्य अशा निगमनाने निष्पन्न होतात एवढ्यातच त्याचे प्रामाण्य सामावलेले नव्हते. निरीक्षणाने ज्या वस्तुस्थिती (fact) आढळून आल्या होत्या त्यांच्याशी हे सिद्धान्त काटेकोरपणे जुळणारे होते; गृहीतकांपासून ह्या वस्तुस्थिती निगमनाने निष्पन्न करून दाखविण्यात येत होत्या. ह्या गणिती रचनेचे अखेरचे सिद्धान्त म्हणजे ह्या निरीक्षित वस्तुस्थितीच होत्या. अनुभवाला आढळून आलेल्या वस्तुस्थिती आणि गणिती संबंध ह्यांची सुसंगत, दाट वीण असे ह्या ज्ञानाचे स्वरूप होते. तेव्हा ते जितके विवेकाधिष्ठित होते तितकेच अनुभवाधिष्ठितही (empirical) होते. इंद्रियगोचर वस्तू अव्यवस्थित असल्यामुळे त्यांचे विवेकाधिष्ठित ज्ञान होऊ शकत नाही असे प्लेटोचे म्हणणे होते. पण वरवर पाहता अव्यवस्थित, स्वच्छंदी भासणाऱ्या ह्या वस्तूंच्या समुदायाचा गणिती व म्हणून विवेकाधिष्ठित असा आकार असतो आणि अनुभवाचा आधार घेत तो कल्पकतेने उलगडून दाखविता येतो हे आता सिद्ध झाले होते. ह्या स्वरूपाचे वैज्ञानिक ज्ञान हे विवेकाधिष्ठित ज्ञान आहे आणि हे इंद्रियगोचर वस्तूविषयीचे ज्ञान आहे. वैज्ञानिक विचारपद्धती हे विवेकशीलतेचे (rationality) सार आहे.

इंद्रियातीत सत्‌रूपाचे साक्षात प्रतिभानाने ज्ञान प्राप्त करून घेण्याची क्षमता हा विवेकशक्तीतील घटक आता गळून पडला. इंद्रियगोचर वस्तू विवेकशक्तीच्या कक्षेबाहेर, तिच्या खाली आहेत हा विचारही गळून पडला. ह्या वस्तूंकडून लाभणारी इंद्रियसंवेदने ही विवेकाधिष्ठ ज्ञानाची सामग्री (matter) ठरली. त्याचा आकार (form) हा विवेकग्राह्य, गणिती असतो हे मान्य झाले. दुसऱ्या शब्दात हे असे मांडता येईल की इंद्रियगोचर वस्तूंच्या पलिकडे असलेल्या वस्तूंचे, इंद्रियातीत वस्तूंचे अतिभौतिकीय ज्ञान (mataphysical knowledge) विवेकशक्ती प्राप्त करून घेते हा दावा फोल आहे असा निष्कर्ष काढला गेला. अतिभौतिकीय ज्ञान असे काही असते आणि ते विवेकशक्ती देते हा केवळ भ्रम आहे. वैज्ञानिक ज्ञानाच्या गणिती आकाराचा शोध घेणे आणि तो सिद्ध करणे एवढेच ज्ञानाच्या क्षेत्रात विवेकशक्तीचे उचित कार्य आहे. एकच विश्व आहे. इंद्रियगोचर वस्तूंचे. त्याच्या अतीत असलेले असे सत्‌रुपाचे वगैरे विश्व नाहीच. परिपूर्ण ज्ञान म्हणजे ह्या समग्र इंद्रियगोचर विश्वाला गवसणी घालणारे वैज्ञानिक ज्ञान होय. ह्याशिवाय अन्य प्रकारचे ज्ञान नाहीच. हे ज्ञान जितके इंद्रियाधिष्ठित आहे तितकेच विवेकाधिष्ठित आहे हे आपण पाहिले आहे. समग्र (इंद्रियगोचर) विश्वाचे वैज्ञानिक ज्ञान आज उपलब्ध नाही हे खरे. पण हे साध्य म्हणून स्वीकारून ते साधण्याच्या दिशेने सावकाश, प्रसंगी जलद वाटचाल करता येते, विज्ञानाच्या कक्षेत एकेकाळी नसलेल्या वस्तू, वस्तुप्रकार त्याच्या कक्षेत आणता येतात, वैज्ञानिक ज्ञानाचा विस्तार करीत नेता येतो. हा पार पाडता येण्याजोगा आणि काही प्रमाणात, अल्प का होईना पार पडण्यात आलेला कार्यक्रम आहे. पण प्लेटोला अभिप्रेत असलेला, इंद्रियातीत वस्तूंचे विवेकाधिष्ठित ज्ञान मिळविण्याचा कार्यक्रम पार पाडायला प्रारंभही करता येत नाही.

ज्ञानाच्या क्षेत्रात, म्हणजे वस्तुजाताचे स्वरूप काय आहे ह्याचा निर्णय करण्याच्या क्षेत्रात, ज्याप्रमाणे प्लेटोप्रणीत विवेकशक्तीला (इंद्रियातीत वस्तूंचे ज्ञान प्राप्त करून देणाऱ्या ज्ञानशक्तीला) काही कार्य नाही त्याप्रमाणे अध्यात्मिक श्रद्धेलाही काही कार्य नाही. कोणतीही समजूत, विश्वास जर त्यांचा ज्ञानात अंतर्भाव करायचा असेल तर तो इंद्रियानुभवाशी

निदान सुसंगत असला पाहिजे. श्रद्धेने, उदा. ख्रिस्ती श्रद्धेने जे सिद्धान्त प्राप्त होतात ते ह्या निकषाचे समाधान करीत नाहीत. त्यामुळे त्यांचा स्वीकार करायला काही आधार नाही. प्लेटोचे अतिभौतिकीय ज्ञान आणि धार्मिक श्रद्धेपासून प्राप्त होणारे सिद्धान्त केवळ एक कल्पनाजाल आहे. त्याला काही प्रामाण्य नाही.

पण एक प्रश्न उरतो. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे विवेकशक्ती ही केवळ ज्ञान देणारी शक्ती नाही. जीवनाचे नैतिक दिग्दर्शन आणि नियमन करणारी ती शक्ती आहे. वैज्ञानिक ज्ञान म्हणजे विवेकाधिष्ठित ज्ञान आणि वैज्ञानिक ज्ञान प्राप्त करून देणारी ज्ञानशक्ती म्हणजे विवेकशक्ती ह्या व्याख्या आपण स्वीकारल्या तर मानवी व्यवहाराचे नैतिक नियमन करणारी मन:शक्ती कोणती, तिचे स्वरूप काय इ. प्रश्न उभे राहतात. ह्या प्रश्नांचे देण्यात आलेले उत्तर थोडक्यात असे : इंद्रियगोचर वस्तूंचे (आणि वैज्ञानिक पद्धतीच्या वापराने शोधून काढण्यात आलेल्या परमाणू, इलेक्ट्रॉन इ.) सूक्ष्म इंद्रियातीत पदार्थांचे मिळून बनलेले हे विश्व एकसंध आहे. हे समग्र विश्व वैज्ञानिक ज्ञानाचा विषय आहे. माणूस हाही विश्वातील एक घटक आहे आणि तोही वैज्ञानिक ज्ञानाचा विषय आहे. मानवी वर्तनाचे निरीक्षण करून ज्या सामान्य नियमांना अनुसरून हे वर्तन चालते ते शोधून काढता येतात. ह्यातील एक नियम असा की माणसाचे वर्तन स्वत:चे सुख साधण्यासाठी घडत असते. माणसाला इच्छा, वासना इ. असतात आणि त्यांचे समाधान होण्यात माणसाचे सुख असते. तेव्हा ज्यायोगे आपले सुख साधले जाईल अशा रीतीने वागणे म्हणजे विवेकशील (rational) पद्धतीने वागणे होय. दुसऱ्या शब्दात जे कृत्य केले असता (आपल्याला प्रेरणा देत असलेली) इच्छा तृप्त होईल ते कृत्य विवेकशील कृत्य होय. ह्यापासून निष्पन्न होणारा दुसरा सिद्धांत असा. माणसाला अनेक इच्छा एकेवेळीच असतात आणि एका अंगाने पाहिले असता त्याचे जीवन म्हणजे इच्छांच्या अशा पुंजक्यांची मालिकाच असते. तेव्हा जी कृत्ये केली असता. आचरणाचे जे नियम, संकेत इ. पाळले असता माणसाच्या (आयुष्यभरातील) जास्तीत जास्त इच्छांचे समाधन होईल, म्हणजे माणसाला जास्तीत जास्त सुख लाभेल ती कृत्ये, वर्तनाचे ते नियम, संकेत इ. विवेकाधिष्ठित (rational) होत. इच्छा स्वत:च चांगल्या किंवा वाईट नसतात. दोन इच्छा घेतल्या तर त्यातील जी इच्छा दुसरीच्या तुलनेने इतर अधिक इच्छांशी सुसंगत असेल, म्हणजे तिचे समाधान अधिक इच्छांच्या समाधानाशी सुसंगत असेल ती इच्छा दुसऱ्या इच्छेच्या अपेक्षेने चांगली. माणसाला आयुष्यभरात जाणवतील त्या सर्व इच्छा घेतल्या तर इच्छांच्या ज्या समूहात त्यातील जास्तीत जास्त इच्छांचा सुसंगतपणे समावेश होईल तो इच्छासमूह चांगला, त्यात समाविष्ट असलेली कोणतीही इच्छा चांगली होय. तिसरा एक घटक ध्यानात घेतला पाहिजे. माणसे समाजात राहतात. तसेच माणसांच्या इच्छांचे समाधान करण्यासाठी काही भौतिक साधने—अन्न, निवारा, टेप-रेकॉर्डर, इ. —आवश्यक असतात आणि भौतिक साधनांचे श्रमाने व कौशल्याने उत्पादन करावे लागते. श्रम म्हणजे भौतिक साधने व पर्यायाने इच्छातृप्ती प्राप्त करून घेण्यासाठी मोजावी लागणारी किंमत असते. मानवी परिस्थितीच्या निरीक्षणावर आधारलेली व म्हणून प्रमाण असलेली ही सत्ये होत. तेव्हा ज्याप्रमाणे व्यक्तीच्या दृष्टीने पाहता आचरणाचे जे नियम पाळले असता तिला जास्तीत जास्त सुख मिळेल ते नियम म्हणजे विवेकाधिष्ठित, नैतिक नियम होत त्याप्रमाणे सामाजिकदृष्ट्या पाहता जे नियम समाजातील सर्व व्यक्तींनी पाळले असता समाजातील जास्तीत जास्त व्यक्तींना जास्तीत जास्त सुख मिळेल ते नियम विवेकाधिष्ठित नैतिक नियम होत. ही नीतीची सुखवादी, उपयुक्ततावादी संकल्पना आधुनिक विवेकवाद्यांनी स्वीकारली. मानवी प्रवृत्तींच्या, प्रेरणांच्या निरीक्षणावर आधारलेली अशी ही नीती आहे व वैज्ञानिक ज्ञानाप्रमाणेच प्रमाण आहे असा तिच्या मागचा दावा आहे.

समाजात धार्मिक श्रद्धा परंपरेने चालत आलेली असते. तिला विवेकाचा, वैज्ञानिक विचारपद्धतीचा आधार नसतो व म्हणून प्रामाण्य नसते. धार्मिक परंपरेच्या आश्रयाने समाजात एक रूढ नीतीही चालत आलेली असते. पण तिलाही विवेकाचा, अनुभवाचा आधार नसतो. म्हणून तिलाही प्रामाण्य नसते. धार्मिक श्रद्धेच्या जागी वैज्ञानिक ज्ञानाची आणि रूढ, पारंपरिक नीतीच्या जागी अनुभवाधिष्ठित सुखवादी, उपयुक्ततावादी नीतीची स्थापना करणे ही मूलगामी वैचारिक परिवर्तनाची, वैचारिक क्रांतीची नांदी होय. ज्याला प्रबोधनाचे (enlightement) तत्त्वज्ञान म्हणून ओळखण्यात येते त्याचे वैज्ञानिक विचारपद्धती व वैज्ञानिक ज्ञान आणि सुखवादी, उपयुक्ततावादी नीतीची संकल्पना हे ठळक घटक होते आणि वैचारिक परिवर्तन हे उद्दिष्ट होते. समाजात अनेक सामाजिक संस्था—कुटुंब, राज्यसंस्था, औद्योगिक संस्था इ. —परंपरेने चालत आलेल्या असतात आणि अनेक रूढ प्रघातांवर त्यांचे संघटन आणि कार्यपद्धती आधारलेली असते. ह्या पारंपरिक संस्थांच्या आणि प्रघातांच्या जागी उपयुक्ततावादी नीतीशी सुसंगत अशा संस्था उभारण्याचा आणि नवीन प्रघात रूढ करण्याचा कार्यक्रम ह्या तत्त्वज्ञानाच्या प्रवर्तकांनी स्वीकारला. हा सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम होता. जाणीवपूर्वक सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा हा प्रयत्न माणसाच्या वैचारिक आणि सामाजिक इतिहासात अभूतपूर्व होता. फ्रेंच

राज्यक्रांती हा त्याचा एक नाट्यमय आविष्कार होता.

वैज्ञानिक विचारपद्धती आणि उपयुक्ततावादी नीती ह्यांचा मिळून आधुनिक विवेकवादाचा गाभा बनतो हे आपण पाहिले. येथे एका शाब्दिक, परिभाषाविषयक विसंगतीचा, निदान वैशिष्ट्याचा उल्लेख केला पाहिजे. ह्या स्वरूपाच्या विवेकवादाचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्ववेत्त्यांना उदा. दिदेरो, होल्बाख, बेन्थॅम, जेम्स आणि जॉन स्टुअर्ट मिल इत्यादींना विवेकवादी म्हणण्यात येणार नाही. त्यांना अनुभववादी (empiricist) म्हणण्यात येईल. त्यांनी स्वत:ला अनुभववादीच म्हटले असते आणि कित्येकांनी स्वत:ला तसे म्हटलेलेही आहे. उलट ह्याच विचारधारेचा पुरस्कार करणाऱ्या व्हिक्टोरिअन काळातील काही विचारवंतांनी स्वत:ला विवेकवादी (rationalist) असे म्हटले आहे. जे स्वत:ला अनुभववादी म्हणवितात आणि विवेकवादाविरूद्ध ठाकतात त्यांना विवेकशक्ती म्हणून जी एक मानवी ज्ञानशक्ती स्वीकारण्यात आली आहे ती नाकारायची असते, प्लेटोप्रणीत विवेकशक्ती नाकारायची असते. अनुभवातील अशा सत्‌रूपांचे (वास्तवतेचे) अनिवार्यतेने सत्य असलेले ज्ञान विवेकशक्ती प्राप्त करून देते अशी विवेकशक्तीची संकल्पना आहे. अशी वास्तवता (reality) असत नाही, असे ज्ञान असत नाही, इंद्रियगोचर वस्तूंचे जग हे समग्र वस्तुजात असते, इंद्रियजन्य अनुभवाद्वाराच ह्या वस्तूंचे प्रमाण ज्ञान प्राप्त होऊ शकते ही अनुभववाद्यांची भूमिका आहे. आता वैज्ञानिक ज्ञान प्राप्त करून घेताना इंद्रियानुभवापलिकडे जाणारे तर्क, विशेषत: गणिती अनुमाने करावी लागतात हे उघड आहे आणि गणिती ज्ञान इंद्रियानुभवावर कसे आधारता येते हा अनुभववाद्यांपुढील बिकट प्रश्न आहे. अनुभववादाशी सुसंगत ठरेल अशा रीतीने ह्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा अनुभववाद्यांचा प्रयत्न असतो. ह्यात ते यशस्वी होतात की नाही हा प्रश्न बाजूला सारला तर अनुभववादी भूमिका स्थूलमानाने अशी आहे.

मग ह्या भूमिकेचा 'विवेकवाद' असा उल्लेख कसा होऊ शकतो? ह्याचे उत्तर दुहेरी आहे. 'विवेकशील', 'विवेकी' ह्या विशेषणांचा एक अर्थ असा : जी समजूत, विश्वास (belief), जे विधान (proposition) योग्य त्या पुराव्याने, योग्य त्या आधारावर सत्य ठरते ते विधान ह्या कारणासाठी स्वीकारणे, जे विधान असे सत्य ठरत नाही—म्हणजे एकतर असत्य ठरते किंवा ते सत्य ठरायला पुरेसा आधार नसतो—ते सत्य म्हणून न स्वीकारणे हे विवेकशील असते, विवेकाला धरून असते. आता अनुभववादाप्रमाणे ज्या विधानाला पुरेशा अनुकूल, अनुभवजन्य पुराव्याचा आधार असतो तेच विधान सत्य ठरते. ज्याला प्रतिकूल पुरावा असेल किंवा पुरेसा अनुकूल पुरावा नसेल ते विधान सत्य ठरत नाही. तेव्हा विधानांच्या क्षेत्रात जी व्यक्ती सत्यतेच्या वरील निकषाप्रमाणे जी विधाने सत्य ठरतात त्या सर्वांचा आणि तेवढ्यांचाच स्वीकार करीत असेल, तिचे वर्तन विवेकशील असते. थोडक्यात अनुभववादी भूमिका, विवेकशीलतेच्या वरील व्याख्येप्रमाणे विवेकशील असते. त्याचप्रमाणे नीतीच्या क्षेत्रात सुखवादी, उपयुक्ततावादी भूमिका स्वीकारणे हे विवेकशील असते.

आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या प्रवर्तकांतील कित्येकांनी—उदा. देकार्त, स्पिनोझा, लायब्निट्झ यांनी—प्लेटोप्रणीत विवेकवादाचा काही फरकाने पुनरुद्धार केला होता. विवेकशक्ती अशी एक ज्ञानशक्ती आहे. अनुभवातील अशा वास्तवतेचे ज्ञान ती देते, आनिवार्यतेने सत्य असलेल्या विधानांची व्यवस्था असे ह्या ज्ञानाचे स्वरूप असते, इंद्रियानुभावे मिळणारे ज्ञान कनिष्ठ दर्जाचे असते, त्याची फारतर व्यावहारिक उपयुक्तता असते पण ज्ञान म्हणून ते पूर्णपणे प्रमाण नसते अशी भूमिका त्यांनी स्वीकारली होती. ही अमान्य करून, इंद्रियानुभवात सर्व ज्ञानाचा उगम असतो व त्याची प्रमाणता इंद्रियानुभवापुरती मर्यादित असते ही भूमिका ज्यांनी स्वीकारली त्यांना अनुभववादी म्हणण्यात येऊ लागले. पण प्रमाण ज्ञान हे वैज्ञानिक ज्ञान असते आणि प्रमाण नीती उपयुक्ततावादावर आधारलेली असते हे सिद्धान्त अनुभववाद्यांना सामान्यपणे मान्य होते आणि ह्या अर्थाने ते 'आधुनिक' विवेकवादी होते. उलट ह्याच विचारधारेतील जे विचारवंत स्वत:ला विवेकवादी म्हणवत त्यांचा रोख मुख्यत: धार्मिक श्रद्धेविरुद्ध होता. धार्मिक श्रद्धेवर ज्ञान आधारता येत नाही, ते विवेकशक्तीवर आधारलेले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती, आणि वैज्ञानिक विचारपद्धतीने मिळविलेले ज्ञान हेच विवेकाधिष्ठित ज्ञान असते हीही त्यांची भूमिका होती. धार्मिक श्रद्धेच्या जागी त्यांना विश्वाविषयीच्या आणि माणसाविषयीच्या वैज्ञानिक ज्ञानाची स्थापना करायची होती. ह्या अर्थाने जे विवेकवादी होते ते विचारवंत आणि अनुभववादी विचारवंत ह्यांची जातकुळी एकच आहे. इंद्रियगोचर विश्व हेच समग्र विश्व आहे, त्याच्या पलिकडचे अतीत असे विश्व नाही, माणूस हा इंद्रियगोचर विश्वाचा, निसर्गाचा घटक आहे; त्याच्यात इंद्रियातीत असे तत्त्व, उदा. आत्मा नाही हे सिद्धान्त स्वीकारणाऱ्या तत्त्वज्ञानाला इहवाद (secularism) असेही म्हणतात. अनुभववाद, (आधुनिक) विवेकवाद आणि इहवाद ह्या जवळ जवळ पर्यायी अशा संकल्पना आहेत. त्यांच्यात आशयाचा भेद नाही. त्या कशावर

भर देतात ह्यावर त्यांच्यामधील भेद अवलंबून आहेत.

आता नीतीच्या क्षेत्रात हा विवेकवाद सुखवाद व उपयुक्ततावाद तर स्वीकारतोच पण आणखीही काही मूल्ये स्वीकारतो. प्रबोधनाच्या नैतिक, सामाजिक तत्त्वज्ञानाशी स्वातंत्र्य (व्यक्तिस्वातंत्र्य), समता, बंधुभाव ही मूल्ये निगडित आहेत. ह्यांचा सुखवादी उपयुक्ततावादाशी काय संबंध आहे असा प्रश्न उपस्थित करता येईल. हा प्रश्न अधिक व्यापक रीतीने मांडता येईल. 'मूल्य' ही संकल्पनाच अनुभववादाशी सुसंगत आहे का असा हा प्रश्न आहे. माणसे निसर्गाचे घटक आहेत, निसर्गातील इतर घटकांप्रमाणेच माणसेही आपल्या निसर्गदत्त स्वभावधर्मानुसार वागतात आणि स्वत:चे जास्तीत जास्त सुख मिळविण्याच्या उद्देशाने त्यांचे वर्तन घडते हे सर्व अनुभवाने कळेल. पण असे वागणे योग्य आहे असा निर्णय अनुभवाच्या आधारे करता येणार नाही. आता अशी भूमिका स्वीकारता येईल की 'माणसाने कसे वागणे योग्य आहे?' ह्या प्रश्नाला अर्थच नाही. माणसे कशी वागतात, विशिष्ट व्यक्ती कशी वागेल हे सांगता येईल. पण त्याच्या पलीकडे जाऊन माणसांनी कसे वागावे, त्यांनी कसे वागणे योग्य आहे असे सांगता येणार नाही. ह्या स्वरूपाचा प्रश्न उपस्थित करण्यात हशील नाही. ह्याचा अर्थ असा होईल की नीती, नैतिक मूल्ये असे काही नाही.

'अमुक व्यक्तीचे अमूक परिस्थितीत अमूक कृत्य करणे हे कर्तव्य आहे' अशी विधाने आपण व्यवहारात करतो. एखादे कृत्य जर माझे कर्तव्य असेल तर त्याचा अर्थ असतो की मी ते कृत्य करणे योग्य असते, ते कृत्य करण्याची माझी इच्छा असो नसो ते कृत्य करणे माझ्यावर बंधनकारक असते, त्या कृत्याचा माझ्यावर अधिकार असतो, मी ते केले नाही तर मी दोषी, अपराधी ठरेन इ. आता निसर्ग नियमानुसार आणि माणसाच्या नैसर्गिक प्रकृतीनुसार माणसे कोणत्या प्रसंगी कशी वागतील हे पूर्णपणे निर्धारित (determined) असेल तर एखाद्याने अमुक एक कृत्य केले खरे. पण त्याने त्याच्याऐवजी दुसरे कृत्य करणे योग्य ठरले असते ह्या म्हणण्याला काही अर्थ उरत नाही. एखादे कृत्य करणे हे माझे कर्तव्य आहे असे जेव्हा मी ओळखतो तेव्हा माझ्या इच्छा, प्रेरणा, आवडीनिवडी कशाही असोत ते करणे मला **शक्य** आहे आणि मी ते केले पाहिजे असा माझा निर्णय असतो. ह्याचा अर्थ असा की नीती ओळखणारा आणि नीतीला अनुसरून वागू **शकणारा** माणूस हा स्वायत्त, आत्मनिर्धारक (self-determining) असा प्राणी आहे आणि तो असा स्वायत्त असल्यामुळे निसर्गनियमांच्या केवळ आधीन असलेल्या वस्तूंप्रमाणे तो केवळ निसर्गाचा घटक नाही. निसर्गाचा घटक असतानाही तो निसर्गातीत, स्वायत्त आहे. त्याचे स्वरूप असे दुहेरी आहे.

माणूस स्वत:च्या कल्याणाची कल्पना करू शकतो, करीत असतो आणि हे कल्याण साधण्यासाठी योग्य त्या कृती करण्याचे स्वातंत्र्य त्याला असते. स्वत:चे कल्याण साधण्यासाठी कृती करणारा **स्वायत्त** प्राणी हे सर्व माणसांचे समान स्वरूप आहे, हा त्यांचा समान दर्जा, त्याचे समान स्थान आहे. ह्यावर समतेचे तत्त्व आधारलेले आहे. तत्त्व असे की सर्व माणसांचा दर्जा समान आहे आणि त्याचा व्यावहारिक आशय असा की सर्व माणसांच्या कल्याणाला समान महत्त्व आहे. आणखी एक मुद्दा असा की विशिष्ट परिस्थितीत अमुक एक कृत्य माझे कर्तव्य आहे ह्या निर्णयात असे अभिप्रेत आहे की समान परिस्थितीत इतर कुणाही माणसाचे ते कृत्य कर्तव्य ठरेल. ह्याचा अर्थ असा की मी जेव्हा अमुक एक कृत्य माझे कर्तव्य आहे असा निर्णय करतो तेव्हा मी स्वत:साठी व इतर सर्व माणसांसाठी एक सार्विक नियम घालून देत असतो. इतर कुणीही माणूस असेच स्वत:साठी व इतरांसाठी सार्विक नियम घालून देत असतात. हे नैतिक नियमांचे स्वरूप आहे. नैतिक नियम सर्व माणसांनी सर्व माणसांसाठी सर्वांच्या कल्याणासाठी घालून दिलेले नियम. ह्यामुळे हे नियम सर्वांना समान असतात आणि सर्वांच्या कल्याणाला ते समान महत्त्व देतात. सर्व माणसे ह्या नियमांच्या आधीन असतात. म्हणून ते शासित असतात. पण हे नियम माणसांनीच घालून दिलेले असल्यामुळे ते सर्व शासकही असतात. कुणाही माणसाला केवळ साधन म्हणून वापरणे अनैतिक असते कारण इतरांसोबत स्वत:च्या कल्याणाची स्वायत्तपणे साधना करणारा कर्ता ह्या त्याच्या दर्जाशी ते विसंगत असते; ह्या दर्जाचा ते भंग करते.

आधुनिक पाश्चात्त्य नैतिक विचारात आणि बऱ्याच अंशी आचरणात अनुस्यूत असलेल्या संकल्पनांची आणि तत्त्वांची ही मांडणी आहे. उदा. प्राचीन काळी गुलामगिरीची पद्धत नैतिकदृष्ट्या आक्षेपार्ह वाटत नव्हती. गुलामांना दयाळूपणे वागवावे एवढीच नैतिक शिकवण होती. आज आपण असे म्हणू की गुलामांना सुखी ठेवले तरी गुलाम हा दर्जाच माणसाच्या स्वायत्त कर्ता ह्या स्वरूपाशी विसंगत आहे व म्हणून अनैतिक आहे. उपयुक्ततावादी विचारवंत प्रत्यक्षात ही तत्त्वे स्वीकारतात आणि म्हणून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूल्येही ते स्वीकारतात. पण ही मूल्ये अनुभववादाशी आणि उपयुक्ततावादाशी विसंगत आहेत. जर विश्वातील सर्व वस्तू निसर्ग नियमांच्या आधीन असतील तर स्वायत्त कर्ता हा

माणसाचा दर्जा टिकत नाही. "अधिकात अधिक व्यक्तींचे अधिकात अधिक सुख ज्या योगे साधेल ती कृत्ये करणे योग्य आहे" असे जर अनुभववादी म्हणाला तर ह्या विधानात 'योग्य' ह्याचा अर्थ काय? 'अशी कृत्ये तू कर' अशी आज्ञा तो मला देऊ शकेल. अशी कृत्ये करायला तो मला भाग पाडील. पण ही कृत्ये करणे योग्य आहे असे तो अर्थपूर्ण रीतीने म्हणू शकेल. तसेच समजा शंभर माणसांच्या समाजात अ हे कृत्य केल्याने जर नव्वद माणसांना प्रत्येकी पाच एकक (unit) सुख मिळते आणि दहा माणसांना प्रत्येकी शंभर एकक (एकूण १४५० एकक) सुख मिळते असे असेल आणि ब हे कृत्य केल्याने शंभरातील प्रत्येक माणसाला दहा एकक सुख मिळते (एकूण १००० एकक) तर उपयुक्ततावादी निकषाप्रमाणे अ हे कृत्य योग्य ठरते. पण अ-पासून निष्पन्न होणाऱ्या सुखात खूपच विषमता आहे. येथे न्यायाचा प्रश्न उपस्थित होतो. न्यायाचे एक तत्त्व असे की समाजात अनिष्ट गोष्टींची (कष्ट, त्रास, यातना) आणि इष्ट गोष्टींची समान वाटणी झाली पाहिजे आणि जेव्हा विषम वाटणी असेल तेव्हा त्या विषम वाटणीचे योग्य कारण असले पाहिजे. (उदा. समान वाटणीमुळे प्रत्येकाचे जेवढे कल्याण होईल त्यापेक्षा विषम वाटणीमुळे प्रत्येकाच्याच कल्याणात काही भर पडेल असे दाखवून दिले तर विषम वाटणीचे योग्य कारण दिले असे होईल.)

प्रत्यक्षात आधुनिक विवेकवादाने ही मूल्ये स्वीकारली आहेत पण ह्या मूल्यांचे प्रामाण्य आधुनिक विवेकवादाला सिद्ध करता येत नाही. त्यांचा उगम कशात आहे हा शोध घेतला तर तो ख्रिस्ती धर्मश्रद्धेत आणि ग्रीक विवेकवादात आहे असे आढळून येईल. उदा. प्रत्येक माणसाला देवाची प्रतिमा असलेला आत्मा असतो आणि म्हणून त्याला अध्यात्मिक दर्जा आहे आणि सर्व माणसांचा समान अध्यात्मिक दर्जा आहे; प्रत्येक मानवी व्यक्तीचे व्यक्ती म्हणून - आत्मा असलेला प्राणी म्हणून—समान मूल्य आहे ही ख्रिस्ती शिकवण. आधुनिक नीतीची जी मांडणी आपण वर दिली आहे ती इमान्युएल कान्टने केलेली मांडणी आहे. कान्टवर 'पायेटिस्ट' (pietist) संस्कार होते.

कान्टने विवेकवादाची पुनर्मांडणी केली. थोडक्यात ही मांडणी अशी की ज्ञानाच्या क्षेत्रात वैज्ञानिक विचारपद्धती हीच प्रमाण आहे पण नीतीच्या क्षेत्रात सर्वांसाठी सार्विक आणि अनिवार्य असे नियम घालून देणारी, वैज्ञानिक विचारपद्धतीच्या पलीकडे जाणारी, विवेकशक्ती प्रमाण आहे. इंद्रियगोचर सृष्टीचा घटक हे माणसाचे एक रूप आहे. विवेकशक्तीच्या द्वारा स्वत:ला व इतरांना अनिवार्य नैतिक नियम घालून देणारा स्वायत्त कर्ता हे माणसाचे दुसरे रूप आहे. ह्या विसंगत रूपांचा सुसंगत समन्वय कसा साधावा ह्या गूढाची उकल करणे मानवे ज्ञानशक्तीच्यापलीकडे आहे. पुढे हेगेलने प्लेटो-ॲरिस्टॉटल यांनी कल्पिलेल्या विवेकशक्तीचा, काही महत्त्वाच्या फरकांनी पुनरुद्धार केला आणि निसर्ग, मानवी समाजाचा इतिहास, नीतीक्षेत्र, सौंदर्याचे क्षेत्र, धर्म-तत्त्वज्ञानाचे क्षेत्र ह्या सर्वांना, विवेकशक्तीचे कमी अधिक पूर्ण असलेले आणि अनिवार्य असे आविष्कार म्हणून एका सूत्रात सुसंगतपणे गोवण्याचा महत्वाकांक्षी प्रयत्न केला. मार्क्सवादाला ह्या हेगेलप्रणीत विवेकवादाची पार्श्वभूमी आहे. पण हा इतिहास ह्या लेखाच्या मर्यादेपलीकडे जातो.

भारतीय दार्शनिक परंपरेत 'रीझन' ह्या ज्ञानशक्तीसारखी ज्ञानशक्ती कल्पिलेली नाही. विवेक ही शक्ती भारतीय संकल्पनेप्रमाणे जे भिन्न आहे त्यात भेद करण्याची शक्ती आहे; उदा. श्रेयस् आणि प्रेयस् यांच्यामध्ये किंवा पुरुष आणि प्रकृती यांच्यामध्ये किंवा प्रापंचिक आणि पारमार्थिक यांच्यामध्ये.

सामान्यपणे प्रत्यक्ष, अनुमान आणि शब्द ही ज्ञानाची प्रमाणे (साधने) म्हणून मानलेली आहेत. शब्द म्हणजे वेदवचनांचे प्रामाण्य मानणे. वेदवचनांचा आशय अर्थात प्रत्यक्ष - अनुमानापलिकडे जातो. जी दर्शने शब्द हे प्रमाण आहे असे मानतात ती अर्थात् (आधुनिक) पाश्चात्त्य विवेकवादी नाहीत हे उघड आहे. बौद्ध दर्शने शब्दप्रामाण्य मानत नाहीत. पण तीही बुद्धाला सर्वज्ञ मानून बुद्धवचनांचे प्रामाण्य मानतात. तीही ह्या विवेकवादाशी सुसंगत नाहीत. प्रत्यक्ष आणि प्रत्यक्षाधिष्ठित अनुमान हीच प्रमाणे मानणारे चार्वाक दर्शन मात्र विवेकवादाशी सुसंगत आहे. पण ते नैतिक-सामाजिक मूल्यांविषयी मूक आहे.



# विजया चौक / शुभांगी जोशी

विजया चौक यांच्या सामाजिक जीवनास १९७१ साली सुरुवात झाली. महागाई विरुद्धचा मोठा लढा याच सुमारास सुरू झाला. मुंबईत होणाऱ्या महागाई प्रतिकार समितीच्या प्रत्येक कार्यक्रमाचे पडसाद जिल्ह्याच्या ठिकाणी उमटत होते. धुळे शहरात विजयाबाईंच्या नेतृत्वाखाली 'समाजवादी महिला सभा' त्यात उतरली. लाटणे मोर्चा, घंटानाद, कचरातुला जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन असे सर्व कार्यक्रम धुळ्यात झाले. घर–चौकट सोडून प्रथमच बाहेर पडलेल्या या महिला महागाईच्या प्रश्नावर तुरुंगात गेल्या; आठ दिवसाच्या तुरुंगवासानंतर बाहेर पडल्या; त्या स्वतःची नवीन ओळख होऊन. विजयाबाईंचे माहेर बुलढाण्याचे. घर तसे मध्यमवर्गीय. मुलींनी शिकावे असा वडिलांचा आग्रह असे. विजयाबाई अभ्यासाबरोबरच वक्तृत्वस्पर्धा, क्रीडा स्पर्धा यातही आघाडीवर असत. त्यांची आजी राष्ट्रीय चळवळीत सक्रिय होती. त्या काळातल्या प्रभातफेऱ्या, दारू दुकानावरील पिकेटिंग, अशा कार्यक्रमांत त्यांचा सहभाग असायचा. विजयाबाईंनी आजीचा हा वारसा अधिक जोमाने पुढे चालवला. लग्न होऊन त्या धुळ्याला आल्या. तेथे शकुंतलाबाई परांजपे, सुमनताई भाल्डे तसेच डॉ. कमलाबाई अष्टपुत्रे यांच्यापासून प्रेरणा मिळाली. राष्ट्र सेवा दलात त्या काम करीतच होत्या. महागाई आंदोलनामुळे व्यापक क्षेत्रात उतरल्या.

महागाई आंदोलनाचे एक सूत्र असे की हा लढा कशासाठी करत आहोत हे लढ्यात उतरणाऱ्यांना समजले पाहिजे असा आंदोलन नेत्याचा आग्रह असे. त्यासाठी ठिकठिकाणी स्त्रियांच्या छोट्या सभा घेतल्या जात. विजया चौक यांचे हेच सूत्र आपल्या कामात स्वीकारले.



सभा, शिबिरे, मेळावे, व्याख्यानमाला याद्वारे विजयाबाई अनेक विषय स्त्रियांपर्यंत पोहोचवत. दारूचे दुष्परिणाम स्त्रियांना फक्त सांगून थांबायचे नाही, दारू दुकान बंद पाडण्याकरिता त्यांना सिद्ध करायचे. पर्यावरणाचे महत्त्व सांगितले आणि वृक्षारोपणाचा मोठा कार्यक्रम धुळ्यात हाती घेतला. हुंडा, बलात्कार सारख्या अन्यायाविरुद्ध तर एक झंजावाती आंदोलनच उभे राहिले. ५–७ वर्षांच्या अल्पवयीन मुलींवर बलात्कार झाले. हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार झाल्यावर आई-वडील त्या मुलींना घरी नेण्यासच नाकारू लागले तर समाजवादी महिला सभेच्या कार्यकर्त्यांना विजयाबाईंनी त्यांचा सांभाळ करण्यास तयार केले. पुढे कालांतराने आई-वडिलांनी मुली घरी नेल्या.

१९७५नंतरच्या काळात स्त्री संस्थांच्या कामाला एक वेगळे वळण लागले. स्त्री समाजातील एक स्वतंत्र घटक हा नवा विचार पुढे आला. या नव्या संदर्भात महिला संस्था वाटचाल करू लागल्या. स्त्रियांना बोलके करणे, त्यांच्या जाणीवा जागवणे. त्यांच्या कुटुंबातील बेडी सोडवणे हा स्त्री-चळवळीचा कार्यक्रम झाला. कुटुंबातील तिच्या समस्यांची उकल कौटुंबिक सल्ला केंद्रात होऊ लागली. समाजवादी महिला सभेतर्फे धुळे येथे विजयाबाईंनी सुरू केलेल्या कायदा व कुटुंब सल्ला केंद्रात लोक गर्दी करू लागले.

खानदेशात लेवा पाटील समाजात हुंड्याची प्रथा जोरात. लग्नात हुंडा हवाच पण त्यानंतर सासरी 'मूळ' आणायचे. 'मूळ' कमी पडले की सुनेचा छळ चालू. उपाशी ठेवणे, मारहाण, डागाळणे नाहीतर शेवटी सरळ जाळून टाकणे. दोन बैलगाड्या भरून दिलेले 'मूळ' कमी पडले म्हणून साधना पाटीलला ठार मारण्यात आले. घरच्या पुढच्या भागात टाकून घरच पेटवून दिले. आगीचे बंब शिरपूरहून आले तोपर्यंत नवरा घरच्या मागच्या भागात शांतपणे क्रिकेट कॉमेंट्री ऐकत बसला होता. नेहमीप्रमाणे विजयाबाईंची पलटण कामाला लागली. मोर्चा, निदर्शन, पोलिसात तक्रार पण त्याशिवाय या वेळी आणखी एक आगळा प्रयत्न झाला, सामाजिक बहिष्काराची पाटणामध्ये प्रचंड सभा झाली.

सामाजिक बहिष्काराची ही पहिली सभा. त्यानंतर सामाजिक बहिष्काराचे सत्रच चालू झाले. 'सुनेला मारले त्या घरात कोणी मुलगी द्यायची नाही. असा ठराव केला जाई. ग्राम पंचायतीही या बहिष्कार ठरावात सामील झाल्या. धुळे हादरले.

काहीजण सावध झाले, वचक बसला तर काहीजण बिथरले. विजयाबाईंना धमक्या येऊ लागल्या. पण त्यांना पाठिंबा देणाऱ्यांची संख्या वाढतच गेली.

उषा वाणी मृत्युपूर्व जबानी विययाबाईपुढेच देणार म्हणून हटून बसली. आपल्या छळाची हृदयद्रावक कहाणी तिने बाईंना सांगितली आणि प्राण सोडला. उषा वाणीच्या प्रेतयात्रेत महिला सहभागी झाल्या. 'आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे,' 'नवऱ्याचे दुसरे लग्न होऊ देऊ नका,' 'उषावर अन्याय करणाऱ्यांना शासन झाले पाहिजे' असे बॅनर्स फडकावित, घोषणा देत प्रेतयात्रा निघाली. खांदा कुणी दिला—स्त्रियांनीच. धुळे परत एकदा हादरले.

शशिकला साळुंखे ही अंगणवाडी कार्यकर्ती. दारूच्या व्यसनामुळे व संशयी स्वभावामुळे नवऱ्याने तिला जाळले. अंत्यसंस्काराच्या वेळी निरोप गेले, फोन केले पण कुणीही आले नाही. विजयाबाई सरसावल्या. महिला कार्यकर्त्यांना जमविले. शशिकलाची मुलगी राणी हिच्या हस्ते अंत्यसंस्कार केले. फक्त स्त्रियांनी अमरधाममध्ये जाऊन केलेला हा पहिला अंत्यसंस्कार.

हुंडाबळी, हुंडा या विरोधात कार्यक्रम चालूच राहिले. पुढे तोंडावर पट्ट्या बांधून एक मूक मोर्चा निघाला. सजवलेल्या गाढव बैलांचा मोर्चाही निघाला. सर्व कार्यक्रम विजयाकडे लोकांना खेचत होते. विजयाची एव्हाना माई झाली होती.

एस. एम. जोशी स्मृती प्रित्यर्थ पदयात्रा काढली गेली. पदयात्रेच्या १० दिवसात आडवळणाच्या गावी माई व त्यांच्या सहकारी पोहचल्या. सगळीकडे पदयात्रेचे प्रचंड स्वागत झाले. प्रतिष्ठित मराठा समाजातील विधवा–माई एका खांद्यावर पदर टाकून जात होत्या. तरी त्यांचे आरत्या ओवाळून, कुंकू लावून सुवासिनींनीसुद्धा स्वागत केले. पदयात्रेत अनेक विषय गावोगावी पोहचले.



पदयात्रेत अनेक परित्यक्ता त्यांना भेटल्या त्यांच्या कहाण्या समजल्या. परित्यक्ता परिषद धुळ्यात झाली. त्यानंतर झाले. परित्यक्तांचे सर्वेक्षण. सर्वेक्षणामधील निष्कर्ष 'चेतना' नावाच्या पुस्तिकेत प्रसिद्ध झाले. क्षुल्लक कारणावरून बायकोला टाकणाऱ्यांची टक्केवारी सर्वात जास्त होती. परित्यक्ता १५ ते ५५ सर्व वयोगटातील होत्या, त्यात अशिक्षितांचे, परावलंबी महिलांचे प्रमाण ८० टक्के. लगेच नागपूर विधानसभा, मुंबई येथे मोर्चे निघाले एका गावात घरटी एक परित्यक्ता असल्याचा दावा माईंनी केला. मुख्यमंत्र्यांनी शासनकरवी पाहणी अहवालाची सत्यता पडताळून पाहिली आणि परित्यक्तांच्या मागणीचा विचार करायला समिती नेमली.

आज या निराधार महिलांकरता धुळ्यात कल्याणी आश्रम चालतो. काही महिला वारवाची तरटे बनवितात तर दुसऱ्या काही धंदे शिक्षण घेतात.

समाजात ताठ मानेने बाईला वावरता यावे तिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवावे यासाठी माईंचे सर्व प्रयत्न चालू असतात. त्यांनी स्वतःचे घरच समाजवादी महिला सभेचे कार्यालय, कार्यशाळा आहे. अनेक वर्षे तिथे २०० मुली शिकत असलेला शिवणवर्ग चालतो. सरकारमान्य परीक्षेत उत्तीर्ण होऊन आपल्या पायावर उभ्या आहेत. त्याशिवाय जिल्हा पातळीवर ज्या योजना असतात त्या माईंनी मिळवल्या. दारिद्र्य रेषेखालील काहीजणींना 'ग्रीनकार्ड' मिळवून दिले. गुरे, मेंढ्या, कोंबड्या मिळवून दिल्या. शिवणयंत्रे मिळवली एवढेच नव्हे तर इंदिरा आवास योजनेत घरेही मिळवून दिली. कोणी दाई ट्रेनिंग घेत आहेत तर काही जणी नर्सिंगचे.

परंपरा आणि चालीरीतींची चौकट मोडत चाललेल्या माईंबरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांची तशी दमछाकच होते. माईंसारख्या त्याही धाडसी बनतायत. सर्व गोष्टी मनोमन पटायला नाहीतरी वेळच लागतो आणि त्यातून ग्रामीण भाग.

घरातले आणि बाहेरचे ताणतणाव सोसून माई मध्यंतरी बऱ्याच आजारी पडल्या. पण प्रकृतीचे कारण त्यांना घरात बसवून ठेवूच शकत नाही. त्यांचा कामाचा सपाटा चालूच आहे. त्यात मागे वळून पाहणे, थांबणे नाही.

# महाराष्ट्रातील प्रबोधनाची वाटचाल / राजेंद्र व्होरा

महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्वकाळात जे वैचारिक आंदोलन घडून आले आणि त्यातून समाज सुधारणेची जी चळवळ उभी राहिली त्यास आपण सामान्यत: प्रबोधन म्हणून ओळखतो. नव्या मूल्यांच्या दृष्टिकोनातून आपण आपल्या परंपरेचा अर्थ लावण्यास १९व्या शतकाच्या पूर्वार्धात प्रारंभ केला. व्यक्तीची प्रतिष्ठा व सामाजिक समता या वैश्विक तत्त्वांच्या प्रकाशात आपल्या सामाजिक संस्थांची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. हे प्रबोधन एकाच वेळी समाजाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे होते. या लेखात मात्र मी धर्म व जात या दोन सामाजिक संस्थांच्या संदर्भात प्रबोधनाची काय वाटचाल झाली याचाच आढावा घेणार आहे. मराठी समाजाची उभारणी धर्म व जात या दोन घटकांच्या आधारावर झालेली होती, असे म्हटले तरी वावगे होणार नाही. व्यक्तीच्या व्यक्तिगत व सामाजिक जीवनावर या दोन संस्थांचा अंमल चालत होता. त्याचा आचार व विचार, त्याचे वर्तन व परस्पर संबंध यांना पाया होता धर्माचा व वर्णजातीचा. मराठी समाजातील नव्या मध्यमवर्गाने - सुशिक्षितांनी प्रबोधनाच्या वाटचालीत या दोन संस्थांच्या संदर्भात कोणती भूमिका घेतली होती, कोणत्या पुनर्रचनेचा आग्रह धरला होता, वैश्विकतेचा व समतेचा कसा पुरस्कार केला होता हे पाहणे म्हणजेच एका अर्थाने महाराष्ट्रातील प्रबोधनाचा आढावा घेणे असे म्हणता येईल. इतर संस्था-क्षेत्रातील नवी मांडणी एका अर्थाने आनुषंगिक होती.

## धर्मचिंतन

हिंदुस्थानचे आर्थिक शोषण करणे हे वसाहतवादाचे प्रमुख वैशिष्ट्य होते परंतु त्याचबरोबर आपले साम्राज्य कायम राखण्यासाठी येथील समाजावर बौद्धिक वर्चस्व प्रस्थापित केले पाहिजे हे ब्रिटिशांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांचे जे अनेक प्रयत्न चालू होते त्यातील एक होता हिंदू धर्मावर टीका करून ख्रिश्चन धर्माचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे. त्यामुळे ख्रिस्ती धर्मप्रसारक एका बाजूस तर हिंदू सनातनी मंडळी दुसऱ्या बाजूस, असा वैचारिक सामना मुंबईस व काही अंशी पुण्यात झाला. या वैचारिक मंथनातून मराठी समाजात नव्या धर्मचिंतनास सुरुवात झाली. ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या प्रचाराला उच्चवर्णियांतील फार थोडी मंडळी बळी पडली. उलट स्वधर्माचं रक्षण करण्याच्या हेतूने मराठी मुलखात धर्मसुधारणेची चळवळ उभी राहिली. मूर्तिपूजेस विरोध, एकाच ईश्वरावर श्रद्धा, सर्वजण ईश्वराची लेकरे आहेत इत्यादी ख्रिस्ती तत्त्वांचा या सुधारणेच्या चळवळीवर प्रभाव पडला होता. पण याचा अर्थ असा नव्हे की ते ख्रिस्ती तत्त्वांच्या आहारी गेले होते. या ठिकाणी आपल्याला दादोबा पांडुरंगाचे (१८१४-१८८२) उदाहरण घेता येईल. दादोबा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरतेस 'मानवधर्म सभा' सुरू केली होती. पुढे मुंबईस आल्यानंतर दादोबांनी रामचंद्र बाळकृष्ण जयकर, बाबा पदमनजी यांच्या सहकार्याने परमहंस सभा १८४९मध्ये स्थापन केली. या सभेच्या बैठकी गुप्तरित्या चालत असत. दादोबांनी आपल्या 'धर्मविवेचन' (१८६८) या पुस्तकात परमहंस सभेचे तत्त्वज्ञान मांडले होते. मूर्तिपूजा व जातिसंस्था या हिंदुंच्या दोन महत्त्वाच्या गोष्टींवर सभेचा विश्वास नव्हता. एकेश्वरवाद त्यांनी स्वीकारलेला होता. दादोबांनी अत्यंत जाणीवपूर्वक परकीय धर्माला विरोध करून स्वतंत्रपणे धर्मचिकित्सा करण्यास प्रारंभ केला, ख्रिस्ती धर्मातील वैगुण्यावर प्रकाश टाकला. हिंदू व ख्रिश्चन धर्मातील दोषपूर्ण भाग बाजूला टाकणारा मानवतावादी एकेश्वरवाद मांडण्याचा पहिला प्रयत्न म्हणून आपण परमहंस सभेकडे पाहिले पाहिजे. पुणे, सातारा, अहमदनगर इत्यादी शहरात सभेच्या शाखा सुरू झाल्या होत्या. परंतु १८६०च्या दरम्यान सभेचे कामकाज थांबलेले दिसते. मात्र त्यानंतर १८६७मध्ये स्थापन झालेल्या प्रार्थना समाजात या सभेचे काही सभासद गेले. प्रार्थना समाजाने सभेची धर्म व जातिसंस्थेबाबतची जहाल मते बाजूला ठेवून विश्वधर्मी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला.

## प्रार्थना समाज

प्रार्थना समाजाच्या विचारांचे सार आपल्याला मिळते न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१) यांच्या 'धर्मपर व्याख्याने' या पुस्तकात (१९०२ साली प्रसिद्ध झालेले) आणि 'भारतीय एकेश्वरवादाचे तत्त्वज्ञान' या लेखात रानडे यांनी आपल्या नव्या धर्मचिकित्सेस भागवत धर्माची नवी आवृत्ती मानली. 'धर्मपर व्याख्याने' या प्रार्थना समाजात दिलेल्या व्याख्यानात रानडे यांनी कर्ममार्ग, योगमार्ग व ज्ञानमार्गापेक्षा भक्तिमार्ग कसा श्रेष्ठ आहे हे स्पष्ट केले आहे. भक्तिमार्ग सर्व जातीच्या स्त्री-पुरुषांस खुला असलेला, सोपा असा प्रेममार्ग आहे, असे सांगून त्यांनी प्रार्थना समाजाच्या धर्मकल्पनेतील व

भक्तिमार्गातील साम्य दाखवून दिले. याच व्याख्यानात रानडे यांनी हिंदू व ख्रिस्ती धर्मातील भेद नेमका कोणता याची सविस्तर चर्चा केली आहे. ख्रिस्ती मतातील कोणता भाग अग्राह्य आहे व हिंदू धर्म कसा सरस आहे, याचे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. हिंदू धर्म कसा उदारमतवादी व सर्वसमावेशक आहे याचे सोदाहरण स्पष्टीकरण केले आहे. भारतीय एकेश्वरवादाचे तत्त्वज्ञान या लेखाकडे मराठी माणसाचे म्हणावे तसे लक्ष गेलेले नाही (दि. के. बेडेकरांचा अपवाद वगळता). या लेखात चिद्‌वाद, जडवाद, अज्ञेयवाद तसेच अद्वैत किंवा द्वैत मतातील त्रुटी किंवा अतिरेक स्पष्ट करून विशिष्ट अद्वैत मताचा पुरस्कार रानडे करतात. तसेच त्यातूनच त्यांचा भारतीय ईश्वरवाद कसा निर्माण होतो याचे विवेचनही त्यांनी केले आहे. या लेखात त्यांनी पाश्चिमात्य व भारतीय तत्त्वज्ञानाचा मधुर संयोग घडवून आणला आहे व त्यास भारतीय ईश्वरवाद असे संबोधले आहे. एकोणिसाव्या शतकातील धर्मचिंतनाचा सर्वोच्च आविष्कार रानडे यांच्या धर्मपर व्याख्यानात दृष्टीस पडतो. अंधश्रद्धा, अज्ञेयवाद आणि गूढवाद यापासून दूर राहणाऱ्यास विश्वधर्म प्रतीत होतो असे त्यांचे म्हणणे होते. ईश्वर हा सृष्टीमध्ये सर्वत्र नांदत आहे व सृष्टीच्या नियमबद्धतेत व हेतुपूर्वकतेत ईश्वर-प्रत्यक्षता आपल्याला अनुभविता येते हे या विश्वात्मक ईश्वरवादाचे मुख्य सूत्र आहे. विश्व हे परतत्त्वाने प्रेरित आहे व मानवही अतिमानवी अंशाने प्रेरित आहे, असा या वादाचा विश्वास आहे. मानवाला स्वत्वाचे भान आहे तसेच अमुक एक आचरण करावे की न करावे हे ठरविण्यासाठी जरूर ते बुद्धीचे स्वातंत्र्य त्याला आहे. अर्थात या स्वातंत्र्याला विशिष्ट मर्यादा आहे.

रानडे यांच्या या धर्म चिंतनाच्या जवळ जाणारा विचार महात्मा फुले (१८२७-१८९०) यांनी वेगळ्या दृष्टिकोनातून मांडला. कनिष्ठ जातीत जन्मलेल्या फुले याचे शिक्षण स्कॉटिश मिशनच्या शाळेत झाले. त्यांच्यावर ख्रिस्ती धर्मविचाराचा प्रभाव त्यामुळे लहानपणापासूनच पडला होता. 'ज्ञानोदय' या खिस्ती नियतकालिकातील नेकन, थॉमस पेनचे मानवी हक्क नियामक विचार, परमहंस सभेची तत्त्वे आणि जॉन विल्सन व रॉबर्ट नेसाबेट या धर्मप्रसारकांची पुस्तके या सर्वांचा परिणाम फुले यांच्या धर्मचिंतनावर झाला होता. त्यांच्या धर्मचिंतनाचा परिपाक त्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तिका' (१८९१) या ग्रंथामध्ये दृष्टीस पडतो. फुले यांनी ख्रिस्ती व ब्राह्मणी हिंदू धर्म कसा नाकारला होता, हे हा ग्रंथ वाचल्यावर आपल्याला कळते. निर्माणकर्त्याने सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न केले आहे. सर्व स्त्री-पुरुष हे जन्मत:च स्वतंत्र व सर्व हक्कांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, अशी उच्चतम मानवतावादी व समतावादी धर्मकल्पना फुले यांनी त्यात मांडली आहे.

## विरोधी विचार

न्या. रानडे किंवा महात्मा फुले यांच्या धर्मसुधारणेच्या प्रार्थना समाजी व सत्यशोधकी प्रयत्नाला विरोध करणारा प्रवाह विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या (१८५०-१८८२) 'निबंधमाले'तून व्यक्त झाला. प्रबोधनाच्या वाटचालीचा आढावा घेताना या छेद देणाऱ्या घटकांची नोंद करणे जरूर आहे. शास्त्रीबुवांनी आर्य समाज, प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज यासारख्या सर्वच सुधारकी प्रयत्नांची निबंधमालेतून चेष्टा व हेटाळणी केलेली दिसते. ख्रिस्ती धर्माच्याकडे या मंडळींचा ओढा आहे व ते हिंदू धर्म विरोधक आहेत. ख्रिस्ती धर्माचे अनुकरण करण्यात ते स्वत:ला धन्य मानतात असा त्यांचा सुधारकांवर आरोप होता. शास्त्रीबुवांचा फुले यांच्यावर जरा जास्तच राग होता, त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या अहवालाचे परीक्षण करताना त्यांनी फुले यांची बेलगाम भाषेत कुचेष्टा केली आहे. त्यांना कमी लेखण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला आहे. चिपळूणकरांनी सुरू केलेली धर्मप्रबोधनाची हेटाळणी पुढे लोकमान्य टिळकांच्या लेखनात जास्त तिखट भाषेत चालू राहिली व त्याला उत्तर देणे सुधारकांना झेपले नाही.

परंतु, या संदर्भात चर्चा करताना सत्यशोधक समाज व प्रार्थना समाज यात फरक केला पाहिजे. प्रार्थना समाज हा मुख्यत: उच्चभ्रू समाजापुरता मर्यादित राहिला. उच्चशिक्षित व मवाळ राजकीय भूमिका घेणाऱ्या मूठभर मंडळींनी प्रार्थना समाजाचे सभासदत्त्व घेतले होते. न्यायमूर्ती रानडे यांनी भक्तिमार्गातील व प्रार्थना समाजातील साधर्म्य दाखविण्याचा जरी प्रयत्न केला तरी भक्तिमार्गाप्रमाणे त्यांचा समाज सामान्यांपर्यंत पोहचू शकला नाही. तसेच फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म व रानडे यांचे प्रार्थना समाजी तत्त्वज्ञान यात बरेच साम्य आढळते पण त्यांची तोंडे दोन दिशांनाच राहिली. पुढे १९२६ साली प्रार्थना समाजाचे सभासद विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४) यांनी यावर भाष्य करताना म्हटले की, "मूठभर शहरी सुशिक्षित पुढारी आणि अफाट पसरलेला ग्रामीण समाज व त्यांचे पुढारी यांच्यामध्ये असलेल्या दुर्दैवी पडद्यामुळे एकाची भाषा आणि कळ दुसऱ्याला समजली नाही, कोणी कोणाच्या वंशा जावे म्हणजे हा भेदक पडदा दूर होईल?"

## आगरकरांचे धर्मचिंतन

रानडे व फुले यांच्यापेक्षा वेगळ्या धर्मविचाराचा गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५) यांनी शहरी सुशिक्षित समाजात प्रसार करण्याचा यत्न केला. हर्बर्ट स्पेन्सर यांच्या धर्मविषयक सिद्धान्ताचा मराठी सारांश आपल्या 'सुधारका'तील लेखमालिकेतून त्यांनी प्रसिद्ध केला. हा सारांश करताना त्यांनी हिंदू धर्मातील उदाहरणे घेतली. पिशाच्च कल्पनेत धर्मकल्पनेचे मूळ असून धर्मकल्पनेचा हळूहळू विकास होत जाऊन अज्ञेयवादाचा उदय होतो अशी त्यांची थोडक्यात मांडणी होती. ते स्वतःस बुद्धिप्रामाण्यवादी व अज्ञेयवादी मानीत. स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादाच्या आधारे धर्मसंस्थेचा उगम व विकास कसा होतो हे त्यांनी जाणले होते. आपला समाज अद्याप विकासाच्या उच्च टप्प्यावर जाऊन पोहोचलेला नाही. एकेश्वरवादाचाच टप्पा अजून तो गाठू शकला नाही याचीही कल्पना त्यांना होती तरीही त्यांनी महादेव हा महापिशाच्च आहे, असे लोकांना 'सुधारका'तून पटवून देण्याचा प्रयत्न करून रानडेकृत धर्मसुधारणेच्या प्रश्नात गुंतागुंत निर्माण केली. रानडे यांचे आगरकर पद्धतीच्या अज्ञेयवाद, बुद्धिप्रामाण्यवाद व विज्ञानवादावरील भाष्य फार बोलके आहे : ''सर्व तत्त्वचिंतनापासून बिचकून दूर सरणारा आणि कासवाप्रमाणे अशा स्पर्शांपासून अंग चोरून, आखडून घेणारा हा विचार म्हणजे बुद्धीच्या पक्षाघातासारखा आहे''.

## लोकमान्य टिळक

न्या. रानडे यांचा भक्तिमार्गास महत्त्व देणारा एकेश्वरवाद लोकमान्य टिळकांच्या टीकेचा विषय बनला. लोकमान्यांनी एका बाजूस निवृत्तीपर विचारावर हल्ला करून लोकांना कर्मप्रवृत्त करण्याची कल्पना मांडली व दुसऱ्या बाजूने प्रार्थना समाजी ईश्वरवादाला व भक्तिपर धर्मप्रेरणेला गौण ठरविले. 'गीतारहस्या'मध्ये ज्ञान, कर्म व भक्ती या तीन मार्गांच्या समावेशाची कल्पना टिळकांनी मांडली असली तरी त्यांचा मुख्य भर कर्मयोगावर आहे, हे सर्वश्रुतच आहे. परंतु 'गीतारहस्या'तून केलेल्या तात्त्विक चर्चेपेक्षा धर्माच्या क्षेत्रात महत्त्वाचा ठरला त्यांचा गणपती उत्सव हे लक्षात घेतले पाहिजे. ब्रिटिश सरकारच्या हिंदू-मुस्लिमांतील भेदाचा फायदा घेणारी कुटील नीती व १८९३-९४मध्ये उसळलेले हिंदू-मुस्लिम दंगे या पार्श्वभूमीवर हिंदुंना एकत्र करणारा व त्यांच्यात सामूहिक धर्मकारणाला सुरुवात करून त्यास राजकीय राष्ट्रीय ध्येयाला तोडणाऱ्या गणपती उत्सवांची सुरुवात (१८९४) झाल्यापासून धर्मप्रबोधनाचे प्रार्थनासमाजी प्रयत्न निष्प्रभ ठरले. फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म त्यांच्या मृत्यूनंतर (१८९०) काही अनुयायांपुरता मर्यादित राहिला.

## हिंदुत्ववाद

लोकमान्यांनी हिंदुंच्या जहाल राजकारणाचा प्रारंभ केला, हे जरी खरे असले तरी पुढे २०व्या शतकातील बदलत्या परिस्थितीला योग्य तो प्रतिसादही दिला, याची नोंद केली पाहिजे. लखनौ करारातील (१९१५) मुस्लिम राजकीय आकांक्षांचा विचार करणारी त्यांची भूमिका या संदर्भात लक्षात घेतली पाहिजे. परंतु त्यानंतर मात्र स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जी हिंदुत्त्वाची ललकारी दिली. त्यामुळे महाराष्ट्रातील धर्मप्रबोधनाचा विचार जास्तच क्षीण झाला. मुस्लिम द्वेषावर आधारलेली आक्रमक हिंदुत्वाची संकल्पना मांडून तिला हिंसेच्या उदात्तीकरणाची डूब सावरकरांनी दिली. सामान्यांच्या धर्मभोळेपणावर टीका करून त्यांनी विज्ञानवादाचा आग्रह धरला. मुस्लिम धर्मासारखा सुसंघटित व एकोपा असलेला आपला धर्म नाही याची खंत बाळगून हिंदुधर्मीयांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर युरोपातील सामाजिक जातीयवादाचा प्रभाव होता त्यामुळे त्यांनी स्वतःच्या विषमतावादी विचाराला नकली विज्ञानाची जोड दिली. त्यांचा जातीविषयक व अस्पृश्यतेविषयक दृष्टिकोन वरून पाहता सुधारकी वाटला तरी कनिष्ठ जातबांधवांना आकृष्ट करू शकला नाही. कारण त्याच्या मागे हिंदुत्त्वाचे फॅसिझमकडे झुकणारे तत्त्व होते. टिळकांच्या नंतर 'केसरी'चे धुरिणत्व ज्यांच्याकडे आले त्या न. चिं. केळकरांना याच सावरकरी हिंदुत्वाचे आकर्षण होते. महाराष्ट्रातील प्रबोधनाची चर्चा करीत असताना आपण हे विसरलो की याच प्रांतातून हिंदुत्वाचे हे तत्त्वज्ञान निर्माण झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापनाही मराठी समाजातूनच १९२१ साली झाली व त्याकडे बरेच उच्चवर्णीय तरुण आकृष्ट झाले होते. महाराष्ट्रातच गांधीहत्येचा कट शिजला होता याचाही आपल्याला या चर्चेच्या वेळी विसर पडतो.

न्या. रानडे यांचा धर्मविचार २०व्या शतकात या हिंदुत्वाखाली दबून गेला. तो काही प्रमाणात तेवत ठेवण्याचे कार्य विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. त्यांनी इंग्लंडमध्ये तुलनात्मकदृष्ट्या धर्माचा अभ्यास केला होता. मराठा जातीत जन्मलेल्या

शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे जवळ जवळ १० वर्षे कार्य केले. हिंदुस्थानातील धर्मपरंपरेचा सखोल अभ्यास करून त्यांनी असे प्रतिपादन केले की भारतीय संस्कृतीवर आर्यपूर्व संस्कृतीची छाप स्पष्टपणे पडलेली आहे. त्यांना विशेष प्रिय असणारा भक्तिमार्ग हा आर्यपूर्व आहे. ज्ञान व कर्म ही आर्य संस्कृतीची लक्षणे होती तर योग व भक्ती ही आर्यपूर्व धर्माची लक्षणे होती. भक्तिमार्गाचा जैन व विशेषत: बौद्ध परंपरेशी किती जवळचा संबंध होता हे त्यांनी आपल्या प्रतिभाशाली लेखनात दाखवून दिले आहे. शिंद्यांच्या धर्मचिंतनाचा म्हणावा तसा अभ्यास अद्याप झालेला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

## धर्मप्रबोधनाच्या मर्यादा

या समालोचनातून एक गोष्ट प्रकर्षाने पुढे येते. महाराष्ट्रात प्रबोधनाच्या प्रारंभापासूनच धर्म प्रबोधनासही सुरुवात झाली. हिंदू व ख्रिश्चनधर्मातील दोषपूर्ण भाग टाकून नव्या मानवतावादी धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न झाला. त्यासाठी आपल्या परंपरेतील समतावादी परंपरा आणि भक्तिमार्गाची मदत घेण्यात आली. परंतु त्यास अवरोध करणारे प्रवाह याच कालखंडात उदय पावले व त्यांनी हिंदू धर्माला विज्ञानवादाच्या व अज्ञेयवादाच्या तसेच हिंदुत्ववादाच्या दावणीस बांधण्याच्या तसेच त्याचा राजकीय चळवळीसाठी उपयोग करण्याच्या प्रकारास प्रोत्साहन दिले. धर्म प्रबोधनाचा विचार त्यामुळे क्षीण बनला किंवा निष्प्रभ झाला असे म्हणता येईल. स्वातंत्र्योत्तरकाळात वाढलेला हिंदुत्ववादी विचाराचा जोर, जातजमातवाद, धार्मिक दंगली, दलित-सवर्ण यांचे स्पष्टीकरण करताना आपल्याला त्यांचे धागे प्रबोधनाच्या प्रक्रियेत झालेल्या गफलतीपर्यंत न्यावे लागतात. परिस्थिती बदलल्यामुळे काही प्रकारांना जास्त पाठिंबा मिळाला असेल पण त्यांची निदान वैचारिक तयारी तरी प्रबोधन काळातच झाली होती असे दिसते.

## जातीसंस्था

महाराष्ट्रातील प्रबोधनाची वाटचाल समजून घेण्यासाठी जातीसंस्थेबाबत कोणता विचार या काळात झाला हे पाहिले पाहिजे. स्वधर्माची जशी मीमांसा प्रबोधनाच्या प्रक्रियेत झाली तशी जातीसंस्थेची होणे क्रमप्राप्तच होते. हिंदू धर्माची समीक्षा वर्णाश्रमधर्माला सोडून करणे म्हणजे हिंदू धर्माच्या वास्तवातील रूपाकडे दुर्लक्ष करण्यासारखे झाले असते. दादोबा पांडुरंगांपासून सुरू झालेल्या धर्मचिकित्सेचा एक भाग जातीसंस्थेबाबत तुम्ही काय भूमिका घेता हा होता. दादोबांनी वर नोंद केल्याप्रमाणे जातिभेद पूर्णपणे नाकारला होता. लोकहितवादींनी १८४८ ते १८५० या काळात 'शतपत्रां'तून जातीव।बतची आपली निरीक्षणे मांडली व पुढे १८७७मध्ये 'जातीभेद' हे पुस्तक लिहून या विषयाची सविस्तर चर्चा केली. लोकहितवादींनी 'शतपत्रां'च्या काळात ब्राह्मणांवर कडाडून हल्ला केला. त्यामुळे भले भले बिथरून गेले. चिपळूणकरांचा त्यातच समावेश होता. परंतु लोकहितवादींच्या जातीभेदावरील सर्व लिखाणाचा संगतवार विचार केला तर असे दिसते की त्यांची जातीसंस्थेबाबतची भूमिका जहाल नव्हती आणि उत्तर आयुष्यात तर ती आणखीच मवाळ झाली. आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर असल्याने चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या विरोधी भूमिका ते घेऊ शकले नाहीत. जाती राहणार फक्त जातीअभिमान नसावा असे त्यांना वाटत होते. ब्राह्मण समाजाचे नेते आहेत म्हणून त्यांच्यात प्रथम सुधारणा झाली पाहिजे या कल्पनेने त्यांनी ब्राह्मणांवर टीका केली होती.

## न्यायमूर्ती रानडे यांचा अभिजनवाद

न्यायमूर्ती रानडे यांनी भागवत धर्माचा पुरस्कार केला कारण योगमार्ग व ज्ञानमार्ग शूद्रांना अधिकार देत नाहीत. भागवत धर्मात मात्र समानता मानली आहे व तो सर्वांना सोपाही वाटतो. लहानात लहान समूहाचा सभासद असण्याबद्दलचा अभिमान बाळगण्याच्या वृत्तीवर रानडे यांनी टीका केली. जातीसंस्था प्रत्येक व्यक्तीचा रोटी-बेटी व्यवहार लहानात लहान समूहात मर्यादित करते व त्यातून अलगतेची भावना निर्माण होते. अलगता, वेगळेपणा याऐवजी भ्रातृभाव आणि परस्परसंबंध याकडे समाजाची प्रगती व्हावी असे त्यांना वाटत होते. रानडे व फुले यांचे परस्पर संबंध होते व फुले काय करीत होते याची कल्पना रानडे यांना आली होती. तरी फुले यांचा ब्राह्मणी वर्चस्वावरील हल्ला व शूद्र-अतिशूद्रांचे बंड त्यांना रूचले नसावे असे वाटते. रानडे यांच्या मते सर्वांगीण सुधारणेची चळवळ हिंदुस्थानात जी उभी राहणार ती समाजातील अभिजनवर्गाकडूनच. कोणत्याही समाजात काही निवडक लोकच नेहमी नेतृत्व करीत असतात. सामाजिक व धार्मिकदृष्ट्या हा वर्ग पुढारलेला असतो. त्यांच्याकडे बुद्धिमत्ता, संपत्ती, बचतीची सवय, ज्ञान आणि संघटन-कौशल्य असते. बहुसंख्य लोक अशिक्षित, अदूरदर्शी, अज्ञानी, असंघटित, खर्चिक व गरीब असतात. या दोन वर्गातील समतोल

राखणे कोणत्याही राजकीय डावपेचांना शक्य होणार नाही. रानडे यांच्या या अभिजनवर्गात इंग्लिश शिक्षण घेतलेल्या सुशिक्षितांचा प्रामुख्याने समावेश केला होता. याच कारणासाठी त्यांनी उच्च शिक्षणावर भर दिला होता. या समाजातील अभिजन वर्गास उपयोगी शिक्षण देणे हे साम्राज्याच्या हिताचे आहे असे त्यांनी सांगितले.फुले यांच्या हंटर आयोगापुढील साक्षीपेक्षा उलटा विचार रानडे यांनी मांडून म्हटले की प्राथमिक शिक्षणावर फार पैसा खर्च करू नये. वंशपरंपरेने ज्या वर्गाकडे शिक्षणाचे कार्य होते त्यांना शिक्षण देण्यावर जोर द्यावा आणि या सुशिक्षितांना सरकारी नोकरीमध्ये जागा द्याव्यात. या स्वरूपाच्या त्यांच्या मागण्यांवरून लक्षात येते की ब्राह्मण व शिक्षणाची परंपरा असलेल्या इतर जातींच्या शिक्षणावर त्यांनी भर दिला होता. ब्राह्मण लोकच नेतृत्व करू शकतील असा विश्वास औद्योगिक परिषदेच्या पुढे केलेल्या भाषणातही त्यांनी व्यक्त केला होता. मतदानाचा हक्क कोणास द्यावा हे सांगत असताना रानडे यांनी हे पुन:पुन्हा स्पष्ट केले आहे की, जो वर्ग पुरेसा शिकलेला व श्रीमंत आहे त्यालाच हा हक्क द्यावा.

जमीनदार व वतनदारांचा वर्ग समाजाचा पारंपरिक नेतृत्व करणारा वर्ग आहे व तो समाजाच्या उपयोगाचाही आहे म्हणून अभिजनवर्गात सुशिक्षितांबरोबरच त्यांचाही समावेश रानडे यांनी केला होता. जमीनसुधारणेबाबतचे त्यांचे विचार जमीनदारांच्या बाजूचे होते. संपत्ती असलेल्या लोकांचा पुढाकार शेतीच्या प्रगतीस जरूर आहे असे त्यांचे मत होते. श्रीमंत शेतकऱ्यावर त्यांची भिस्त होती. रानडे यांचे विचार असे अभिजनवादी असल्यामुळे त्यांना फुले यांचे जहाल व शूद्रातिशूद्रांच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान पटण्यासारखे नव्हते. जातीसंस्थेबाबत त्यांची भूमिका त्यामुळेच फार मवाळ राहिली. स्त्रियांना योग्य ते स्थान मिळावे यासाठी ठरावामागे ठराव करणाऱ्या त्यांच्या सामाजिक परिषदेस अस्पृश्यता किंवा जातीसंस्थेवरील ठराव संमत करण्यास बरीच वर्षे वाट पाहावी लागली. सामाजिक परिषदेत ज्या सुधारणांची चर्चा चाले त्या मुख्यत्वेकरून उच्च जातीबांधवांच्या रुढींबाबतची असे. जेव्हा रामकृष्ण गोपाळ भांडारकर (सारस्वत) (१८३७-१९२५) १८९५ साली परिषदेचे अध्यक्ष झाले तेव्हा रानडे यांनी जातीसंस्थेचा निषेध करणारा ठराव संमत करण्यास संमती दिली. रानडे यांचा फुले यांच्या जहाल मतास विरोध होता. त्यांना समाजात एकोपा असावा असे वाटत होते. शिवाजीच्या यशाचे विश्लेषण करताना शिवाजीने सर्व वर्णांना बरोबर घेऊन कसे राज्य केले. पेशव्यांच्या काळात या धोरणाकडे दुर्लक्ष झाल्याने मराठा साम्राज्याचा ऱ्हास झाला याकडे त्यांनी लक्ष वेधले. ब्राह्मणांचे वर्चस्व निर्माण करण्याच्या पेशव्यांच्या प्रयत्नांवरही त्यांनी टीका केली होती.

## आगरकरांचा उत्क्रांतीवाद

गोपाळ गणेश आगरकर यांच्या बुद्धिप्रामाण्यवादाला महात्मा फुले यांचा जहाल मानवतावाद कळू शकला नाही. याची साक्ष आगरकरांचे 'सुधारका'तील निबंध देतात. फुले यांना ते रेव्हरंड म्हणतात यातच आगरकरांची मर्यादा लक्षात येते. त्यांचे वाक्य असे आहे : "रेव्हरंड जोतिबांसारख्यांनी दुराग्रहामुळे किंवा अविचारामुळे हिंदुस्थानातील वर्णव्यवस्था अप्पलपोट्या ब्राह्मणांनी केली आहे असे प्रतिपादण्यास अशांच्या तोंडाला हात लावण्याची सोय नाही असे म्हणून स्वस्थ बसले पाहिजे". हर्बट स्पेन्सरच्या प्रभावाखाली आगरकरांनी प्राण्याच्या शरीरात जशी उत्क्रांती होते तशीच समाजव्यवस्थेत होते असे मानले होते. त्यामुळे जातीभेद आपल्या समाजाच्या विकासक्रमात निर्माण झाले आहेत. ते आपोआप निर्माण झाले आहेत. जातीभेदाने आजपर्यंत आपले नुकसान झाले आहे. उत्तरोत्तर म्हणूनच तो क्षीण होत गेला पाहिजे. जातीभेद क्षीण होत जाऊन एकोपा व खरी बंधुप्रीती स्थापन व्हावी असे त्यांना वाटत होते. प्रत्येक समाजाच्या विशिष्ट स्थितीत वर्णव्यवस्थेसारखा किंवा जातीभेदासारखा लोकविभाग अस्तित्वात आल्याशिवाय राहत नाही. सुधारणेच्या मार्गावर असलेल्या प्रत्येक समाजात कशा ना कशा प्रकारचा जातीभेद येतोच. विशेषत: 'भटजात' ज्या लोकांत अस्तित्वात आलेली नाही असे कोणत्याही सुधारलेल्या देशात आढळणार नाही. आगरकरांच्या मते जातीभेदाने आपले फायदेही झालेले आहेत. प्रस्थापित आचार यथास्थितपणे चालून समाजास एका प्रकारचे स्थैर्य येते. जो तो क्रमागत आलेला मार्ग आनंदाने आचरतो. फायद्यासाठी एक वर्ग दुसऱ्या वर्गाशी स्पर्धा करीत नाही. कलेचे संगोपन होते. प्रत्येक व्यक्ती आपापल्या जागी खिळली जाऊन आपापले कार्य नीटपणे बजाविते त्यामुळे सामाजिक रचनेस स्थैर्य लाभते. हा आहे आगरकरांचा जातीभेदविषयक विचार. अप्रत्यक्ष व प्रत्यक्षपणे त्यांनी जातीभेदाचे समर्थन केले आहे असे थोडक्यात म्हणता येईल. इतर सर्व बाबतीत जहाल भूमिका घेण्यास न कचरणारे आगरकर जातीसंस्थेबाबत मात्र सामोपचाराची मवाळ भूमिका घेतात. त्यांच्या एवढ्या लेखसंग्रहात जातीभेदावर फक्त एका लेखात चर्चा येते आणि स्त्रियांचा किंवा पुरुषांचा पेहराव या विषयावर मात्र लेखमाला येते यावरून आमरकरांना आपल्या समाजाच्या मुळाशी असलेल्या जातीसंस्थेबाबत व त्यातील विषमतेबाबत किती कमी महत्त्व वाटत होते हे ध्यानात येते. ब्राह्मण स्त्रियांच्या सामाजिक स्थानाबद्दल पानोन्‌पाने मजकूर लिहिणारे आगरकर जातीभेदावर मात्र दोनचार पानात हात आखडता घेतात हेही लक्षात येते.

## पडवळ व फुले

ब्राह्मण जातीतून आलेल्या या विचारवंतापेक्षा वेगळा मूलगामी विचार आपल्याला मुंबईच्या भंडारी जातीत जन्मलेल्या तुकारामतात्या पडवळ (१८३८-१८९८) यांच्या 'जातिभेद विवेकसार' (१८६१) या पुस्तकात आढळतो. पडवळ हे फुले यांचे मित्र होते. त्यांच्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती (१८६५) फुले यांनी प्रसिद्ध केली होती. कनिष्ठ जातीच्या दृष्टिकोनातून जाणीवपूर्वक लिहिलेले हे पहिले मराठी पुस्तक होय. जातीसंस्थेची घट्ट बंधने कशी अन्यायकारक आहेत याचे विवेचन करून पडवळांनी सर्वच वर्ण कसे एकमेकात मिसळून गेलेले आहेत तसेच वर्ण या सामाजिक संस्थेला ब्राह्मण व मराठ्यांच्या संदर्भात राजकीय सत्तेचे परिमाण कसे लाभले आहे हे प्रथमत: दाखवून दिले.

पडवळ यांच्या पावलावर पाऊल टाकून येतात महात्मा फुले यांचे सत्यशोधकी विचार. 'ब्राह्मणांचे कसब' (१८६९), 'गुलामगिरी' (१८७३), 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८२-८३ मधील भाषणे) इत्यादी पुस्तकांतून फुले यांनी जातीसंस्थेबाबतचा स्वत:चा सिद्धान्त मांडला आहे. एकोणिसाव्या शतकात हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाबद्दल जे संशोधन झाले होते त्याचा, तसेच ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या लिखाणांचा उपयोग हा सिद्धान्त मांडताना केलेला आहे असे दिसते. ब्राह्मण म्हणजे आर्य होते. त्यांनी आपल्या देशावर आक्रमण केले व येथील मूळ रहिवाशांचा (शूद्र-अतिशूद्र) पराभव केला. आपले वर्चस्व येथील समाजावर कायमचे लादावे या उद्देशाने त्यांनी पुराणे रचली, वर्णसंस्था व जातीसंस्था या समाजावर लादली. भट-भिक्षुकांची मक्तेदारी निर्माण करून भटांना-ब्राह्मणांना उच्चस्थान प्राप्त करून घेतले. हिंदू धार्मिक ग्रंथाचा व पुराणांचा नवा अर्थ लावून फुले यांनी ब्राह्मणांच्या कटकारस्थानाची कल्पना मांडली होती. अशाप्रकारे फुले यांनी सर्व कनिष्ठ जातींना ब्राह्मणेतरांना एक नवी अस्मिता प्राप्त करून दिली. शूद्रातिशूद्रांमध्ये अन्यायकारक जातीभेदाबद्दल विलक्षण चीड निर्माण केली. वर्णविग्रहाचा सिद्धान्त मांडणारे आपल्या देशातील पहिले सुधारक म्हणून फुले यांना ओळखले जाते ते यासाठीच.

## आर्यवंशाचे श्रेष्ठत्व

मॅक्स म्यूलरसारख्या भारतीय विद्येच्या अभ्यासकांनी त्या काळात इंडो-युरोपीय भाषिक गटाचा सिद्धान्त मांडला होता. त्यातूनच पुढे आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त विकसित झाला. जर्मनीसारख्या युरोपियन देशातील अभ्यासकांनी त्याची पद्धतशीर मांडणी केली त्यामुळे हिंदुस्थानातील उच्चवर्णीय त्या सिद्धान्ताकडे आकृष्ट झाले. वैदिक काळातील संस्कृतीच्या अभ्यासातून व इंडो-युरोपियन भाषिक गटाच्या अभ्यासातून असे सांगण्यात येऊ लागले की आर्य या देशात बाहेरून आले व जर्मनीसारख्या भागातही आर्यवंशाचे लोक आहेत त्यामुळे येथील उच्चर्णियांना अभिमानास्पद गोष्ट प्राप्त झाली. सध्या जरी आर्यांची ही शाखा परकीय अमलाखाली असली तरी शेवटी ती आर्यांचीच एक शाखा आहे या सिद्धान्ताचा महाराष्ट्रातील उच्चवर्णियांवर जबरदस्त प्रभाव पडला होता. ते स्वत:ला आर्यवंशाचे समजू लागले. त्यांच्या जातीसंस्थेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर त्याचा परिणाम झाला. वर्ण श्रेष्ठत्ववादी व वंशाभिमानी विचारप्रणालीचा उगम या सर्व प्रकारातून १९व्या शतकाच्या शेवटी झाला व २०व्या शतकात त्याचा विकास झाला. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाच्या सिद्धान्ताच्या प्रभावातून फार कमी उच्चवर्णीय सुटू शकले. पूर्वापार चालत आलेल्या जातीच्या अभिमानाला नवा वांशिक अभिमान येऊन मिळाला.

## चिपळूणकरी दृष्टिकोन

उच्चवर्णीय दृष्टिकोनातून जातीसंस्थेकडे म्हणून आपल्या समाजाकडे पाहण्याचा प्रारंभ विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून होतो. खरे तर लोकहितवादींची जातीभेदाबाबत मवाळ भूमिका होती तरीही त्यांनी ब्राह्मणांवर टीका केली म्हणून एकूण १२ निबंध लिहून चिपळूणकरांनी त्यांचा समाचार घेतला. 'शतपत्रे' १८४८ ते १८५० या काळात मुंबईतील 'प्रभाकर'मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यावर तसे म्हटले तर १८७९ साली १२ निबंध लिहिण्याचे प्रयोजन नव्हते. पण चिपळूणकरांना गप्प बसविले नाही. ब्राह्मणांवरील हल्ला परतवून लावणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांनी मानले. लोकहितवादींसारख्या जातीभेदाबाबत सौम्य दृष्टिकोन बाळगणाऱ्या विचारवंतावर चिपळूणकर एवढे संतापतात तर फुले यांच्या जहाल विचाराचा सामना त्यांनी केला यात नवल काहीच नव्हते. ब्राह्मणांच्या वर्चस्वाचे समर्थन त्यांनी एका स्वतंत्र लेखात केले होते. ब्राह्मणांना जे वर्चस्व प्राप्त झाले आहे ते त्यांच्या कार्यामुळे. ज्यास शहाणपण व सामर्थ्य आहे त्यांना दुसऱ्यावर आपले

वर्चस्व बसवावेसे वाटते व त्यास ते बसविताही येते. ज्यांच्यावर हे वर्चस्व लादलेले असते त्यांनी संतापून जाण्यात काही फायदा नाही. त्यांनीही शहाणपण शिकावे व सामर्थ्य संपादावे व दिवसाउजेडी त्यांच्याशी दोन हात मारून त्यांच्या हातून निसटून जावे. ब्राह्मण धर्माचा प्रसार इतर धर्मप्रसारकांप्रमाणे राक्षसी मार्गाने केला गेलेला नाही. केवळ सामोपचाराने संपादिलेल्या धर्मसत्तेबद्दल ब्राह्मणास दोष देणे चिपळूणकरांना अजिबात मान्य नव्हते. ब्राह्मणांनी राजकीय वर्चस्व ज्या प्रकारे स्थापन केले ते चिपळूणकरांना स्वाभाविक वाटत होते. तसे ब्राह्मणांनी केले नसते तर ते मनुष्यस्वभावाला व इतिहासशास्त्राला सोडून झाले असते. शहाणपणा अंगी असल्यावर त्याच्यापासून आपले हित करून घेण्याचा प्रयत्न कोण करीत नाही किंवा एकाच्या अज्ञानामुळे होणारा लाभ दुसऱ्याने मिळविला नाही असे कोठे झाले आहे असे प्रश्न विचारून बळी तो कान पिळी अशीच जगाची रहाटी आहे असे ते बजावतात. बडा मासा छोट्या माशास गिळण्याचा प्रयत्न करीत असतो. छोट्या मंडळींनी कट करून बड्यांशी सामना करावा हाच त्यावर उपाय आहे असे ते सांगतात. या प्रतिपादनात व ब्राह्मणांच्या वर्चस्वाच्या समर्थनात 'सर्व्हाव्हिल ऑफ फिटेस्ट' या सामाजिक डार्विनवादाच्या मुख्य तत्त्वाचा आधार घेतलेला स्पष्टपणे दिसतो. याच तत्त्वाचा आधार पुढे स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही (१८८३-१९६६) घेतला होता आणि तोही वर्णवर्चस्ववादाचा पुरस्कार करण्यासाठी.

## लोकमान्य टिळक

लोकमान्य टिळकांना जातीभेदाचे महत्त्व सुरुवातीच्या काळात वाटत नव्हते असे दिसते. पण जेव्हा ब्राह्मणेतरांची राजकीय चळवळ सुरू झाली तेव्हा मात्र त्यांना त्याची नोंद घ्यावीच लागली. शाहू महाराज (१८७४-१९२२) हे क्षत्रिय आहेत म्हणून त्यांना ब्राह्मणांनी वेदोक्त मंत्र सांगितले गेले पाहिजेत. या प्रकरणात टिळकांनी ब्राह्मणांची बाजू 'केसरी'तून उचलून धरली (१९०२) आणि तेव्हापासून टिळकांना ब्राह्मणांचे कैवारी म्हणून ब्राह्मणेतर पाहू लागले. जातीभेद ब्राह्मणांनी निर्माण केला हा फुले यांचा सिद्धान्त त्यांना अविचार वाटत होता. वेदकाली जे आर्य लोक हिंदुस्थानात आले त्यांचा आणि हिंदुस्थानातील काळ्या लोकांचा 'वर्ण' एक नसल्यामुळे व काळे लोक जिंकलेले असल्यामुळे या दोघात तो भेद राहिला तो अद्याप नाहीसा झाला नाही. जातीभेदाचे आद्य बीज या 'वर्णभेदातच' आहे. आर्य व दस्यू यांच्यात जो वर्णभेद झाला तोच पुढे कायम राहून उत्तरोत्तर जास्त होत गेला. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' या भगवद्गीतेतील वचनायोग्यच आहे. जातीभेदाची अशी उत्पत्ती सांगून ती जर खरी असेल तर जातीसंस्था मोडणे अशक्य आहे. हे आपण गृहीत धरावे अशी सूचना टिळकांनी केली होती. जातीभेद मोडला नाही तरी जातीमत्सर कमी होणे शक्य आहे. उच्चनीच भाव काढून टाकला पाहिजे पण त्यासाठी आंतरजातीय विवाह होणे जरूर नाही आणि तसे विवाह होऊ नयेत. परंतु धंदे बदलता यावेत, व्यवहारात मान हा योग्यतेवर अवलंबून ठेवावा असे त्यांचे एकूण मत होते. ब्राह्मणेतरांची राजकीय हक्कांची चळवळ सुरू झाल्यानंतर टिळकांनी ब्राह्मण व ब्राह्मणेतर यावर १९१७ व १९२० साली दोन लेख लिहून आपले म्हणणे मांडले होते. हे लेख लिहिताना त्यांनी ब्राह्मणांच्या प्रतिनिधीची भूमिका स्वीकारली होती. ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येतील प्रमाणाबाहेर जागा कायदेमंडळात मिळतात याला कारण जातीचा आग्रह नसून त्यांचे शिक्षण आहे. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरास शिक्षणरहित ठेवले या म्हणण्यास काहीच आधार नाही. ब्राह्मणेतरांना व्यावहारिक व धंद्याचे ज्ञान मिळतच असे. त्यांनी धंद्याकडे लक्ष देऊन शिक्षणाकडे दुर्लक्ष केले तर ब्राह्मणांनी शिक्षणाकडे लक्ष दिले म्हणून ब्राह्मणांना सरकार दरबारात जास्त जागा मिळत असतील तर त्यांच्या नावाने खडे फोडण्याचे खरे कारण नाही अशी मखलाशीची भाषा टिळकांनी वापरली होती. सरकार ब्राह्मणांना नेमते कारण ते सुशिक्षित आहेत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्यातील शिक्षणविषयक असमता कालांतराने निघून जाईल. तोपर्यंत ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा द्वेषमूलक भेद न करता सुशिक्षित व अशिक्षित असा भेद करावा असे टिळकांनी सुचविले होते. ब्राह्मण ब्राह्मणेतर वादात टिळकांनी एकूणात ब्राह्मणेतरांच्या विरोधी भूमिका घेतली याचे एक कारण होते ब्राह्मणेतरांचा स्वराज्य कल्पनेस विरोध. टिळकांच्या आयुष्याच्या शेवटी त्यांनी लोकशाही स्वरूपाच्या राजकारणाचा जो मसुदा तयार केला होता त्याचा विचार करता टिळकांच्या विचारात व कार्यात लोकशाहीकरणावर जोर होता व त्यादृष्टिने पाहता ते सत्ता कोणत्याही एका समूहाच्या हाती राहावी असे म्हणणारे नव्हते असे म्हणता येईल. पण त्याचबरोबर ब्राह्मण–ब्राह्मणेतर असा संघर्ष होऊ नये, हळूहळू ब्राह्मणेतरात शिक्षणाचा प्रसार होईल तसे त्यांना राजकारणात स्थान मिळेल असा विचार त्यांचा होता असे दिसते. ब्राह्मणांचे नेतृत्व करण्यामुळे त्यांच्या राजकारणावर काही मर्यादा पडल्या होत्या. तसेच ब्राह्मणेतरांचे सवत्यासुभ्याचे राजकारण त्यांना रुचत नव्हते हे ही खरे. वर्णव्यवस्थेवर त्यांचा विश्वास होता व त्यातही आर्य वंशाच्या श्रेष्ठत्वाच्या सिद्धान्ताचा त्यांच्यावर पगडा होता हेही स्पष्टपणे दिसते.

## शाहू महाराज

ब्राह्मणेतरांची चळवळ उभी राहिली ती शाहू महाराजांच्या प्रोत्साहनातून. ब्राह्मणेतरांमध्ये सुशिक्षितांची एक पिढी निर्माण झाली होती. तसेच काही भागातील शेतकऱ्यात सुस्थिती दिसू लागली होती. या वर्गाला राजकीय आकांक्षा व्यक्त करण्यास एका व्यासपीठाची गरज होती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी १९११च्या नंतर सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन करण्यास सुरुवात केली. तसेच स्वत:च्या कोल्हापूर संस्थानात ब्राह्मणेतरांना नोकऱ्या देण्यास प्रारंभ केला. कनिष्ठ जातीबांधवांसाठी वसतिगृहे काढली व ब्राह्मणविरोधी भूमिका घेऊन महाराष्ट्राच्या समाजकारणात हस्तक्षेप केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही त्यांनी सुरुवातीस साह्य केले. ब्राह्मणेतरांमध्ये उदयाला आलेल्या चळवळीला त्यांनी सक्रीय पाठिंबा दिला या सर्व गोष्टींमुळे सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या प्रबोधनाच्या क्षेत्रात शाहू महाराजांचे कार्य गौरवले गेले आहे व ते योग्यच आहे पण महाराजांची प्रबोधनाच्या चळवळीत झालेल्या योगदानाची नोंद घेताना आपण हे ही पाहिले पाहिजे की त्यांची एकूण जातीसंस्था पाहण्याची काय भूमिका होती. वर उल्लेख केल्याप्रमाणे शाहू महाराजांनी वेदोक्त मंत्रांचा आग्रह धरला व त्यातून ब्राह्मणांच्या विरोधात ते गेले पण त्याचे कारण ते स्वत:ला क्षत्रिय मानीत म्हणून.

महाराजांचा आर्य समाजाशी घनिष्ट संबंध होता. त्यांनी आर्य धर्माच्या दोन परिषदांचे व अखिल भारत क्षत्रिय परिषदेचे अध्यक्षपद भूषविले होते. खऱ्या वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्यावर व वर्णव्यवस्थेवर आर्य समाजाचा जोर होता. जातीभेदास विरोध होता. महाराजांनी क्षात्र जगद्‌गुरू नेमले होते तसेच क्षत्रिय वैदिक पाठशाळा कोल्हापूरी सुरू केली होती. यावरून असे दिसते की, शाहू महाराज महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा विचार पुढे नेण्याचा प्रयत्न करीत नव्हते. एकूणच ब्राह्मणेतर चळवळीत सत्यशोधकी विचार मागे पडला होता.

## वर्णवर्चस्ववाद

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'जात्युच्छेदक निबंध' मराठी समाजास फार प्रिय आहेत परंतु त्यात सावरकरांनी गुणांवर आधारित वर्णव्यवस्थेची तरफदारी केली आहे. याकडे लक्ष दिले जात नाही. चातुर्वर्ण्याच्या किंवा जातीभेदाच्या सर्व मुख्य प्रकारांच्या मुळाशी आनुवंशिक गुणविकासाचे सर्वसामान्य असे मुख्य तत्त्व आहे. हे तत्त्व जनहितकारक असून ज्यांच्या उपकारक प्रवृत्तीच्या पुण्याईवर आजवर ही संस्था जगत आली त्या सर्वात हे तत्त्व खरोखरच महत्त्वाचे आहे असे सावरकरांचे म्हणणे होते. यातून वंश व वर्ण श्रेष्ठत्व अनुवंशशास्त्राच्या आधारे कसे शास्त्रशुद्ध व हितकारक आहे हा सावरकरांचा युक्तिवाद स्पष्ट होतो. गुणावरच उच्चनीचता ठरविणारी समाजव्यवस्था आली तर कोणत्याही जातीय आणि विशेषत: ब्राह्मणजातीस भिण्याचे काही कारण नाही कारण ब्राह्मणांनी बुद्धिबळाच्या जोरावरच आजवर श्रेष्ठत्व संपादिलेले आहे. हिंदुत्वाच्या उत्थानासाठी जातीभेद नष्ट व्हावेत विशेषत: अस्पृश्यता कमी व्हावी हा विचार सांगून तसेच अनुवांशिक तत्त्वावर आधारलेल्या वर्ण व वंश श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त मांडणाऱ्या सावरकरांवर त्या काळात युरोपात वंशवादाचे जे तत्त्वज्ञान उदयाला आले होते व त्यास नकली विज्ञानाचा जो आधार दिला जाई त्याचा प्रभाव पडला होता असे दिसते. सावरकरांना ब्राह्मणांचा विशेषत: कोकणस्थांचा पाठिंबा त्या काळात का मिळाला असावा याचे उत्तर आपल्याला त्यांच्या भूमिकेचे परीक्षण केल्यावर मिळते.

## आचार्य जावडेकर

सावरकरांच्या हिंदुत्वाचा प्रतिवाद करणाऱ्यांमध्ये आघाडीवर होते आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर (१८९४-१९५५) गांधीवाद व समाजवादाचा संयोग करून सत्याग्रही समाजवादाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या जावडेकरांना जातीभेदाचा प्रश्न तितका महत्त्वाचा वाटला नाही. एकूणच गांधीवाद व समाजवादात जातीसंस्थेचा मूलभूत विचार झालेला नाही. तसा जावडेकरांनीही केला नाही. पण त्या काळात १९२०च्या आसपास ब्राह्मणेतर चळवळ व आंबेडकरांची चळवळ सुरू झाली होती व तिने चांगला जोर धरला होता. या चळवळीतून जातीभेदाचे प्रश्न उपस्थित होत होते. पण त्याची दखल आचार्यांनी घेतलेली दिसत नाही. जातीच्या प्रश्नाची चर्चा त्यांच्या दोन तीन लेखात येते. ब्राह्मणांचे वर्चस्व फक्त धार्मिक बाबतीत राहिले आहे व भौतिक प्रगती साधण्यात इतर जातींना ब्राह्मणांची आडकाठी राहणार नाही असे एका लेखात (१९२४) त्यांनी म्हटले होते तर १९४८ साली लिहिलेल्या लेखात ब्राह्मण्य व ब्राह्मण यावर टीका केली होती. 'आधुनिक भारत' या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथात फुले, ब्राह्मणेतर चळवळ किंवा डॉ. आंबेडकरांचे मूल्यमापन आलेले नाही.

## शिंदे व आंबेडकर

विठ्ठल रामजी शिंदे यांनी मात्र जातीसंस्थेची दखलच घेतली असे नव्हे तर या संस्थेचा व प्रामुख्याने अस्पृश्यांच्या प्रश्नांचा समाजशास्त्रीय अभ्यास करून स्वत:चे म्हणणे जोरकसपणे पुढे मांडले तेव्हा आर्य संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची चर्चा चालू होती.

तेव्हा शिंदे यांनी सांगितले की आर्यपूर्व संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती प्राचीन आहे ती वेदाहून फारच प्राचीन आहे. आर्यांच्या संस्कृतीचा उगम वेदात सापडत असेल परंतु, त्यापूर्वी बरेच मानववंश येथे राहत होते. त्याला आर्य संस्कृतीची एक लहानशी नदी येऊन मिळाली. आर्यपूर्व संस्कृतीची छाप भारतीय संस्कृतीवर पडली आहे. अस्पृश्यता तसेच जातीसंस्था आर्यपूर्व असावी असे त्यांना वाटत होते. आजचे अस्पृश्य हे एके काळचे राजे होते. जेत्यांनी पराभव केल्यामुळे त्यांना अस्पृश्यता पत्करावी लागली. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाने प्रभावित झालेल्या व ब्राह्मणी अहंकाराने पछाडलेल्या इतिहासकार वि. का. राजवाडेंशी त्यांनी वाद घालून स्वत:चे म्हणणे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६) यांनी महात्मा फुले यांच्या कार्यातून स्फूर्ती घेतली होती. स्वत: अस्पृश्य जातीत जन्मलेले असल्यामुळे त्यांना त्याची झळ सहन करावी लागली होती. भारतीय इतिहासाचा अभ्यास, अर्थशास्त्र व समाजशास्त्राचे उत्तम ज्ञान व स्वत:च्या समाजाबद्दल वाटणारी कळकळ यातून आंबेडकरांचा जातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार झाला होता. उच्चवर्णीय विचारवंतांपेक्षा जातीसंस्थेचे वेगळे स्पष्टीकरण आंबेडकर देतात. जगातील इतर समाजाप्रमाणे हिंदुस्थानातील समाजातही वर्ग निर्माण झाले. त्या काळात त्यात ब्राह्मण (पुरोहित), क्षत्रिय (सैनिक), वैश्य (व्यापारी) व शूद्र (शेतकरी, मजूर) एवढे वर्ग होते. सुरुवातीस ते परिवर्तनीय होते. परंतु इतिहासक्रमात पुढे कधीतरी पुरोहित वर्गाने इतर जनतेपासून वेगळे तोडून घेतले आणि आपल्या वर्गात इतरांना प्रवेश नाकारला. स्वत:च्या वर्गाचे अशातऱ्हेने जातीत रूपान्तर केले. पुढे श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार बाकीच्या समाजाचीही विभागणी झाली. वर्गपद्धतीतील मुक्त प्रवेशपद्धती बंद करण्यात आली. त्यामुळे वर्ग बंदिस्त झाले व जाती उदयास आल्या. असा त्यांचा सिद्धान्त थोडक्यात सांगता येतो.

## जातविषयक प्रबोधनाच्या मर्यादा

आपल्या समाजाचा पाया असलेल्या जातीसंस्थेबाबत प्रबोधन काळात कोणते चिंतन झाले याचा हा आढावा घेतल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, व्यक्तीची प्रतिष्ठा व सामाजिक समता या वैश्विक तत्त्वांच्या आधारे आपल्या समाजाची रचना तपासल्यानंतर जातीसंस्था या तत्त्वाविरुद्ध जाते हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी जातीसंस्थेस कसे नष्ट करता येईल याचा विचार केला. पण त्यांचा हा प्रबोधनाचा विचार व त्यावर आधारलेले कार्य यास छेद देणारे विचारप्रवाह व कार्य त्याच कालखंडात प्रबोधनाच्या पोटात निर्माण झाले व त्यामुळे प्रबोधनास अटकाव झाला. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाने उच्चवर्णीय पुढारी इतके प्रभावित झाले होते की, त्यांना एकतर जातीसंस्थेतील विषमता व अन्याय कळला नाही किंवा त्यांनी स्वत:च्या वर्गाच्या हिताची भूमिका घेऊन या विषमतेचे मखलाशी करून समर्थन केले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात जातीसंस्थेने नव्या परिस्थितीशी जुळवून घेऊन विषमता व अन्याय या आपल्या प्रमुख वैशिष्ट्यांना जपले. भांडवलशाही अर्थकारणातील अंगभूत विषमतेची आणि जातीसंस्थेची मोट जुळली.

## निवडक संदर्भ सूची


*संपूर्ण आगरकर*, खंड १ व २, (पुणे १९९४)
सुहास पळशीकर (संपा.) *सत्याग्रही समाजवाद : आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह* , (मुंबई, १९९४)
गोवर्धन पारीख व इंदुमती पारीख (संपा.), *लोकहितवादी समग्र वाङ्मय*, खंड १, (मुंबई, १९८८)
य. दि. फडके, *विसाव्या शतकातील महाराष्ट्र*, खंड पहिला, (पुणे, १९८९)
य. दि. फडके, (संपा.) *तत्त्वज्ञ सावरकर*, (पुणे, १९८६)
य. दि. फडके, (संपा.) *महात्मा फुले समग्र वाङ्मय*, (मुंबई, १९९५)
श्री. ना. बनहट्टी (संपा.), *विष्णुपदी*, तृतीय खंड, (पुणे, १९७४)
दि. के. बेडेकर, *धर्मचिंतन*, (पुणे, १९७७)
मंगुडकर मा.प. (संपा.), *शिंदे लेखसंग्रह*, (पुणे, १९६३)
रमाबाई रानडे (संपा.), *न्या.मू. रानडे यांची धर्मपर व्याख्याने*, (पुणे, १९०२)
Rosalind O'Hanloh, *Caste Conflict and Ideology* (Bombay, 1985)
Richard Tucker, *Ranade and the Roots of Indian Nationalism*, (Bombay, 1977)
राजेंद्र व्होरा, *'एकोणिसाव्या शतकातील वैचारिक साहित्य'*, *श्रीवाणी*, खंड १, अंक २, १९९३, पाने - ३२-४३
राजेंद्र व्होरा, *'न्या. रानडे यांचा उदारमतवादी विचार'*, *परामर्ष*, खंड ४, अंक ३, नोव्हेंबर १९८२.
राम शेवाळकर (संपा.) *लोकमान्य टिळकांचे निबंध*, (दिल्ली १९९६)
*समग्र सावरकर वाङ्मय*, खंड ३ रा, (पुणे १९६४)
यशवंत सुमंत व दत्तात्रय पुंडे (संपा.), *महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार*, (पुणे, १९८८)



# वासुदेवराव चित्रे / मधू पाटील, उमाकांत कामत

'निरिड' ही सर्वांगीण ग्रामीण विकासासाठी प्रत्यक्ष काम करणारी एक स्वयंसेवी संस्था आहे. 'National Institute of Rural Inteqrated Development' असे तिचे संपूर्ण नाव आहे. त्या नावातील आद्याक्षरांनी बनलेल्या 'निरिड' या संक्षिप्त नावाने ती ओळखली जाते.

तिचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्ह्यातील जंगलखोऱ्याच्या ओसाड परिसरात वसलेल्या ग्रामीण आदिवासी खेड्यांमध्ये आहे. या संस्थेचे हे प्रत्यक्ष विकासाचे कार्य गेली १५ वर्षे चालू आहे.

या स्वयंसेवी संस्थेचे विश्वस्त म्हणून पाच मान्यवर व्यक्ती असल्या तरी या संस्थेला ग्रामीण विकासाची नवी दृष्टी देणारे आणि प्रत्यक्ष ग्रामीण विकास कार्यात पूर्णपणे सहभागी असलेले प्रा. वासुदेवराव चित्रे ही या संस्थेची प्रेरकशक्ती आहे. कोसबाड येथील सर्वपरिचित अशा ग्रामीण शेतकी संस्थेत त्यांनी केलेले संशोधन, त्याच संस्थेत आणि मुंबई विद्यापीठात ग्रामीण विकास हा विषय सुरू करून त्यांनी पालघर महाविद्यालयात केलेले अध्यापन हा 'निरिड'मधील सध्याच्या सर्व प्रकारच्या उपक्रमांचा पाया आहे. ग्रामीण विकास विषयक त्यांच्याच दृष्टिकोनाने प्रेरित होऊन त्यांचे पाच विद्यार्थी आपल्या जीवन साथीदारिणींसहित प्रा. चित्रे यांच्याबरोबर आपले जीवितकार्य म्हणून संपूर्णपणे सहभागी झाले आहेत.



'निरिड' या संस्थेचा ग्रामीण विकासाचा दृष्टिकोन विकासाच्या पारंपरिक कल्पनांपेक्षा वेगळा आहे. रस्ते, वीज, शहरी अभ्यासक्रमाच्या शाळा यासारख्या गोष्टी ग्रामीण भागात पोचल्यावर ग्रामीण भागाचा आपोआप विकास घडून येतो ही गृहिते आता प्रत्यक्षात चुकीची ठरत आहेत. वरील प्रकारच्या गोष्टी ग्रामीण भागात जाऊनही तेथील माणूस मात्र होता तेथेच—त्याच परिस्थितीत राहतो आहे हेच दृश्य दिसते. हे लक्षात घेऊन 'निरिड'ने ग्रामीण विकासाचा वेगळा दृष्टिकोन घेण्याचे ठरविले. ग्रामीण माणसाचा विकास म्हणजे प्रामुख्याने त्याचे दारिद्र्य दूर करणे. त्यासाठी त्याच्याच परिसरात असलेल्या साधनांचा आधार घ्यावा लागेल; आणि या सहज उपलब्ध असणाऱ्या निसर्गनिर्मित साधनांचा वैज्ञानिक पण व्यवहार्य आणि परिचित पद्धतीने वापर करून येथील ग्रामीण माणूस संपत्ती निर्माण करील आणि त्याचे दारिद्र्य दूर करील अशा प्रकारची विकास-नीती प्रत्यक्षात आणण्याचे 'निरिड'ने निश्चित केले.

अशा या निश्चित केलेल्या ग्रामीण विकास-नीतीच्या आधारे गेली १५ वर्षे क्रमाक्रमाने 'निरिड' ही संस्था चार प्रमुख क्षेत्रात काम करीत आहे.

(१) माणसांची आणि परिसराची श्रीमंती वाढविणारे सामाजिक वनीकरण

(२) अर्धपोटी माणसांना अन्न आणि आरोग्य देणारी परसबागांची चळवळ

(३) डोंगर उतारावरून सरळ समुद्राकडे जाणारा पाणलोट थांबविणारा पाणलोट क्षेत्र विकासाचा प्रकल्प

(४) पारंपरिक शहरी पुस्तकी अभ्यासक्रमापेक्षा वेगळे ठरणारे ग्रामीण माणसाच्या विकासाला पोषक ठरणारे अनौपचारिक आणि औपचारिक शिक्षण

आणि या चारही क्षेत्रात काम करीत असताना घरातील स्त्रियांचा वैशिष्ट्यपूर्ण सहभाग राहील असा 'निरिड'च्या ग्रामीण विकास-नीतीचा अधोरेखित दृष्टिकोन आहे.

'निरिड'चे या चार क्षेत्रातील गेल्या १५ वर्षातले काम लक्षात घेतले तर ग्रामीण विकासाची दिशा कोणत्या स्वरूपाची असली पाहिजे याची निश्चिती होऊन जाते. याबाबत ते एक दिशादर्शक मॉडेल ठरावे एवढे ते महत्त्वपूर्ण वाटत राहते.

१. 'सामाजिक वनीकरण' या अभिनव उपक्रमाने 'निरिड'ने आपल्या ग्रामीण विकास कामाला सुरुवात केली.

आदिवासींच्या जंगलखोऱ्याच्या परिसरातील बरेच महत्त्वाचे उत्पन्न देऊ शकेल असे निसर्गदत्त साधन म्हणजे झाड. आदिवासी आणि झाड यांचे अतूट नाते लक्षात घेऊनच 'निरिड'ने पहिला उपक्रम सामाजिक वनीकरणाचा घेतला. वैयक्तिक लाभ तावडतोब लक्षात यावा म्हणून त्याला वैयक्तिक वनीकरणाची जोड दिली.

आदिवासी आणि त्याच्या भोवतालच्या जंगलातील झाड यांचे नाते अतूट असले तरी हे झाड त्याच्या उपजीविकेचे आणि संपत्तीचे महत्त्वपूर्ण साधन बनू शकते यावर त्याचा प्रथम विश्वास बसत नव्हता. पण 'निरिड'ने कुकडा पाडा या आदिवासी गावातील एका ओसाड टेकडीवरील दोन एकर जमिनीवर एकदम १५०० झाडे लावली आणि दोन-तीन वर्षातच ती ओसाड टेकडी उंच उंच बळकट हिरव्यागार झाडांनी भरून गेली. या पहिल्याच लक्षणीय प्रात्यक्षिकाने तेथील आदिवासीचे कुतूहल जागृत झाले.

आणि या योजनेतील कितीतरी मोठा आर्थिक लाभ त्याच्या लक्षात आणून दिल्यावर हा आदिवासी उत्स्फूर्तपणे या मोहिमेत सहभागी झाला. 'झाडावर पैसे लागतात' हा मंत्र 'निरिड'ने त्यांच्या घराघरात पोहोचविला. वर्षाकाठी एकराला २०० ते ३०० रुपये देणारी गवताळ जमीन जर झाडाखाली आणली तर पाच वर्षांनी प्रतिसाल ५,०००/- रुपये देत राहते हे त्यांना प्रात्यक्षिकासह पटवून दिले. त्यामुळे आता वनीकरणासाठी गावोगावीच्या आदिवासीला उद्युक्त करावयास फारसे प्रयास पडत नाहीत.



तो स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येने या मोहिमेत सामील होत आहे हे पाहिल्यावर वृक्ष लागवडीसाठी जोमदार आणि निरोगी रोपांची गरज निर्माण झाली. त्यासाठी 'निरिड'ने दोन एकर जमिनीवर एका रोपवाटिकेचे प्रात्यक्षिक उभे केले आणि या योजनेत सहभागी होणाऱ्या आदिवासींना निरोगी आणि जोमदार रोपे उपलब्ध करून दिली.

या वनीकरण मोहिमेचे यश संख्येच्या भाषेत सांगावयाचे झाले तर कुकडा पाडा भोवतालच्या तीन-चार तालुक्यातील ४० गावांमध्ये प्रतिवर्षी अडीच लाख रोपे लावली जातात. आजवर अशी सुमारे ३० लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यातील सुमारे ७५ टक्के वृक्ष जगून वाढत आहेत. दोन हजार आदिवासी कुटुंबे यात सहभागी झाली आहेत.

वैयक्तिक आणि सामाजिक-सामूहिक वनीकरण या मोहिमेला एवढा प्रतिसाद मिळाल्याने धुकटन या गावी पाच एकर जमिनीवर 'निरिड'ने आणखी एक रोपवाटिका तयार केली. तेथे संशोधन प्रशिक्षण केंद्रही चालते. तेथे कलमे बांधणे, डोळे भरणे अशी कौशल्याची कामे शिकविली जातात. या कौशल्याच्या कामात स्त्रियांचा सहभाग मोठा असतो. स्वतःच्याच आवारात रोपे आणि कलमे तयार करून हा आदिवासी आणखी एका आर्थिक स्तरावर स्वावलंबी बनू शकला आहे.

२. परसबागांची चळवळ वरील योजनेला जोडूनच आली आणि आदिवासींनी त्याच उत्साहाने ती स्वीकारली.

भूक आणि कुपोषण या आदिवासींच्या मूलभूत समस्यांवर एक सुलभ व्यावहारिक उपाय म्हणून 'निरिड'ने विशेषतः आदिवासी स्त्रियांसाठी ही परसबागेची कल्पना त्यांच्या घराघरांतून प्रत्यक्षात आणली.

पावसाळ्यात आदिवासींच्या वाट्याला अधिक उपासमार येते आणि रोगराईने हैराण होऊन अनेकजण मृत्युमुखी पडतात. यातून बहुतांशी सुटका व्हावी म्हणून आपल्या झोपडीजवळच्या एक-दोन गुंठा जागेत घरच्या स्त्रियांनी विविध प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, कंद, शेंगा लावून त्यांचा खाण्यासाठी उपयोग करावा ही साधीसुधी योजना. पण या सर्व भाजीपाल्यांचे शास्त्रीय वर्गीकरण करून त्यातील शरीराला सर्व पोषक घटक मिळतील असे प्रमाणित स्वरूप समजावून देऊन ते प्रत्यक्षात येईल हे पाहिले.

या योजनेमुळे त्यांची कुपोषणाची समस्या सौम्य झाली. आजारांचे प्रमाण कमी झाले. काही कुटुंबांना जादा उत्पादन करून पैसे मिळविता आले आणि सर्वांनाच विकासाची स्वावलंबी दृष्टी मिळाली.

४० खेड्यातील सुमारे ४००० कुटुंबातील उत्साहपूर्ण सहभागामुळे या योजनेला आता या भागात चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

३. पाणलोट क्षेत्र विकासाचा प्रकल्प हा कोकणातील डोंगराळ जमीन आणि धो धो कोसळणाऱ्या पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन 'निरिड'ने कार्यवाहीत आणलेला प्रकल्प. हा सर्वच कोकण विभागाला नमुना ठरेल असा आहे.

इंडो-जर्मन सहकार्याने पाणलोट क्षेत्र विकासाचा विज्ञानावर आधारलेला नवा विचार आदिवासींपर्यंत पोहचवून तो प्रत्यक्षात आणण्याचे कार्य 'निरिड'ने तीन वर्षापूर्वी हाती घेतले. त्यासाठी जव्हार तालुक्यातील तळावली हे १७८ कुटुंबांचे गाव निवडून तेथे या कामासाठी ग्रामसमिती तयार करण्यात आली. तेथील टेकड्यांवर कोसळणारे सुमारे ८० इंच पावसाचे एरव्ही वाहून जाणारे पाणी टेकड्यांच्या उतारांवर एका मागोमाग समांतर चर खणून अडवून जमिनीत जिरवून काही ठिकाणी बंधारे घालून भोवतालची जमीन लागवडीस आणणारा हा प्रकल्प. सर्वत्र पाझरत राहिलेल्या पाण्याच्या ओलाव्यामुळे रब्बी हंगामात सुमारे २०० एकर जमीन या प्रकल्पामुळे लागवडीखाली आली आहे. मृद्संधारण, जलसंचय त्यातून शेतीविकास, वनविकास, शिक्षणविकास, रोजगार निर्मिती अशा विविध स्तरांवर या प्रकल्पामुळे लाभ होत आहे.

या प्रकल्पामुळे गावकऱ्यांना गावातच मजुरी आणि काम मिळाले, प्राप्ती वाढली. मोलमजुरीसाठी वणवण करीत अन्यत्र होणारे स्थलांतर थांबले. जीवनाला स्थैर्य लाभले. घराघरातून शाळेला जाणाऱ्या मुलांची उपस्थिती तिपटीने वाढली.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ४८ लाख रुपयांच्या या योजनेपैकी ३०-३२ लाखांचा खर्च हाताळण्याची संधी 'निरिड'ने ग्रामसमितीमार्फत गावकऱ्यांना दिली. त्यामुळे त्यांना स्वत:च्या विकासाच्या योजनांची आखणी आणि कार्यवाही यांचे मौल्यवान शिक्षण मिळाले.

५. अनौपचारिक शिक्षण हा 'निरिड'चा गाभा आहे. तरीपण औपचारिक शिक्षण हे 'निरिड'ने पूर्णत: नाकारलेले नाही. त्या दोहोंचा समन्वय हीच संयुक्तिक शैक्षणिक दृष्टी 'निरिड'ने स्वीकारली आहे.

अनौपचारिक शिक्षणामध्ये आदिवासी स्त्री आणि पुरुष या दोहोंनाही 'निरिड'ने सहजतेने सामावून घेतले आहे. रोपवाटिका वाढविण्याचे तंत्र असो, बोरींना बिडिंग करण्याचे कौशल्य असो, वा ग्रामसमित्यांचे काम असो, 'निरिड'ने दोहोंनाही या शिक्षणामध्ये सामील करून घेतले आहे. आणि या अनौपचारिक शिक्षणात दोहोंचाही सहभाग असल्यामुळेच सर्व प्रकारची ही ग्रामीण विकासाची कामे प्रत्यक्षात आकाराला येत आहेत.

धुकटन येथे 'निरिड'चे संशोधन प्रशिक्षण चालते. त्याचा शैक्षणिक दर्जा लक्षात घेऊनच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने या शिक्षणकेंद्राला मान्यता दिली. आणि आता येथे त्या विद्यापीठाच्या बी.एस्सी. (शेती) पदवी परीक्षेचे औपचारिक शिक्षणही सुरू झाले आहे तरीही येथील अध्यापनात अनौपचारिक शिक्षण हा गाभा सांभाळला जातोच. ७६ विद्यार्थी-विद्यार्थिनी या शिक्षण केंद्रात सध्या सदर पदवी परीक्षेचा अभ्यास करीत आहेत.

प्रा. वासुदेवराव चित्रे यांचा ग्रामीण विकास विषयक वेगळा दृष्टिकोन स्वीकारून त्यांच्याच नेतृत्वाखाली 'निरिड'ने या

क्षेत्रात जे कार्य केले, त्याची गौरवपूर्ण नोंद यापूर्वी दोन पुरस्कारांनी झालेली आहे. पहिला वसंतराव नाईक ॲग्रिकल्चर रिसर्च अँड रुरल डेव्हलपमेंट फाउण्डेशनचा राज्यपातळीवरचा पुरस्कार, दुसरा नॅशनल वेस्टलँड डेव्हलपमेंट बोर्डाचा 'प्रियदर्शिनी वृक्षमित्र' हा राष्ट्रीय पातळीवरचा पुरस्कार.

आणि आता 'निरिड'ची आणखी गौरवशाली नोंद होत आहे तो आंतरराष्ट्रीय स्तराचा स्पर्श असलेल्या संस्थेकडून.

समाजाभिमुख प्रगतीशील दृष्टिकोन असलेल्या, आदिवासी आदी नाहीरेंच्या विकासाबद्दल सजग असलेल्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चा हा पुरस्कार प्रा. वासुदेवराव चित्रे यांच्या 'निरिड'च्या ग्रामीण विकास कार्याची गौरवपूर्ण नोंद आवर्जून घेत आहे.



# रा. वि. भुस्कुटे / दयानंद प्रभू

आज महाराष्ट्रात ज्या स्वयंसेवी संस्था जमीन, शेतमजूर, रोजगार हमी योजना इत्यादी ग्रामीण प्रश्नासंबंधी काम करीत आहेत, त्यांना श्री. रा. वि. भुस्कुटे यांचे नाव सुपरिचित आहे. त्यातील कित्येक संस्थांचे तर ते आधारस्थान आहेत. ग्रामीण प्रश्नांचा आणि त्यातही जमीन विषयाचा सखोल अभ्यास व क्रियाशील वृत्ती ही त्यांची खास वैशिष्ट्ये आणि म्हणून आपल्या समस्यांबाबत 'भुस्कुटेभाऊ' आपल्याला परिपूर्ण मार्गदर्शन करतील व प्रसंगी आपल्याबरोबर लढ्यात सहभागी होतील असा त्यांचा सार्थ विश्वास आहे.

सामाजिक कार्याचा व लढाऊ वृत्तीचा वारसा त्यांना त्यांचे वडील कॉ. विनायकराव भुस्कुटे यांच्याकडून मिळाला. विनायकराव कम्युनिस्ट पक्षाचे निष्ठावंत पूर्णवेळ कार्यकर्ते. त्यांच्या समर्पित जीवनाचा धाकट्या रामवर खोल ठसा उमटला. अन्याय सहन करायचा नाही, अत्याचाराविरुद्ध आवाज उठवायचा व समाजाच्या तळातील माणसासाठी लढायचे हे संस्कार लहानपणीच पक्के झाले आणि म्हणून विद्यार्थीदशेत कम्युनिस्ट पक्षाची छोटी मोठी कामे करताना त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला व शिक्षा भोगली. बिकट अशा संसारिक अडचणीतून मेटाकुटीने वाट काढत व परिस्थितीचे टक्केटोणपे खात माध्यमिक शिक्षण पुरे केले आणि नोकरी करत असताना ते एम. ए. झाले.




महसूलखात्यात नोकरी करताना एक नि:स्पृह, कर्तबगार व लोकाभिमुख अधिकारी असा नावलौकिक त्यांनी संपादन केला. आपल्या समाजरचनेत दलित, आदिवासी इत्यादी उपेक्षित घटक अन्याय व जुलूम यांखाली सतत भरडले जात आहेत याची सदैव जाणीव ठेवून त्यांनी काम केले. शेवटपर्यंत ते कष्टकरी जनतेच्या बाजूने राहिले. जनहिताच्या त्यांच्या कार्याचा कळस चढला वसई येथे ते तहसीलदार असताना. श्रमजीवी संघटनेने वसई तालुक्यात वेठबिगारी विरुद्ध लढा नुकताच सुरू केला होता. या लढ्याला श्री. भुस्कुटे यांनी सर्वतोपरी हातभार लावला. 'महाराष्ट्रात औषधालासुद्धा वेठबिगार नाहीत' अशी तेव्हा शासनाची ठाम भूमिका होती. वरिष्ठांचा विरोध व धनदांडग्यांकडून नाना मार्गांनी येणारा दबाव यांना न जुमानता कण्हेर गावातील १२ वेठबिगार तहसीलदार या नात्याने त्यांनी मुक्त केले. या घटनेने ग्रामीण प्रस्थापितांना जबरदस्त धक्का बसला व वेठबिगार मुक्तीच्या चळवळीला जोरदार चालना मिळाली. या प्रकरणी वरिष्ठांकडून त्रास होणे अपरिहार्य होते. सामाजिक न्यायाबद्दलच्या त्यांच्या या कारवाईबद्दल पारितोषिकाऐवजी त्यांना समज देण्यात आली आणि प्रांत म्हणून मिळणारी बढती हेतुपुरस्सर रोखण्यात आली. आपल्या स्वभाववृत्तीला धरून त्यांनी हे सर्व शांतपणे स्वीकारले.

१९८३मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर श्रमजीवी संघटनेच्या वसई तालुक्यातील ग्रामीण पुनर्रचनेच्या कामात सहभागी होण्याचा श्री. भुस्कुटे यांनी निर्णय घेतला व तेव्हापासून त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या पर्वाची सुरुवात झाली. ध्येयवादी वृत्ती, कामाची शिस्त, कायद्यांचा अभ्यास, चळवळींचा अनुभव, लढाऊ बाणा आणि अधिकार उपभोगूनही कायम राहिलेली फकिरी वृत्ती यांचा सुरेख संगम व सरमिसळ होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व तयार झाले होते. ज्येष्ठत्वाचा आनंद उपभोगित विश्रांती घेण्याऐवजी ते आता चळवळीच्या रणांगणात उतरले.

श्रमजीवी संघटनेबरोबर वेठबिगार मुक्ती व पुनर्वसन, शेतमजुरांचे किमान वेतन, वीटभट्टी मजूर व स्थलांतरित मजुरांचे संघटन, स्थानिक अत्याचाराविरुद्ध लढा या सर्व कामात ते पूर्णार्थाने सहभागी झाले. वज्रेश्वरी येथील सिद्धपीठ आश्रमाविरुद्ध संघटनेने उभारलेल्या किमान वेतनाच्या लढ्यात त्यांना पोलिसांचा लाठीमार खावा लागला. तसेच १५ ऑगस्ट १९८४ रोजी बंदी हुकूम मोडून आदिवासी बांधवांबरोबर स्वातंत्र्यदिन साजरा केल्याबद्दल या स्वातंत्र्यसैनिकाला संघटनेच्या कार्यकर्त्यांबरोबर तुरुंगवास भोगावा लागला. आजही वयाच्या ७२व्या वर्षी जनजागृतीसाठी गावोगाव फिरणे,

वेळप्रसंगी उपासमार सहन करणे, पोलिसांचा मार खाणे, तुरुंगवास भोगणे, निकडीच्या प्रश्नांसाठी बेमुदत उपोषण करणे, प्रस्थापितांचे हल्ले सहन करणे हे सर्व अनुभव त्यांना नित्याचे आहेत.

संघर्षाच्या कार्याबरोबर एक महत्त्वाची जबाबदारी त्यांनी उचलली. ती म्हणजे संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची. कायद्याचे शिक्षण, तसेच जमीनविषयक सर्व कायदे व कागदपत्रे यांचे संपूर्ण ज्ञान आदिवासी कार्यकर्त्यांपर्यंत सोप्या पद्धतीने पोचविण्याचे काम त्यांनी सुरू केले. त्याची शिबिरे गेले एक दशक चालू आहेत. परिणामी आज असे कित्येक आदिवासी कार्यकर्ते आहेत की जे जमिनीचे कागदपत्र अभ्यासून स्थानिक शेतकऱ्यांचे प्रश्न स्वत: सोडवितात किंवा संघटनेमार्फत त्यावर योग्य कृती करतात. ग्रामीण भागात विकासात्मक, शैक्षणिक व जागृतीचे काम करणाऱ्या 'विधायक संसदे'चे ते सक्रिय विश्वस्त आहे. शिवाय महाराष्ट्रातील अनेक संघटनांशी ते जोडलेले आहेत. महाराष्ट्रभर वेगवेगळ्या ठिकाणी चर्चासत्रे व शिबिरे यांच्या माध्यमातून कार्यकर्ते उभे करण्याच्या कामी त्यांचे विशेष योगदान आहे. जमीनविषयक कोणताही प्रश्न निघाला की रा. वि. भुस्कुटे यांचेच नाव प्रामुख्याने पुढे येते. या क्षेत्रात अल्पभूधारक व शेतमजूर यांच्या हिताची जपणूक करणारा त्यांच्या तोडीचा तज्ज्ञ माणूस आज तरी दिसत नाही. महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्वकाळी गुन्हेगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातींना काही विशिष्ट जमिनीवर बंदिस्त करण्यात येत असे. त्या जमिनीवर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी अशा जमिनींची आज नेमकी काय स्थिती आहे हे पडताळून पाहणे आवश्यक होते. यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने जी समिती नेमली त्यात श्री. भुस्कुटे यांचा समावेश होता. या समितीच्या अभ्यासपूर्ण अहवालाचे श्रेय श्री. भुस्कुटे यांना बव्हंशी द्यावे लागेल.



लोकजागृतीसाठी लेखन हे एक प्रमुख साधन आहे हे ओळखून श्री. भुस्कुटे यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या नावावर असंख्य लेख, १३ पुस्तके व छोट्या, मोठ्या पुस्तिका आहेत. "हक्कनोंद" हे जमीन विषयावरील त्यांचे पुस्तक महसूल खात्याच्या दृष्टीने क्रमिक व संदर्भ पुस्तक मानले जाते. ग्रामीण कार्यकर्त्यांसाठी अगदी सोप्या भाषेत प्रश्नोत्तररूपाने लिहिलेल्या त्यांच्या जमीनविषयक दोन पुस्तिका म्हणजे लोकशिक्षणातील एक अभिनव प्रयोग आहे. निव्वळ जमीन याच विषयाभोवती त्यांचे लिखाण मर्यादित नाही. स्थानिक स्वराज्य संस्था, जंगल कायदा, पुनर्वसनाचे प्रश्न, नवे विकास प्रकल्प, काश्मीरचा प्रश्न इत्यादी विविध विषयांवर ते सातत्याने लिहीत आले आहेत. Economic and Political Weekly या प्रतिष्ठा पावलेल्या साप्ताहिकात त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. इतर राज्यातील जमीन व शेतमजूर यांच्या प्रश्नांचा त्यांनी अभ्यास केला असून, देशातील विविध ठिकाणी या विषयांवर होणाऱ्या चर्चासत्रात विषयतज्ज्ञ म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांचा लेखनाचा व एकूण कामाचा झपाटा तरुणांनाही लाजवणारा आहे.

गेल्या वर्षापासून 'श्रमजीवी संघटने'चे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या जबाबदारीत आणखी भर पडली आहे. तरीही ते रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमधील बेदखल कुळांच्या प्रश्नावर पुढाकार घेऊन काम करीत आहेत. रायगडमध्ये दळी जमिनी व अतिरिक्त जमिनीच्या प्रश्नावरील आंदोलनात सक्रिय सहभागी आहेत. ठाणे जिल्ह्यातील विकासाच्या व्याख्येस आव्हान देत आहेत. नाशिक जिल्ह्यात देवस्थान इनाम जमिनी व आदिवासींच्या प्रश्नांवर कार्यकर्त्यांना तयार करणे चालू आहे. मराठवाड्यात गायरानाच्या प्रश्नावर लढा उभारणी सुरूच आहे. महाराष्ट्रभरातल्या शेतमजुरांच्या संघटनांच्या आघाडीचे ते निमंत्रक आहेत. 'शोषित जन आंदोलन' ही प्रामुख्याने आदिवासी, दलित व इतर उपेक्षित यांच्या जमीनविषयक प्रश्नांबाबत काम करणाऱ्या संघटनांनी आघाडी एक दशकाहूनही अधिक काळ ते तिच्याशी संलग्न आहेत. काही वर्षे ते तिचे निमंत्रक होते. शोषित जन आंदोलनाच्या कार्यास वैशिष्ट्यपूर्ण दिशा देण्याचा आटोकाट प्रयत्न ते करीत आले आहेत. त्यांच्या कामाचा आवाका अचंबा वाटावा असा आहे. संघटित जनशक्तीद्वारे सामाजिक विषमता व अन्याय यांचा पाडाव करणे हा या अखंड कार्यामागील प्रेरणेचा स्रोत आहे.

सामान्यत: कृतीशील वृत्ती व वैचारिक जग यांचे विशेष सख्य नसते. श्री. भुस्कुटे या नियमाला अपवाद आहेत. शब्द व शब्दाचा अर्थ एकमेकांपासून अलग करता येत नाहीत; तसेच अतूट नाते कृती व विचार यांचे आहे. विचाराशिवाय कृति आततायी ठरते, तर कृतीतून विचाराला अनेक परिमाणे प्राप्त होतात, अशी त्यांची धारणा आहे. या कारणास्तव त्यांच्या विचारात व कृतीत साचेबंदपणाला वाव नाही. सहिष्णुता हा त्यांचा स्थायीभाव आहे. प्रत्येक प्रश्नावर नव्याने व चौफेर विचार करण्यास ते सदैव तयार असतात. म्हणूनच जमीन सुधारणा कायद्याबद्दल स्वत: अट्टाहास धरूनसुद्धा "या कायद्याने नेमके काय आजवर साध्य झाले व पुढे काय साध्य होईल?" असा मूलगामी प्रश्न ते विचारू शकतात. पुढारीपणाच्या वृत्तीचा मागमूसही त्यांच्याकडे नाही. महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळींना आज अशा कृतिशील आणि विवेकी कार्यकर्त्यांची व नेतृत्वाची नितान्त गरज आहे.

# धर्म आणि विज्ञान / अल्बर्ट आइनस्टाइन

मानवजातीच्या हातून ज्या कृती व विचार घडून आलेले आहेत त्या सर्वांचा संबंध सदोदित खोलवर जाणवणाऱ्या मानवी गरजांचे समाधान करणे व वेदनांचे शमन करणे यांच्याशी निगडित राहिलेला आहे. पारमार्थिक चळवळी व त्यांची वाढ समजून घ्यायची असेल तर ही गोष्ट आपण सतत ध्यानात ठेवली पाहिजे. मानवाचे सर्व कष्ट व सर्जनशीलता यांच्यामागील मूलस्रोत हा मानवी भावना व इच्छा-आकांक्षामध्ये आहे, भले मग कितीही तरल व उच्च स्वरूपात ती सर्जनशीलता आपल्यापुढे प्रकट होवो.

व्यापक अर्थाने धार्मिक विचार व श्रद्धा यांच्याकडे माणसाला नेणाऱ्या या भावना व गरजा कोणत्या आहेत? थोडासा विचार केला तरी आपल्या लक्षात येईल की धार्मिक विचार व अनुभव यांचा उगम होण्यामागे विविध प्रकारच्या भावना व संवेदना कारणीभूत आहेत.

आदिमानवाच्या बाबतीत प्रामुख्याने भीतीची भावना धार्मिक कल्पना जागविण्यास कारणीभूत ठरलेली दिसते. भुकेची भीती, जंगली श्वापदांची भीती, आजारपणाची व मृत्युची भीती! मानवी समाजाच्या या टप्प्यावर कार्यकारण भावांची संकल्पना अतिशय मर्यादित असल्याने मानवी मनाने स्वत:शी कमी अधिक प्रमाणात मिळत्याजुळत्या काल्पनिक व्यक्तीसदृश्य शक्तींची निर्मिती केली. माणसाला भेडसावणाऱ्या सर्व घटना या काल्पनिक शक्तींच्या इच्छा व कृतींवर अवलंबून राहू लागल्या. मग साहजिकच या शक्तींना शांत ठेवण्यासाठी व आपल्याला अनुकूल करून घेण्यासाठी विशिष्ट विधी व क्रियाकर्मे करण्याच्या परंपरा आल्या.

येथे मी भीतीवर आधारित धर्माविषयी बोलत आहे. पुढे सर्वसामान्य लोक व त्यांना भीतीदायक वाटणाऱ्या या शक्ती यांच्या दरम्यान मध्यस्थी करण्याचा दावा करणाऱ्या खास पुरोहित वर्गाचा उदय झाला. भीतीवर आधारित धर्माची निर्मिती या वर्गाने केली नसली तरी या वर्गामुळेच हा धर्म स्थिरावण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झाली. मध्यस्थ म्हणून काम करण्याच्या दाव्यावर या वर्गाने समाजात आपले वर्चस्व स्थापन केले. कित्येक ठिकाणी अन्य कारणांमुळे सत्तेवर असलेल्या नेत्याने वा राजाने वा सत्ताधारी वर्गाने आपली सत्ता बळकट करण्यासाठी पुरोहितपणाचे कामही स्वत:कडे घेतल्याचे आढळते, तर काही ठिकाणी सत्ताधारी राज्यकर्ते व पुरोहितवर्ग यांनी स्वहितासाठी परस्परांशी संगनमत केल्याचे आढळते.

धर्माची निर्मिती होण्यामागचा दुसरा स्रोत म्हणजे सामाजिक गरजा. आई, वडील वा मोठ्या समाजगटांचे नेते हे मर्त्य व स्खलनशील असतात. त्यामुळे भरवशांचे मार्गदर्शन, प्रेम व आधार यांची गरज पूर्ण करण्यासाठी मानवाने सामाजिक वा नैतिक स्वरूपाच्या देवाची निर्मिती केली. हा देव संरक्षण देतो, चांगल्या कामाला बक्षिस तर वाईट कृत्याला सजा देतो. श्रद्धाळू माणसाच्या कमीअधिक व्यापक दृष्टिकोनानुसार हा देव एका मानवसमूहाच्या टोळीचे, वा संपूर्ण मानवजातीचे, वा कधीकधी सर्वच सजीव सृष्टीचे प्रेमाने संगोपन करतो, दु:खप्रसंगी वा अतृप्त इच्छांबाबत सांत्वन करतो. हा देव मृत आत्म्यांचे जतन करतो.

ही झाली देवाची सामाजिक वा नैतिक संकल्पना.

भीतीवर आधारित धर्मापासून नैतिक धर्मापर्यंतची ही वाढ यहुदी धर्मग्रंथांतून उत्तमप्रकारे स्पष्ट होते. पुढे ख्रिस्तधर्मियांच्या नव्या करारातही हे रुपांतर घडून येताना दिसते. सर्व सुसंस्कृत लोकांचे धर्म, विशेषत: पौर्वात्य धर्म, हे मुख्यत्वे अशा प्रकारचे नैतिक धर्म आहेत. भीती आधारित धर्मापासून नैतिक धर्माचा उदय होणे हे मानवजातीच्या प्रगतीतील फार मोठे पाऊल आहे. परंतु तरीही आदिमानवाचे धर्म पूर्णत: भीतीवर आधारित असतात व सुसंस्कृत समाजांचे धर्म शुद्ध नैतिक अधिष्ठानांवर उभे असतात असा गैरसमज मात्र आपण करून घेता कामा नये. सत्य गोष्ट अशी आहे की, सर्वच धर्म या दोन्ही प्रकारांच्या मिश्रणातून बनलेले आहेत. एवढेच की समाजजीवन जितके अधिक वरच्या पातळीवरचे तितक्या प्रमाणात नैतिक धर्माचा प्रभाव अधिक जाणवतो.

या सर्व प्रकारांमध्ये एक समान धागा आढळतो तो म्हणजे त्यातील देवाच्या संकल्पनेचे मानवसदृश्य स्वरूप!

सर्वसाधारणपणे फक्त असामान्य व्यक्ती व असामान्यरित्या उच्च विचार जोपासणारे समाजच अपवादात्मकरित्या या पातळीच्या वर जाऊ शकतात. परंतु धार्मिक अनुभवाचा आणखी एक तिसरा टप्पा आहे. हा सर्व धर्मात आढळतो, परंतु शुद्ध स्वरूपात क्वचितच दिसून येतो. याला मी वैश्विक धार्मिक जाणीव म्हणेन. ज्याला अशा प्रकारची जाणीव झालेली नाही त्याला तिचे स्वरूप समजावून सांगणे फार कठीण आहे, कारण मानवसदृश्य देवाची कसलीही संकल्पना या जाणिवेशी निगडित नाही.

मानवी इच्छाआकांक्षांची व्यर्थता व्यक्तीला जाणवते. त्याचबरोबर निसर्ग व वैचारिक जगत या दोहोंतून पवित्रता, भव्यदिव्यता व चमत्कारपूर्ण सुरचना यांचा त्याला साक्षात्कार होतो. वैयक्तिक अस्तित्व एक प्रकारच्या तुरुंगवासासारखे ज्याला भासू लागून संपूर्ण विश्वच एक महत्त्वपूर्ण एकात्म अभिव्यक्ती म्हणून जाणवून घेण्याची ओढ त्याला लागते. अगदी प्रारंभीच्या काळातही या वैश्विक धार्मिक जाणिवेची सुरुवात झाल्याचे आढळते - उदाहरणार्थ डेव्हिड व काही प्रेषितांचे श्लोक. शॉपेनटॉवरच्या लिखाणातून आपल्या लक्षात येते की, बौद्धधर्मात ही वैश्विक धार्मिक जाणीव अतिशय तीव्र प्रमाणात आहे.

सर्व कालखंडातील धार्मिक महापुरुष या प्रकारच्या जाणिवेने उजळलेले असे वेगळे उठून दिसतात. या जाणिवेमागे कोणताही धर्मग्रंथ व माणसाच्या प्रतिमेनुसार कल्पिलेला देव नसल्याने यावर आधारित चर्चसारख्या धर्मसंस्थेच्या अस्तित्वाला येथे जागा नाही. आणि यामुळेच प्रत्येक युगातील प्रस्थापित धर्मतत्त्वांच्या विरोधात गेलेल्या व्यक्तीच या उच्चतम धार्मिक जाणिवेने भारलेल्या आढळतात. अशा बहुतेक व्यक्तींना त्यांच्या समकालीनांनी धर्मविरोधी व निरीश्वरवादी मानल्याचे आढळते. कधीकधी मात्र काहींना संतही मानले गेले. यादृष्टीने पाहिले तर डेमॉक्रिटस, फ्रान्सिस ऑफ आसिसी व स्पिनोझा अशांसारखी माणसे एकमेकांशी खूपच साधर्म्य असणारी वाटतात.

आता प्रश्न असा येतो की देव आणि धर्मशास्त्रविषयक कोणतीही निश्चित ठाम कल्पना न मांडणारी ही वैश्विक धार्मिक जाणीव एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे कशाप्रकारे पोहचवली जाऊ शकेल? माझ्या मतानुसार ही जाणीव जागृत करणे आणि या जाणिवेचा स्पर्श झालेल्या व्यक्तींमध्ये ती सतत तेवती ठेवणे हे कला आणि विज्ञानाचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे.

येथे विज्ञान आणि धर्म यांच्यातील परस्पर संबंधाच्या नेहमीपेक्षा अतिशय वेगळ्या अशा नात्याची जाणीव होते. ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले तर विज्ञान व धर्म हे परस्परांचे कट्टर शत्रू असल्याची आपली भावना होते, आणि याची कारणेही उघड आहेत. कार्यकारणभावाचा नियम संपूर्ण विश्वाला निरपवादपणे लागू होतो अशी पक्की खात्री असलेली व्यक्ती घटनांच्या प्रवाहात ढवळाढवळ करणाऱ्या देवाची संकल्पना क्षणभराकरताही मान्य करणार नाही. अशा व्यक्तीला भीतीवर आधारित धर्म, इतकेच नव्हे तर सामाजिक व नैतिक धर्माचीही गरज भासत नाही. बक्षिस वा शिक्षा देणाऱ्या देवाची कल्पनाही अशी व्यक्ती करू शकत नाही; कारण माणसाची कृती, वागणूक ही बाह्य तसेच आंतरिक गरजांनुसार निश्चित होत असल्याने देवाच्या लेखी माणूस जबाबदार ठरूच शकत नाही, असे करणे म्हणजे एखाद्या निर्जिव वस्तूच्या हालचालींसाठी त्या वस्तूलाच जबाबदार धरल्यासारखे होईल.

या वस्तुस्थितीमुळे नैतिकतेचे खच्चीकरण केल्याचा आरोप विज्ञानावर केला जातो. पण असा आरोप करणे अन्यायाचे आहे. माणसाची नैतिक वागणूक ही सहानुभूती, शिक्षण व सामाजिक बंधने आणि गरजा यांवर आधारित असली पाहिजे. त्यासाठी कसल्याही धार्मिक पायाची गरज नाही. शिक्षेची भीती आणि मरणोत्तर बक्षिसाची आशा यांच्या जोरावर माणसांवर नियंत्रण ठेवण्याची गरज पडली तर ते माणसालाच कमीपणा आणणारे ठरेल.

धर्मसंस्थांनी नेहमीच विज्ञानाला विरोध केला व विज्ञान भक्तांचा छळ केला या मागची कारणे यातून सहजपणे उलगडून येतात. परंतु उलटपक्षी मी मात्र असे ठामपणे मानतो की वैज्ञानिक संशोधनामागची सर्वात प्रबळ व सर्वात उच्च दर्जाची प्रेरणा आहे ही वैश्विक धार्मिक जाणीवच!

शुद्ध तात्विक पातळीवरचे वैज्ञानिक संशोधन करण्यासाठी जे प्रचंड प्रयत्न, आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे जी समर्पणाची भावना लागते त्याची जाणीव असलेल्या लोकांनाच फक्त जीवनातील ताबडतोबीच्या दृश्य वास्तवापासून दूर

असलेले असे काम करण्यासाठी जरूर असलेल्या या भावनेची तीव्रता कळू शकेल. अवकाशातील ग्रहताऱ्यांच्या हालचालींमागची तत्त्वे उलगडून दाखविण्यासाठी केपलर व न्यूटन यांनी कित्येक वर्षे एकांडेपणाने प्रचंड कष्ट उपसले. सत्य समजून घेण्याची केवढी अनिवार ओढ आणि विश्वव्यवहार विशिष्ट नियमांनुसार चालत असणार याबाबतची केवढी प्रगाढ खात्री यामागे असणार हे आपण समजून घेतले पाहिजे.

संशयाने व संभ्रमाने वेढलेल्या या जगात अशा वृत्तीच्या व्यक्तींनी, जगभर पसरलेल्या विविध कालखंडांतील कित्येक समानधर्मियांना मार्ग दाखविला आहे. परंतु वैज्ञानिक संशोधनाशी ज्यांचा संबंध निव्वळ विज्ञानाच्या उपयोजित अंगापुरता आला आहे त्यांच्या मनात मात्र अशा व्यक्तींविषयी सहज गैरसमज निर्माण होतात. अशा उच्चतम ध्येयांच्या साधनेसाठी लागणारी अंतस्फूर्ती व वारंवार आलेल्या अपयशांनी खचून न जाता आपल्या उद्दिष्टांशी एकनिष्ठ राहण्याची शक्ती यांची स्पष्ट कल्पना फक्त अशाप्रकारच्या साधनेला आयुष्य वाहिलेल्यांनाच येऊ शकते, इतरांना नाही. वैश्विक धार्मिक जाणिवेतूनच अशी मन:शक्ती प्राप्त होते. एका समकालिनाने काढलेले उद्‌गार योग्यच आहेत. त्याच्या म्हणण्याप्रमाणे आजच्या या भोगवादी जगात खरोखरीचे सखोल धार्मिक वृत्ती बाळगणारे लोक आहेत गंभीर मूलभूत संशोधनाला वाहिलेले वैज्ञानिकच!

अनुवाद - चिंतामणी देशमुख
Thinkers' Academy Journal

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार १९९६
## सल्लागार समिती, मुंबई

**मृणाल गोरे** - विश्वस्त केशव गोरे ट्रस्ट
अध्यक्ष - महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार समिती

**पन्नालाल सुराणा**
पत्रकार आणि समाजवादी चळवळीतील कार्यकर्ते

**अर्जुन डांगळे**
साहित्यिक व आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्ते

---

**पुष्पा भावे** महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीच्या अभ्यासक,
सामाजिक कृतज्ञतानिधीच्या विश्वस्त

**उल्हास राणे**
पर्यावरण तज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य

**नागेश हाटकर**
आदिवासी व असंघटित कामगार चळवळीतील कार्यकर्ते











**सुरेश कराळे**
पत्रकार

**आनंद करंदीकर**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीचे अभ्यासक

**चंद्रकांत केळकर**
निमंत्रक - महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार समिती

## निवड/सल्लागार समिती (अमेरिका)

**सुनील देशमुख**



**अशोक सबनीस**
वास्तुविशारद, लेखक, न्यूयॉर्क सिटी ट्रांसिट ॲथॉरिटीमध्ये डेप्युटी डिव्हिजनल आर्किटेक्ट, मराठी साहित्यात रस, कॅनडामधील 'एकता' मासिकात लेखन





**डॉ. अरुंधती विनोद**
स्त्रीरोगतज्ञ, टेनाफ्लाय, न्यू जर्सी
अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित.



**अरुण गांधी**
भारतातील जातीव्यवस्था, अमेरिकेतील वंशवाद, आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्ण संघर्ष यांवर सातत्याने कार्य, 'एम. के. गांधी इन्स्टिट्यूट फॉर नॉन व्हायलंस' या संस्थेचे संस्थापक.



**प्रा. डॉ. जयंत लेले**
क्वीन्स विद्यापीठातील समाजशास्त्राचे अध्यापक, विविध सामाजिक विषयांचे चिंतनशील अभ्यासक व लेखक.

# महाराष्ट्र फाउण्डेशन

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८मध्ये या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली सोळा वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यासारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने आजवर पांचशेहून अधिक गरजू मुलांना साहाय्य केले आहे. पुण्याच्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेच्या सहकार्याने पुण्याजवळ एक गांव दत्तक घेतले आहे. जनकल्याण रक्तपेढीच्यामार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनसाठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. अशा रितीने गेल्या सोळा वर्षात भारतातील तीनशेहून अधिक संस्थांना दोन कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या देणग्या या संस्थेने दिल्या आहेत.

Invest in Future
of Those
with No Future. . .
so They Can
reinvest

ही महाराष्ट्र फाउण्डेशनची घोषणा आहे.

लोकशिक्षण, जनसंघटन, जनआंदोलन अशा विविध मार्गांनी समाजापुढील प्रश्नांची तड लावू पाहणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल समाजाला वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी व अशा समाजकार्याला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र फाउण्डेशन' (यू.एस्.ए.)ने 'समाजकार्य गौरव पुरस्कार योजना' कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे.

# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव उर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, वर्ण व वर्ग दोन्हीकडून तळागाळातला कामगार, या दलित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात युनियन बांधण्यात तसेच स्वातंत्र्यानंतर लगेचच्या काळात म्हणजे या शतकाच्या पाचव्या दशकात मुंबईतील असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८मध्ये त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे यांनी व केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी केशव गोरे स्मारक ट्रस्टची स्थापना केली.

'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोनातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. ट्रस्टचे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक अभ्यासू कार्यकर्ते व संशोधन करणारे विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

संशोधनाच्या कार्याला उपकारक व्हावे म्हणून अलीकडे 'ट्रस्ट'ने एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' सुरू केले आहे. या केंद्रात सुमारे २०० विषयांवरील विविध नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाच्या अनुषंगाने तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी सामाजिक महत्त्वाच्या विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन ट्रस्टतर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. २०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे नि:शुल्क वाचनालय असे अनेक उपक्रम ट्रस्टतर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' या संस्थेचे कार्य ट्रस्टच्या वास्तूतूनच केले जाते.



# सुनील देशमुख

[stamp]

श्री. सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४मध्ये एस्.एस्.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७०मध्ये मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम्. ही पदवी त्यांनी प्राप्त केली व पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम्.एस्. (केमिकल इंजिनिअरिंग), एम्.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमोडिटी ट्रेडर म्हणून वॉल स्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीची प्रतिभा टिळक, विलेपार्ले) व गिरीश, निशा व सुशील ही तीन मुले यांच्यासह ते अमेरिकेतच स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना सहित्य व समाजसेवा याविषयी विशेष आस्था आहे.

वयाच्या ४६व्या वर्षी व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यावर आठवड्यातून काही काळ सामाजिक सेवेच्या कामासाठी ते आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून १९९४ मध्ये 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन मराठी साहित्याला पारितोषिके देण्यासाठी त्यांनी एक प्रतिष्ठान स्थापन केले आहे. तसेच 'समाजकार्य गौरव पुरस्कार योजने'तील खर्चाचा अर्धा भारही श्री. सुनील देशमुख यांनीच उचलला आहे.

# मंथन

